
साप्ताहिक

# माणूस

९ ऑक्टोबर ८२. दोन रुपये







१

जनजागरण

= जनजागरण

१०००

जी × जी + शौरी = ०

मी नाक पिता
मी नाक पिणार

— विज्ञानेश्वरी

साप्ताहिक

**माणूस**

¤

वर्ष : बाविसावे

अंक : अठरावा

९ ऑक्टोबर १९८२

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

¤

# काश्मिर : अधिक हिरवे !

बिहार वृत्तपत्रनियंत्रण–विधेयकाविरुद्ध देशभर रान उसळले. सुरुवातीला या विधेयकाच्या बाजूने असणाऱ्या इंदिरा गांधींनाही थोडे नमावे लागावे, विधेयकात काही त्रुटी आहेत हे मान्य करावे लागावे, हा विरोधी रान उसळल्याचा परिणाम म्हणावा लागेल. शक्यता अशी दिसते की, या विधेयकावर राष्ट्रपतींची सही होण्यापूर्वी त्यात बदल केले जातील. त्यातील वृत्तपत्र-स्वातंत्र्यावर उघडउघड हल्ला करणाऱ्या तरतुदी मागे घेतल्या जातील व हा वणवा शांत करण्यात येईल; पण याच सुमारास काश्मिरचे पुनर्वसन विधेयक संमत होण्याच्या मार्गावर असेल. या विधेयकाविरुद्ध वास्तविक बिहार विधेयकापेक्षाही अधिक उग्र स्वरूपात लोकमत प्रकट व्हायला हवे आहे; पण हा मामला अद्याप तरी थंडच आहे. लेख येताहेत; पण बिहार विधेयकासारखी निकडीची जाणीव व तीव्र विरोधी भावना त्यात दिसत नाही. राजकीय पक्षांचीही विशेष हालचाल नाही. अशी हालचाल करू शकणारा विरोधी व अखिल भारतीय म्हणता येईल असा पक्ष सध्या एकच दिसतो– भाजप. कारण बाकीचे सगळेच विरोधी पक्ष आता प्रादेशिक बनले आहेत. पण भाजपही काश्मिर पुनर्वसन विधेयकाबाबत विशेष हालचाल करताना दिसत नाही. वास्तविक हा प्रश्न भाजपने अधिकच जिव्हाळ्याचा मानायला हवा. कारण भाजप–जनसंघ संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे काश्मिर भारतात राहावा यासाठी बलिदान झालेले आहे ! इतर राज्यांप्रमाणेच काश्मिरही एक राज्य मानले जावे, यासाठी काश्मिरला स्वतंत्र व खास दर्जा देणारे घटनेतील ३७० हे कलम रद्द व्हावे म्हणून श्यामाप्रसादकालीन जनसंघाने चळवळ उभारली होती व शेवटी या चळवळीमुळेच श्यामाप्रसादांना आपले प्राण गमवावे लागले ! हे कलम अद्याप घटनेत आहे तेथेच आहे. हे कलम आहे तोवर भारत–काश्मिर सामिलीकरण पूर्णत्वास पोचले असे म्हणता येणार नाही. भारतीयांना काश्मिरात मालमत्ता खरेदी करून स्थाईक का होता येऊ नये ? संकल्पित काश्मिर पुनर्वसन विधेयकामुळे हा अधिकार, पाकिस्तानात पूर्वी निघून गेलेल्या काश्मिरच्या एके काळच्या रहिवाशांना मात्र दिला जाणार आहे. पूर्वपाकिस्तानातून किंवा बांगला देशातून आसाममध्ये जसे पाकिस्तानी निर्वासित शिरले किंवा घुसवले गेले व आज ही सख्या डोईजड होण्याएवढी मोठी झाली, तसेच दहावीस वर्षांनंतर काश्मिरबाबतही होण्याची दाट शक्यता आहे. प्रथम आझाद काश्मिरातून, नंतर पाकिस्तानच्या इतर प्रांतातूनही काश्मिरात हे तथाकथित निर्वासित येत राहतील, स्थायिक होतील व काश्मिर आज आहे त्यापेक्षाही भारतापासून अधिक दूर जाईल ! मुळातच शेख अब्दुल्लाची महत्त्वाकांक्षा नेपाळप्रमाणे काश्मिरचे स्वतंत्र राज्य व्हावे ही होती; पण टोळीवाल्यांनी आक्रमण केले, टोळीवाल्यांमागोमाग पाकिस्तानी सैन्यच

काश्मिरवर चालून येण्याचा धोका निर्माण झाला म्हणून, अगदी नाइलाजाने शेख अब्दुल्लांना भारताकडे मदत मागावी लागली व तत्पूर्वी भारत–काश्मिर-सामिलीकरण-करारावर सही करावी लागली. भारतीय सैन्याच्या पराक्रमामुळेच तेव्हा काश्मिर वाचू शकले. शेखसाहेबांचे स्वतंत्र काश्मिरचे स्वप्न धुळीला मिळाले. या स्वप्नाचा अवशेष म्हणजे आपल्या घटनेतील ३७० कलम ! हा अवशेषही गेल्या तीस वर्षात वास्तविक पूर्ण पुसला जायला, नाहीसा व्हायला हवा होता. त्याऐवजी संकल्पित पुनर्वसन विधेयकामुळे तो विस्तारित होण्याचाच धोका निर्माण झालेला आहे. हे विधेयक संमत झाले तर हेरगिरीसाठी याचा पाकिस्तानकडून दुरुपयोग केला जाईल हे तर खरेच; पण काश्मिर सोडून जे लोक पाकिस्तानात ३०।३५ वर्षांपूर्वी स्थलांतरित झाले, त्यांना एकाएकी पुन्हा काश्मिरात यायची ओढ लागण्याचे कारणच काय ? आणि ही ओढ मान्य करून त्यांना पुन्हा काश्मिरात परत आणायचे, तर मग हीच सवलत पाकिस्तानातून भारतात ढकलल्या गेलेल्या हिंदू–शीख निर्वासितांना का लाभू नये ? अनेक सिंधी भारतात स्थायिक झालेले आहेत, स्थिरावले आहेत; पण त्यांनाही आपल्या मूळ ठिकाणची आठवण होते, तेथे जावेसे वाटते, जमल्यास मालमत्ताही खरेदी करावीशी वाटते. जो न्याय काश्मिरला, जी सवलत काश्मिरातून पाकिस्तानात गेलेल्या निर्वासितांना, तीच सवलत, तोच न्याय पाकिस्तानातून भारतात ढकलल्या गेलेल्या हिंदू-शीख निर्वासितांनाही लागू केला जात असेल, तर उत्तमच आहे. अशा निर्वासितांच्या जाण्यायेण्यामुळे भारत-पाकिस्तान जनतेतील दुरावा कमी होईल व भारताची फाळणी ही किती कृत्रिम व अनैसर्गिक घटना होती हे उभय देशातील जनतेच्या लक्षात येऊन, ही ऐतिहासिक चूक सुधारण्याचा एखादा मार्ग भविष्यात केव्हा तरी खुला होईल; पण पाकिस्तानकडून असा प्रतिसाद सद्यःस्थितीत तरी अशक्य दिसतो. उलट अण्वस्त्रांचा वापर करून का होईना, काश्मिर पाकिस्तानला जोडण्याचे स्वप्नच पाकिस्तानी राज्यकर्ते अजूनही उराशी बाळगून बसलेले दिसतात. म्हणून पाकिस्तानी नागरिकांना काश्मिरात, म्हणजेच भारतीय भूभागात परत येऊ देणे,त्यांना स्थायिक होऊ देणे, त्यांना मतदानाचे वगैरे राजकीय हक्क देणे, म्हणजे काश्मिरचा आसाम करणे होय. सध्याच काश्मिरात बहुसंख्या मुस्लिमांची आहे. काश्मिर हे सरहद्दीवरचे राज्य असल्याने या बहुसंख्येचे प्रमाणच मुळात कमी व्हायला हवे. तेथील हिंदू–शीख–बौद्ध–ख्रिश्चन वगैरे लोकवस्तीचे प्रमाण वाढायला हवे. आज बहुसंख्य काश्मिरी मुसलमानांना भारत हा आपला देश वाटत नाही. ते इंडियाला परका देश समजतात ही वस्तुस्थिती आहे. केवळ आपले सैन्य तेथे तळ ठोकून आहे म्हणूनच काश्मिर भारतात आहे. अशी आधीच नाजूक स्थिती असताना आणखी काही पाकिस्तानी नागरिकांची भर त्यात कशासाठी टाकायची? म्हणून संकल्पित काश्मिर पुनर्वसन – विधेयकाविरुद्ध जोरदार चळवळ व्हायला हवी. इतकेच नाही तर घटनेतील ३७० हे कलम रद्द करण्यासाठी मागे झालेल्या चळवळीचे जोरदार पुनरुज्जीवनही व्हायला हवे. प्रादेशिक पक्ष हा उठाव करू शकणार नाहीत. सबंध दक्षिण भारत या प्रश्नाविषयी सध्या तरी उदासीन आहे. राज्यांना अधिक स्वायत्तता हवी अशी कम्युनिस्ट पक्षाची मागणी असल्याने व एकूणच भारत हे राष्ट्र नसून हा एक खंड आहे अशी या पक्षाची भूमिका असल्याने, या पक्षाकडूनही हा प्रश्न उचलला जाण्याची शक्यता कमीच. सत्तारूढ इंदिरा काँग्रेस पक्ष किंवा भाजप यापैकी कुणी तरी एकाने किंवा उभयतांनी सहकार्य करून, काश्मिर आहे त्यापेक्षा अधिक हिरवे करू पाहणारी ही वाटचाल रोखून धरायला हवी. इतर राज्यांना मुख्यमंत्री असतात. काश्मिरच्या मुख्यमंत्र्यांना मात्र पंतप्रधान म्हणावयाचे ! काश्मिरी माणूस भारतात कुठेही स्थायिक होऊ शकतो, मालमत्ता खरेदी करू शकतो; पण एखाद्या तामिळी किंवा बंगाली माणसाला मात्र काश्मिरात हे हक्क नाहीत. हा भेदभाव संपला पाहिजे. त्यासाठी केवळ सध्या पुढे आलेले व संमत होऊ घातलेले पुनर्वसन-विधेयक रद्द होऊन भागणार नाही. घटनेतील ३७० हे कलमच काढून टाकायला हवे. राज्यांना अधिक स्वायत्तता हवी ही मागणी विचारार्ह आहे; पण स्वायत्तता म्हणजे अलगपणाकडची वाटचाल नसावी. काश्मिरची वाटचाल अशी अलगपणाकडची आहे. म्हणून ती रोखून धरली पाहिजे ! अगोदरच खूप उशीर झालेला आहे !

–श्री. ग. मा.

# सदानंद रेगे

एकवीस सप्टेंबर. मंगळवार. सकाळी साडे-सात झाले असावेत. फोन वाजला. 'वाङ्मयशोभे'चे म. म. केळकर बोलत होते. 'आता प्रादेशिक बातम्यात सदानंद रेगे गेल्याचे सांगितले असे म्हणतात. तू बातम्या ऐकल्यास का?' क्षणभर सुन्न व्हायला झाले. मी अर्थात बातम्या ऐकलेल्या नव्हत्या; परंतु बातमी खरी ठरली. मुंबईला जावे का? पण म. म. केळकरांनी पुढे सांगितले–'अंत्ययात्रा सकाळी ८॥ लाच निघणार आहे–' म्हणजे आमचा मित्र आता पुनः भेटणार नव्हताच–त्याचे अंत्यदर्शनही अशक्य होते! त्या क्षणापासून रेगेच्या आठवणी गर्दी करू लागल्या.

आमचा स्नेह ३२–३३ वर्षांचा. रेगेच्या बाबतीत तसं म्हटलं तर स्नेह–मैत्री या शब्दांना फारसा अर्थ नव्हता. या नात्याची व्यावहारिक संकल्पना रेगेच्या बाबतीत व्यर्थ होती. त्याला सर्वार्थाने किती मित्र होते आणि तो कितीजणांना मित्र मानीत असे, याबद्दल मला नेहमीच शंका असे. त्याच्या मनात कुणाविषयी ममत्व आहे, जिव्हाळा आहे याचा थांगपत्ता कुणाला लागणे कठीण होते. कुणी बऱ्याच ओळखीचा भेटला की, तो बोलताना हळवा होई. त्यातला कुणी आजारी पडला तर त्याला स्वस्थता लाभत नसे; परंतु लाटालाटांनी येणारे त्याचे हे प्रेम असे व्यक्त होतसे तेवढेच. एरवी जाणवायचे ते त्याचे स्वत.मधले हरवलेपण आणि त्यामुळे भास व्हायचा तो पारदर्शक कोरडेपणाचा.

वेगळ्याच पिंडाचा, समीक्षकांच्या कसोट्यांना सतत टोलवीत राहाणारा, श्रेष्ठ कवी म्हणून, मराठी सारस्वतात त्याचे स्थान आता कायम राहाणार असले, तरी मला जास्त करून स्मृतीत आहे तो या प्रवासाची सुरुवात होण्यापूर्वीचा कवी!

४९–५० च्या सुमारास मुंबई आजच्यासारखी सर्वांगानी नासलेली नव्हती. मुंबईवर मराठी संस्कृतीचा छाप स्पष्ट होता. सहज कुणाकडे जावे–यावे. फोर्ट विभागात स्नेह्यांबरोबर रमतगमत हिंडावे अशी ही नगरी लोभस आणि बरीच शांतही होती. फ्लोरा-फाउंटनच्या परिसरात, कारकुनी पेशात अडकलेले आम्ही सात–आठ साहित्यप्रेमी जीव–प्रत्येक शनिवारी दुपारी, मुंबई युनिव्हर्सिटीसमोरच्या 'कॉफी हाउस'मध्ये, बसा घेतल्यासारखे जमत असू! दुपारी दोनला कचेऱ्या सुटल्या की, एक-एकजण टपकू लागे. तीनच्या सुमारास कॉफीची पहिली राउंड सुरू झाली, की पुढचे तीनएक तास कसे जात कळत नसे. कधी आमचा हा घोळका गिरगावातल्या संपादकीय–कचेरीत घुसत असे. 'वसुधा', 'वसंत', 'सत्यकथा', 'हंस' अशा सर्व मासिकांच्या कचेऱ्या सेंट्रल सिनेमाच्या परिसरातच होत्या.

आमच्या या घोळक्यात साहित्यात बऱ्यापैकी नाव झालेला फक्त एकच कथाकार होता–तो म्हणजे रेगे! वेस्टर्न रेल्वेच्या कचेरीत तो कनिष्ठ कारकून होता. वडिलाच्या मृत्यूनंतर, घरच्या जबाबदारीच्या रेट्यापायी रेगे या कचेरीत आला तो वयाच्या अठराव्या वर्षीच! त्याचा जन्म १९२३ चा. २१ जून १९२३ म्हणजे १९४१ सालीच तो कारकून झाला होता. आम्हा बाकीच्याना कारकुनी पत्करून २।३ वर्षेच झालेली होती. रेगेने कारकुनीचे दशक पुरे करत आणलेले होते–यामुळे या पेशात येणाऱ्या निबरपणातही तो आम्हाला चांगला ज्येष्ठ होता. आमच्यापैकी आणखी एक 'हाउसिंग बोर्डा'तला कारकून कवी म्हणून पुढे येत होता–तो म्हणजे मंगेश पदकी. उरलेल्यांमध्ये मी, रंगा मराठे, श्रीकृष्ण खाडिलकर, शरद वैद्य, वा. दि. जोशी–यांच्या नावे सटीसहामाशी एखादी नगण्य कथाच काय ती एखाद्या नियतकालिकात छापून येत होती.

रेगेच्या ओळखी अनंत होत्या. 'नवशक्ती'चे प्रभाकर पाध्ये, 'सत्यकथे'चे भागवत, मामा वरेरकर, पु. ल. देशपांडे, आकाशवाणीवरील अधिकारी यांचे सहज उल्लेख त्याच्या बोलण्यात असत. यामुळे आमच्या घोळक्यात रेगेची जास्त वट असे आणि ती तो पुरेपूर गाजवी. मला वाटतं आमच्या प्रत्येकाच्या लेखनाविषयी त्याच्या मनात तुच्छताच असावी. परिणामी आता क्षुद्र वाटतात अशी भाडणे होत आणि या सर्वांचा उगम रेगेच्या बोलण्यात असे; परंतु आश्चर्य असे की, तरीही रेगे यायचा–कारण हा माणूस माणसाच्या सहवासाचा तसा भुकेला होता. व्यक्तिशः मला त्याचा अधिक अनुभव आल्याने त्याचे-माझे संबंध जरा वेगळ्या रीतीने वाढतच राहिले.

५१ साली मी मुदतीच्या तापाने आजारी पडलो. ज्या आठवड्यात माझे जास्त झाले त्या वेळी सर्व मित्र मालाडला येऊन–भेटून गेले; परंतु एक रीत म्हणून वेळात वेळ काढून भेटण्यासाठी रेगे आला नाही. सर्वांच्याबरोबर तो आलाच; परंतु माटुंगा–म.लाड प्रवास करीत पुष्कळदा एकटाही आला होता. विश्रांतीच्या काळात त्याने मला अनेक पुस्तके आणून दिली. रस्त्यावरच्या रद्दीतून उत्तमोत्तम पुस्तके हुडकून विकत घेण्याचा त्याचा छंद होता. यामुळे त्याच्यापाशी पुस्तकांना वाण नसे. मी आजारातून बरा झाल्यावर म्हणाला–'मला वाटलं होतं तू मरतोस की काय!'

पुढे मी गिरगावात राहू लागलो. माझी मुलगी रांगती होती. रेगे घरी आला की, तिच्याशी खेळत बसायचा. रेगे जिथे जिथं जायचा ते सगळे घर त्याच्या परिचित असायचे, हे माझ्या हळूहळू लक्षात आले.

कथाकार म्हणून रेगेची ख्याती होत होती. त्याचे कथासंग्रह नावाजले जात होते. त्याच्या 'पाळणा' कथेला यथावकाश कसला तरी आंतरराष्ट्रीय पुरस्कारही लाभला आणि तो एकाएकी हास्यचित्रे काढू लागला. दिवसाकाठी सहा-सहा सात-सात देखणी चित्रे तो काळ्या शाईत काढायचा. त्याचे अक्षर जसे वळणदार आणि ठसठशीत, तशीच त्याची ही चित्रे सुरेख असायची. याच काळात एक सूक्ष्म बदल त्याच्यात झाला. कथेवरचे त्याचे लक्ष ढळले आणि तो कवितेकडे वळला. वळला तो वळलाच. त्याने कथालेखनाकडे संपूर्ण पाठ फिरवली!

रेगेचे आंतरिक जीवन, गूढ, गुंतागुंतीचे आणि करुण होते. नाही म्हटले तरी कथेच्या निर्मितीत त्याला कथालेखनाची काही बंधने पाळावी लागत. त्याच्या अफलातून कल्पनासृष्टीत जन्म घेतलेली कथा–कागदावर उतरवताना तिला कथेचा किमान घाट त्याला द्यावाच लागे आणि ही प्रक्रिया त्याला त्रासदायक ठरत चालली असावी. कवितेत तो रमला याचे कारण मला वाटते त्याच्या

पष्ठ २७ वर

मुंबई वार्ता

# त्याही मैत्रिणीच!

मालकीण–मोलकरीणसंबंधावर नुकतीच 'मैत्रिणी'नी मुंबईत चर्चा केली.

घरकामाला येणारी मोलकरीण हे भारतातल्या मध्यमवर्गात घरोघरी दिसून येणारं लक्ष्य. गरीब किंवा कनिष्ठ मध्यमवर्गातल्या, आठ–दहा वर्षांपासून ते साठ–सत्तर वर्षांपर्यंतच्या, गरीब आणि फटाकड्या, सुशिक्षित आणि अशिक्षित, प्रामाणिक आणि बेपर्वा अशा मोलकरणी म्हणजे काही ठिकाणी असून अडचण, काही ठिकाणी नसून खोळंबा. धुणी–भांडी, केर–लादी, दळण इथपासून ते मुलं सांभाळण्यापर्यंतची सगळी कामं करणाऱ्या मोलकरणी मालकिणींची घर चालवायला मोलाचा हातभार लावत असतात स्त्रियांच्या-गृहिणींच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग या संबंधानी व्यापलेला असतो.

चर्चेला आलेल्या मैत्रिणी सगळ्या मालकिणींपैकीच होत्या. मोलकरणीची बाजू पुरेशी न मांडली जाण किंवा मोलकरीण–विरोधी सूर चर्चेला लागणं हे सहज शक्य होतं. असं काही झालं नाही ही कौतुकाची बाब. चर्चा पुण्यातल्या मोलकरणींनी बांधलेल्या संघटनेवर काढलेल्या डॉक्युमेंटरी चित्रपटाच्या अनुषंगानं सुरू झाली आणि वेळोवेळी कुणी ना कुणी मोलकरणीचीही बाजू मांडून चर्चा समतोल ठेवतच होतं.

स्त्रियांनी केलेल्या मोलकरणीच्या प्रश्नांना एक खास महत्त्व आहे. जेव्हा स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चा होतात, तेव्हा त्यांचा एकूण सूर अर्थातच स्त्रियाविषयी सहानुभूतीचा असतो, मग त्या चर्चा कोणीही करो. या साऱ्यामधून स्त्रीचं शोषितवर्गाची प्रतिनिधी असं एक सर्वसाधारण चित्र उभं रहातं. कदाचित यातून एक खोटी आत्मानुकंपा निर्माण होण्याचा संभव असतो. मात्र या चर्चेमध्ये याच शोषित स्त्रीची, गृहिणीची भूमिका बरीचशी (शोषकाची) आहे. ती मालकीण आहे, मोलकरणीहून चार अधिक पैसे, सामाजिक प्रतिष्ठा, सुख–सोयी बाळगून आहे. तशी सहानुभूतीची गरज तिलाही आहेच; पण तिच्याहून तिच्या मोलकरणीला ती अधिक आहे अशा वेळी स्त्रिया आपल्या मोलकरणीचे प्रश्न समजून घेतात का? नसल्यास का नाही? की घरगुती बाबतीत त्यांच्या होणाऱ्या कुचंबणेचं उट्टं त्या तिच्यावर काढतात? तिचं शोषण करतात? या आणि अशा तात्त्विक, मानसिक प्रश्नांची आणि त्याचबरोबर व्यावहारिक, वैयक्तिक अनुभवाच्या बारीकसारीक तपशिलांची चर्चा इथे झाली.

चर्चेच्या सुरुवातीलाच एका मैत्रिणीनं सांगितलं की, मोलकरीण ही मूळ संकल्पनाच स्वातंत्र्य, समानता याच्या विरुद्ध आहे आणि आपल्या देशातलं तिचं वास्तविक स्वरूपही या गोष्टीला बळकटी आणणारं आहे. मोलकरीण काय करते? तुमची व्यक्तिगत, घरगुती साफ–सफाईची कामं करते आणि कुणाची व्यक्तिगत साफसफाईची कामं करणं हे हलकेपणाचं वाटतं. काही आदिवासींनी आपले अनुभव आणि भावना सांगताना म्हटलं होतं की, आमच्या सावकाराच्या शेतावर आम्ही राबतो, कष्टाची कामं करतो हे ठीक आहे; पण त्याचा बिछाना सुद्धा आम्ही घालतो. म्हणजे पहा किती आळशी आहे तो! –अशा वैयक्तिक कामातला अपमानास्पद वाटणारा भाग इथे नेमका पकडला जातो. परदेशात तर मोलकरणी सहजासहजी मिळत नाहीत. ज्या मिळतात त्या आठवड्यातून काही मोजके दिवस येतात. पैसे भरपूर घेतात आणि मालकिणीशी त्यांचं नातं बरोबरीचं असतं. आपल्याकडे असं चित्र दिसत नाही. मालकीण मोलकरणीशी फारतर सहानुभूतीनं वागेल; पण बरोबरीच्या, समानतेच्या नात्यानं नाही. अशा प्रकारचा मोलकरणीचा हक्क आहे, असं आपल्याकडे मान्य झालेलं नाही.

ही परिस्थिती कितपत बरोबर आहे?

अर्थात परिस्थिती फारशी बरी नव्हे हे तर कोणीही मान्यच करेल; पण आपल्याकडच्या मोलकरीणविषयक समस्या जशा सामाजिक आहेत, तशाच मानसिक आहेत आणि मुख्यतः आर्थिक आहेत.

कुठल्याही वस्तूची किंमत तिची मागणी आणि पुरवठा या दोन्हींच्या तणावातून ठरत असते. मोलकरीण किंवा एकूण 'श्रम' या घटकाचा पुरवठा आपल्याकडे मागणीपेक्षा जास्त आहे हे तर उघडच आहे. सतत वाढती लोकसंख्या आणि त्या मानानं कमी प्रमाणात वाढणारे उद्योगधंदे यामुळे प्रश्न अधिकच बिकट झाला आहे. मोलकरणीची टंचाई आहे की नाही या विषयावर चर्चेच्या ओघात बरीच उलट-सुलट मतं व्यक्त झाली. मोलकरणीची टंचाई निर्माण होण्याची प्रक्रिया अगदी संथपणे सुरू झाली आहे; पण अजून तरी त्यांचा तसा तुटवडा नाही. 'एक गेली तर दुसऱ्या छप्पन्न मिळतील' असं मालकिणीला वाटतं. (वाईट नवऱ्यांना आपल्या बायकांबद्दल नेमकं हेच वाटतं!) त्यामुळे मोलकरणीची बार्गेनिंग पॉवर कमी होते. त्यांच्यात मोबिलिटी कमी असते. आखाती प्रदेशात जाणाऱ्या मोलकरणी हे तसं क्वचित दिसणारं दृश्य आहे. एरवी घरापासून फार लांब त्या कामाला जाऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे पगारही फार वाढवून त्यांना मागता येत नाहीत. जिथे पदवीधरांनासुद्धा बेकारीचे कटु अनुभव सोडत नाहीत, तिथे मोलकरणीसारख्या अ-कुशल स्त्री-कामगारांचा काय पाड? अ-कुशल असल्यामुळे त्यांना मिळणारी कामही क्षुल्लक, फार कौशल्य न लागणारी अशी असतात. मोलकरीण या दृश्याची ही आर्थिक बाजू आहे आणि भारतीय दारिद्र्यामध्ये तिची पाळंमुळं घट्ट रुजली आहेत. त्यामुळं या दारिद्र्याला जोवर उत्तर सापडत नाही, तोवर मोलकरणीच्या समस्येची समाधानकारक आणि सदसद्विवेकबुद्धीला पटेल अशी सोडवणूक करता येणार नाही, हे अतिशय खेदानं का होईना मान्य करायलाच लागेल!

परंतु अ-कुशल कामगारालादेखील कायद्याप्रमाणे आठ तास काम केल्याबद्दल बारा रुपये वेतन मिळायला हवं; तेवढं ते मिळतं का? यावरचं विधान म्हणजे अर्थातच त्या पुष्कळ घरी काम करतात. एका घरी जाणारा त्यांचा कामाचा वेळ – तास आणि त्या प्रमाणात मिळणारं वेतन – यांचा परस्परांशी काय मेळ बसतो? यावर बहुतेक मैत्रिणींनी आपण किमान इतपत वेतन देतो आणि याहून कमी वेतन दिलं गेलेलं साधारण अनुभवाला येत नाही, असं ठामपणे सांगितलं. डॉक्युमेंटरी फिल्ममधल्या पुण्याच्या मोलकरणींनी आपल्याला पाच रुपये वेतन मिळतं

असं सांगितलं; पण एक तर ही फिल्म दोन वर्षांपूर्वी काढलेली होती. तेव्हाच्या आणि आत्ताच्या आर्थिक परिस्थितीत बराच फरक पडला आहे दुसरं म्हणजे पुणे आणि मुंबईच्या परिस्थितीत पुष्कळच फरक आहे. इथे आज कोणी पाच रुपये वेतन देत नाही आणि दोन वर्षांपूर्वीही कोणी असं देत नव्हतं असं बहुतेक मैत्रिणींनी (मुंबईच्या) विश्वासानं सांगितलं.

यानंतर अन्य सोयी-सवलतींबद्दल चर्चा झाल्या. रजा, पगार-वाढ, निवृत्तीनंतर मिळणारे फायदे, सुरक्षितता यांपैकी मोलकरणींना काय-काय मिळतं? किंवा याबरोबर त्यांच्याकडून अपेक्षित असलेली शिस्त त्या कितपत पाळतात? मोलकरणींना सणासुदीच्या दिवशी कामावर यावं लागतं. ज्या दिवशी मालकिणींना गरज असते, त्याच दिवशी मोलकरणीच्याही घरी सण वार असतो. मग तडजोड कोणी करायची? काही मैत्रिणींनी सांगितलं, अशा वेळी त्या दिवशीचा दुप्पट पगार किंवा काही बक्षिसी द्यायचं कबूल केलं, तर हा प्रश्न गोडीगुलाबीने सुटतो. ही ओव्हर टाइमसारखीच कल्पना झाली. याखेरीज कॅज्युअल लीव, प्रिविलेज लीव, सिक लीव यासारख्या रजा त्यांना मिळतात का? — या प्रश्नावर सगळ्या मैत्रिणींनी अशा रजा मोलकरणी घेतात आणि आम्हीही त्या देतो असं सांगितलं. मैत्रिणींपैकी कोणी मोलकरणी नव्हत्या म्हणून ठीक. नाही तर अशा रजा 'प्रायर सँक्शन' करून घ्यायच्या, तर कोणीही मालकीण त्या देणार नाही, असं त्यांनी नक्कीच सांगितलं असतं! पण साधारणपणे आजारपण, गावाला जाणं, बाळंतपण या गोष्टींसाठी मोलकरणींना 'विथ पे' रजा मिळते. सवलती मिळतात. दिवाळीचा बोनस म्हणून साडी किंवा एका महिन्याचा पगार मिळतो— ही निदान मुंबईच्या सुखवस्तु वस्तीची तरी गोष्ट आहे. सणासुदीला त्यांना गोडधोड, उरलं-सुरलं (शिळ्या पाक्याचं संभावित नाव!) मिळतं. (मात्र हे देताना उपकाराची भावना 'खाल्ल्या मिठाला जागण्या' ची अपेक्षा थोडी अधिकच असते, हेही अमान्य करता येणार नाही.) वार्षिक वेतनवाढ अॅन्युअल इन्क्रीमेन्ट यांना नियमित मिळतच असं नाही; पण महागाईच्या मानानं त्यांचे पगारही दिवसेंदिवस वाढतच असतात. कधीकधी तर त्यांना वर्षातून दोन वेतनवाढीही मिळतात. मात्र मालकिणीचा महागाईभत्ता निर्देशांक वाढल्यावर जसा आपसूकच वाढतो, तसा ही मालकीण मात्र मोलकरणीचा पगार वाढवून देत नाही.

या सवलतींच्या मोबदल्यात मोलकरणी आपली नेमून दिलेली कामं इमाने-इतबारे आणि नीट करतात का? यावर उत्तर म्हणजे काहीजणी करतात. काही जणी नाही. काही जणी सवलतींचा दुरुपयोग करतात, तशा काही मालकिणीही ऑफिसमधून सवलती मिळवून त्यांचा दुरुपयोग करतात असं मैत्रिणींनी मान्य केलं. मुख्य म्हणजे मोलकरणी दांडया मारतात आणि ऑफिसला पोचणाऱ्या त्यांच्या मालकिणींची दाणादाण उडवतात. अशा वेळी मनुष्यस्वभावाला धरूनच मालकिणींनाही अशा मोलकरणींचा सहानुभूतिपूर्वक विचार करावासा वाटत नाही. त्यांच्या अडचणींना उपयोगी पडावंसं खास वाटत नाही. एका मैत्रिणीनं सांगितलं, दांडया मारणाऱ्या माझ्या मोलकरणीचा पगार एका महिन्यात मी समप्रमाण कापला या 'शिस्तभंग कारवाई'चा तिच्यावर चांगला परिणाम झाला आणि ती नियमित यायला लागली. खरं म्हणजे हें भाग्यच म्हणायचं! नाही तर 'झाल्या दिवसांचा पगार टाका आणि उद्यापासून दुसरी बाई पहा!' असं ठणकावणाऱ्या मोलकरणीही आहेत. त्या कामं स्वच्छ, नीटनेटकी करत नाहीत. सहकार्य करू इच्छित नाहीत. शेवटी पैशाची आणि काम करून घेण्याची गरज उभयपक्षी असते. कोणीच बेपर्वाई किंवा असमंजसपणा दाखवायला नको दोघींनाही परस्परांकडून सुरक्षितता हवी असते. घरात वावरणाऱ्या मोलकरणीनं स्वच्छ, प्रामाणिक असावं असं मालकिणीला वाटतं. सतत, भरघोस उत्पन्न मिळावं, नोकरीचं सातत्य असावं असं मोलकरणीला वाटतं म्हणजे वाटत असावं. कारण आपली बाजू मांडण्यासाठी कोणी मोलकरीण तर आली नव्हती; परंतु त्यांचा अडाणीपणा, अशिक्षितपणाच त्यांच्या कल्याणाच्या आड येतो आणि त्यामुळं त्यांच्या कामातही गुणवत्ता नसते. प्रॉव्हिडंट फंड किंवा पेन्शन या स्वरूपात मोलकरणींना काही देता यावं, म्हणून त्यांच्या पगारातून काही रक्कम कापून बँकेत ठेवणं आणि ती नंतरच त्यांच्या हवाली करणं यासारखे प्रयोग बऱ्याच मैत्रिणींनी केलेले दिसले; पण सर्वांच्या बाबतीत ते यशस्वी मात्र झाले नाहीत. मोलकरणी हे पैसे मध्येअध्येच काढायला लावतात? कदाचित त्यांना खरच आर्थिक अडचणी असतात, कदाचित त्यांचा यावर विश्वास बसत नाही, कदाचित त्यांना दूरदर्शीपणाही नसतो.

मोलकरणीची वैयक्तिक आयुष्यं बहुधा दुःखीच असतात दारुडे, रानटी वृत्तीचे, मारझोड करणारे नवरे, दारिद्र्य, वाईट वस्तीतल वास्तव्य असुरक्षितता या साऱ्यामुळे मोलकरणी मन लावून काम करू शकत नाहीत, याबद्दल सर्वांनी सहानुभूती व्यक्त केली. त्याना किमान वेतन तरी पुरं पडतं का? असा एक प्रश्न आला; पण मोलकरणींनी जर आपली कुटुंबं अवाढव्य वाढवली असतील तर त्यांना मालकिणींनी कुठवर पुरं पडावं आणि का? असं उत्तर त्याला देता येईल. राबसाबणानं त्यांच्या हाता-पायांना इजा होते, असंही म्हटलं गेलं, पण हे 'प्रोफेशनल हॅजर्ड' या सदरात मोडतं. कारण तसे तर टायपिस्टच्या हातालाही फोड येतात आणि डॉक्टर निरनिराळ्या रोगांना एक्स्पोज होत असतो.

मोलकरणी ही सामाजिक आणि मानसिक समस्या आहे, असं म्हटलं. आर्थिकदृष्टया कमतरतेमुळं किंवा श्रमाची हलकी कामं करण्यानं माणसातल्या माणूसपणाची जेव्हा उपेक्षा होते, तेव्हा सामाजिक समस्या उद्भवते. मोलकरणीनं आपल्या शेजारी सोफ्यावर बसून टीवी पहाणं, याला उभय पक्षांचीही आज तयारी नाही हे पुष्कळ मैत्रिणींनी मान्य केलं. सामाजिक अन्याय आणि अप्रतिष्ठेचं हे एक उदाहरण झालं.

घरगुती काम करणं याला मुळातच मोल नाही. मग ती कामं घरातली गृहिणी करो की मोलाची बाई करो. म्हणूनच जी कामं हॉटेलमध्ये केली, तर ती नोकरी ठरते, कारखान्यात केली तर तिला प्रतिष्ठा येते, ती मोलकरीण म्हणून केली, तर त्यांना किंमत रहात नाही. भोवतीचं जग झपाट्यानं बदलतंय, पैसा हा त्याचा केन्द्रबिंदू होतोय, त्याचं झगमगीत आकर्षण वाढतंय. नव्यानं शिकणाऱ्या, दहावी—बारावी होणाऱ्या मोलकरणींच्या मुलींना, तरुणींना आपण हेच धुणं भांड्याचं काम करावं असं कसं वाटेल?

त्यांनाही आत्मसन्मान आहे. स्वातंत्र्य आणि सन्मान नसलेलं हे काम करण्यापेक्षा दुधाच्या बाटल्या आणणं, मुलांना शाळेत पोचवणं यासारखी कामं त्या पसंत करतील आणि नेमक हेच घडतयं. मात्र अशी आत्मसन्मानाची कामं प्रत्येकीलाच मिळतील असं नाही. त्यात या संक्रमणावस्थेत त्यांच्या भावना—आत्मसन्मान अधिकच संवेदनशील बनला आहे, त्यानं प्रश्नातली गुंतागुंत आणि समस्येचा बिकटपणा वाढतो आहे.

या प्रश्नांना उत्तर काय ? असंच चालू राहिलं, तर एक दिवस मोलकरीण ही संस्था नष्ट होईल, जसं संपन्न परदेशात झालं आहे. त्या वेळी एक तर घरकामाची प्रतिष्ठा वाढायला हवी म्हणजे हे करणं एक व्यवसाय समजलं जाईल. गृहिणीला घरातल्या सर्वांना मदत करावी लागेल. अगदी पाहुण्यांसकट सर्वांना स्वावलंबन शिकावं लागेल. (मग आपल्या घोळदार संस्कृतीचं काय होणार ? तंत्रज्ञानाच्या महाय्यानं घरकामासाठी बरीच उपकरणं स्वस्तात मिळावयास लागतील. स्वयंपाकाच्या, जेवणा-खाण्याच्या सवयी बदलून सुटसुटीत कराव्या लागतील. (मग पतिराजांच्या हृदयाकडे जाणारा मार्ग कुठून बरं जाईल ?)

यातल्या कुठल्या गोष्टी नजीकच्या भविष्यात घडून येण्याच्या शक्यता दिसताहेत ?

जवळजवळ कुठल्याच नाहीत. तेव्हा प्राप्त परिस्थितीत तरी सहिष्णुता, सामंजस्य जमेल तिथे उभयपक्षी, नाही तर किमान मालकीणींनी तरी दाखवायला हवं. त्यांची जबाबदारी अधिक आहे. कारण त्यांना या गोष्टींची जाणीव आहे आणि अखेर मोलकरणीही त्यांच्याच सहकारी आहेत.

—ललिता बर्वे

---

## कामगार वृत्त

मुंबई महापालिका संप

# थातुरमातुर तडजोड

मुंबई महानगरपालिकेतील एक लाख कर्मचाऱ्यांचा संप लवकरात लवकर व सन्मानाने सुटला ही तशी चांगलीच घटना झाली. या घटनेबद्दल मुंबईचे महापौर डॉ. प्रभाकर पै, पालिका-आयुक्त द. म. सुकथनकर, संपाचे नेते खा. जॉर्ज फर्नांडिस आणि इतर नेतेमंडळी या सर्वांनाच या निमित्ताने धन्यवाद द्यावयास हवेत.

धन्यवाद देण्याचे कारण असे की, हा संप जास्त काळ चिघळला नाही. तसा तो चिघळण्याची शक्यता निर्माण झाली होती. महापालिकेच्या या संपाच्या निमित्ताने मुंबईतील दोन बलाढ्य कामगारनेते — डॉ. दत्ता सामंत आणि जॉर्ज फर्नांडिस एकत्र येणार अशा वावड्या उठल्या होत्या. मुंबईतील बेस्ट, टॅक्सी इतकेच नव्हे तर हॉटेलकामगारही या संपात सामील होतील अशी धमकीवजा घोषणा खा. फर्नांडिस यांनी केली होती. हे सर्व १०० टक्के यशस्वी होणे अशक्य कोटीतील असले तर त्यानिमित्ताने डॉ. सामंतांच्या कामगारांच्या आशा उंचावल्या होत्या. महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या संपाच्या निमित्ताने सरकारला कोठे तरी अडविता येईल अशी आशा त्यांना वाटू लागली होती.

ही आशा फोल ठरल्याने सर्वांना धन्यवाद द्यावयास हवेत असे नाही, तर ज्या कौशल्याने हा संप हाताळला त्याला या ठिकाणी मोल आहे. बरेचदा असं होतं की, संप सुरू होतो; पण कोणी माघार घ्यावयाची या मुद्द्यावर तो प्रश्न प्रतिष्ठेचा ठरतो. या प्रतिष्ठेपायीच संप लोंबकळत पडतात आणि त्यात बिचारे गरीब कामगार मात्र भरडले जातात. याचं ज्वलंत उदाहरण मुंबईतील २॥ लाख कापडगिरणीकामगारांचा संप ! हा प्रश्न अशाच कारणांमुळे इतके दिवस लोंबकळत पडला आहे. सुदैवाने महापालिकेच्या संपाबाबत असे काही झाले नाही हे बरे झाले.

तशी शक्यता नव्हती असे म्हणता येणार नाही. समजा डॉ. सामंतांप्रमाणे फर्नांडिसांनी म्हटले असते की, सर्व मागण्या पदरात पडल्याखेरीज संप मागे घेणे नाही तर काय झाले असते ? गिरणीमालकांप्रमाणे आणि सरकारप्रमाणे आयुक्त सुकथनकर यांनी नऊ कोटीपेक्षा एक पैसाही जास्त मिळणार नाही अशी ताठर भूमिका घेतली असती तर काय झाले असते ? बेस्ट आणि टॅक्सी रोखून फार फार तर जनतेला वेठीस धरण्यात आले असते; पण त्यामुळे आयुक्त शरणागती पत्करतील असे मुळीच नव्हते. शेवटी कोणतेही प्रश्न हे रस्त्यावर सुटत नसतात तर ते टेबलावरच सुटतात ! महापालिकेच्या बाबतीत असे काही झाले नाही हे बरेच; पण यासाठी ज्यांनी ज्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले त्यांनाच हे सर्व मोल द्यावं लागतं. या संप-समेटात महापौर डॉ. प्रभाकर पै यांनी बजावलेली कामगिरी खरोखरच उल्लेखनीय आहे संप सुरू होण्यापूर्वीपासून ते संप मिटेतोपर्यंत ते सतत याच प्रश्नाच्या मागे लागले होते. यासाठी त्यांनी अनेक लहान-मोठ्या बैठकी घेतल्या. आशादायक कोणतेच उत्तर मिळत नसले तरी त्यांनी शेवटपर्यंत आशा सोडली नाही. रविवारी दि. २६ रोजी तर सकाळपासून पहाटे ३ पर्यंत त्यांची या बाबतीत बोलणी चालली होती. जॉर्ज फर्नांडिस आणि त्यांच्या इतर नेत्यांना, तसेच पालिका, आयुक्त सुकथनकर यांना बोलणी यशस्वी होईतोपर्यंत महापौरांनी रोखून धरले. सरतेशेवटी सोमवार दि. २७ रोजी पहाटे ३ वाजता करारावर सह्या झाल्या व संप मागे घेण्यात आल्याचे घोषित करण्यात आले !

८५ लाख मुंबईकरांचे जीवनमान विस्कळित होऊ नये म्हणून महापौरांनी ही जी जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली, त्याचे अनेकांनी जाहीरपणे अभिनंदन केले आहे. या संप समेटात महापौरांप्रमाणेच आयुक्त सुकथनकर यांनीही तितकीच मोलाची कामगिरी बजावली! महापौरांच्या निवासस्थानी संपाबाबत बोलणी चालू असता आयुक्त अचानक बैठकीतून निघून गेले. राज्याचे मुख्य सचिव श्री. राम प्रधान यांच्याकडून काही तातडीचा निरोप आल्याने ते बैठकीतून गेले. बहुधा मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांचा काही निरोप प्रधानांनी आयुक्तांसाठी आणलेला असावा ! संपाची बोलणी अंतिम टप्प्यात आली असताना राज्याचे मुख्य सचिव प्रधान

यांनी आयुक्तांना काय सांगितले असावे याबाबत आता अनेक तर्कवितर्क काढले जात आहेत. मुंबई महापालिका ही पुलोद गटाच्या ताब्यात आहे. अनेक प्रयत्न करून देखील इं. कॉं. ला पुलोद आघाडी फोडता आली नाही, याच पार्श्वभूमीवर पालिका–कर्मचाऱ्यांचा संप आणखी काही काळ चालावा व तो मिटविण्याचे श्रेय अखेरीस इं. कॉं. ला म्हणजेच मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना मिळावे असे इंदिरा कॉंग्रेसला वाटत होते. त्याचसाठी रविवारी त्यांनी आयुक्तांवर दडपण आणले असा आरोप पुलोदच्या अनेक सदस्यांनी आता केला आहे. हा आरोप जर ग्राह्य धरला तर मुख्यमंत्र्यांचे दडपण येऊन देखील आयुक्तांनी पुन्हा बैठकीत भाग घेऊन करारावर जी सही केली त्या त्यांच्या हिंमतीबद्दल त्यांचेही कौतुक करावयास हवे.

या संपाबाबत खा. फर्नांडिसांनी विविध डावपेचाद्वारे जे कौशल्य दाखवलं त्याबाबतीत त्यांना महत्त्व द्यावेच लागते. राणा भीमदेवी गर्जना करून त्यांनी संपात जोराची हवा भरली. सतत चार–पाच दिवस ते प्रकाशझोतात राहिले. अशा घोषणा त्यांनी दिलेल्या असल्या तरी परिस्थितीचे भान त्यांना होते असे म्हणावे लागते. हा संप फार काळ चालविणे आपल्या हिताचे नाही, याचे गणित त्यांनी आधीच आपल्या मनाशी करून ठेवलेले असावे! कारण ज्या बेस्टमध्ये एके काळी त्यांचा दरारा होता त्यात त्यांची आता ताकद किती कमी झाली आहे हे त्यांनी गेल्या एका वर्षात अनेकदा पाहिले आहे आणि बेस्ट–टॅक्सी बंद करून प्रश्न सुटले जाणार नाहीत तर लोकांच्या रोषालाच आपण विनाकारण बळी पडू आणि त्याची किंमत निष्कारण आपणालापुढील वर्षीच्या महापालिका-निवडणुकीत द्यावी लागेल, याचे भान फर्नांडिसांना होते, म्हणूनच ताणता येईल तेवढं फर्नांडिसांनी ताणले; पण ते तुटण्यापूर्वीच त्यांनी यशस्वीरीत्या चार पैसे जादा पदरात पाडून घेतले!

वास्तविक नऊ कोटींपेक्षा जास्त रक्कम देणे आपणाला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही असे आयुक्तांनी प्रथमपासूनच सांगितले होते. या नऊ कोटी रुपयांवरून ही रक्कम कराराद्वारे आता १३ कोटींच्या घरात गेली म्हणजे कामगारांचा हा वरदर्शनी विजयच होय; पण काही लोकांची प्रवृत्ती कशी असते पहा! संप फार काळ केला तर हे लोक संपनेत्याला शिव्याशाप वाहतात आणि समेटाद्वारे तो लवकर मिटवला तर संप करून काय मिळवले असा प्रश्न विचारतात. शेवटी १०० टक्के मागण्या या कधीच पदरात पडणाऱ्या नसतात. पालिका–संपाचेही तसेच झाले आहे. जो करार झाला तो फारसा प्रशंसनीय नाही; पण तसे काहीच पदरात पडले नाही असेही नाही. थातुरमातुर तडजोड होऊन हा संप मिटेल असे मी मागील लेखात म्हटले होते. या करारानुसार कर्मचाऱ्यांना दरमहा ३०, ४५ व ६० रुपये अशी अंतरिम वाढ मिळणार आहे. सध्या ही रक्कम २२, ३२ व ४० रुपये अशी मिळत होती. म्हणजे सहा दिवसांच्या संपानंतर कामगारांना ८, १३ व २० रुपये इतके अंतरिम सहाय्य मिळणार आहे. संपाअगोदर आयुक्तांनी पहिल्या श्रेणीला २५ रुपये देऊ केले होते ते आता फक्त ३० रुपये झाले इतकेच! याशिवाय सर्वांना १ एप्रिल ८२ पासून ३१ मार्च ८४ पर्यंत दरमहा १५ रुपये वैद्यकीय भत्ता व वर्षाला २५० रुपये प्रवासभत्ता मिळणार आहे. बाकीचे सर्व प्रश्न लवादाकडे सोपविण्यात आले आहेत. सर्वात महत्त्वाचा प्रश्न तसाच लोंबकळत पडला आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांची संख्या येथे हजारावर असताना त्याबाबत कोणतेच प्रयत्न या वेळी झाले नाहीत. हाही प्रश्न लवादाकडे सोपविण्यात आला आहे!

म्हणूनच सहा दिवसांच्या संपाने म्युनिसिपल मजदूर युनियनने फार काही अचाट मिळविले असे म्हणता येणार नाही. येथील म्युनिसिपल सबॉर्डिनेट स्टाफ युनियनचे प्रमुख यशवंत सरपोतदार यांनी तर असे म्हटले आहे की, संपापूर्वी वाटाघाटीद्वारे जे देऊ करण्यात आले होते ते जुलै १९७९ पासून मिळणार होते; पण आता संपानंतर कराराद्वारे जे मिळणार आहे ते १.११.१९८१ पासून आहे. वाटाघाटीद्वारे कर्मचाऱ्यांना ६९·५० रुपये देऊ केले होते ते आता ५५·५० रुपये मिळणार आहेत.

म्हणूनच म्हटलं की, संपाने फार मोठी रक्कम पदरात पडली असे नाही; पण झाले ते अगदीच वाईट आहे असेही नाही. संप फार काळ लांबणे कोणाच्याच हिताचे नव्हते. झाले ते सद्यःपरिस्थितीला योग्य तेच झाले असे शेवटी म्हणावे लागेल.

—मोहन शं. कुलकर्णी

## परराष्ट्र

# स्वीडन

## समाजवाद्यांकडे पुनः सत्ता

वा. दा. रानडे

स्वीडनमध्ये सहा वर्षांच्या खंडानंतर सोशल डेमॉक्रॅटिक पक्ष व कम्युनिस्ट यांच्या आघाडीकडे पुनः सत्ता आली आहे. ही सहा वर्षे सोडली तर त्यापूर्वीची चाळीस वर्षे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचेच सरकार तेथे अधिकारावर होते. १९७६ च्या निवडणुकीतील अपयश तात्पुरते होते. मतदारांनी उजव्या पक्षांना एक संधी दिली; पण देशापुढील प्रश्न ते सोडवू शकले नाहीत. ओलॅफ पाम यांच्या समाजवादी धोरणामुळे साऱ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत, असा उजव्या पक्षांचा प्रचार होता; पण हे पक्ष आपल्या उजव्या धोरणाने देशाची स्थिती सुधारू शकले नाहीत. तेव्हा मतदारांचा कल पुनः डाव्या धोरणाकडे असलेल्या सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाकडे वळला.

स्वीडन एक छोटासा देश. तेथे कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी जगाच्या राजकारणावर त्याचा काय परिणाम होणार आहे आणि आपल्या परिस्थितीत काय फरक पडणार आहे असे म्हणून या निवडणुकांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. नॉर्वे–स्वीडन या स्कॅंडिनेव्हियन देशांकडे लोकशाही समाजवादाची प्रयोगभूमी म्हणून पाहिले जाते. म्हणून तेथील निवडणुकांना महत्त्व आहे स्वीडन पश्चिम युरोपातल्या संपन्न देशांपैकी एक असला तरी वाढती बेकारी, अंदाजपत्रकातील वाढती तूट आणि चलनवाद या प्रश्नांना त्यास तोंड द्यावे लागत आहे. तेथे ३७% कामगार बेकार आहेत. पश्चिम युरोपातील

इतर देशांच्या तुलनेने हे प्रमाण कमी असले तरी स्वीडनच्या दृष्टीने जास्त आहे गेल्या वर्षी अंदाजपत्रकात साडेअकरा अब्ज डॉलरची तूट होती आणि चलनवाढीचे प्रमाण ११% होते. अंदाजपत्रकातील तूट भरून काढण्यासाठी करवाढ अटळ ठरणार आहे.

उद्योगधद्याच्या सामुदायिक मालकीचा कार्यक्रम सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने देशापुढे ठेवला आहे तो सरकारने घडाडीने अंमलात आणण्याचे ठरविले तर उद्योगपतीशी संघर्ष होईल. हा संघर्ष आताच ओढवून घ्यावयाचा की थोडया सबुरीने पावले टाकायची याचा निर्णय ओलॅफ पाम याना घ्यावा लागेल. उद्योगधंद्याच्या सामुदायिक मालकीची ही योजना सोशल डेमॉक्रॅटिक पक्ष आणि ट्रेड युनियन को-फेडरेशन यानी सयुक्तपणे आखली आहे. 'वेज-अर्नरफंड' उभारून उद्योगधंद्यावर सामुदायिक मालकीचे क्षेत्र क्रमाक्रमाने वाढविण्यात येणार आहे. देशाच्या चोवीस विभागांत हा फंड उभारला जावयाचा असून त्यासाठी कामगाराच्या वेतनावर जादा कर आणि कपन्यांकडून जादा नफ्यावर कर (एक्सेस प्रॉफिट) टॅक्स घेतला जाणार आहे. या फंडातून मोठ्या कपन्याचे शेअर विकत घेऊन स्वीडिश उद्योगधंद्यांच्या मालकीत कामगारांनी हळहळू प्रभुत्व मिळवावयाचे हा त्यामागील कल्पना आहे. या कार्यक्रमाला उद्योगपतीचा विरोध होणार याची पाम यांना कल्पना होती म्हणूनच निवडणूक प्रचारमोहिमेत त्यानी या कार्यक्रमावर फारसा भर दिला नाही या योजनेबाबत उद्योगधद्याच्या प्रतिनिधीशी आपण बोलणी करण्यास तयार आहोत आणि १९८५ च्या निवडणुकीपूर्वी या योजनेची फक्त सुरुवात होईल असे त्यांनी सागितले; पण स्वीडिश उद्योगपती या बाबतीत बोलणी करण्यासुद्धा तयार नाहीत. या योजनेमुळे खासगी उद्योगधंदे नष्ट होऊन सारी औद्योगिक व्यवस्थाच मोडकळीस येईल. वैयक्तिक स्वातंत्र्य धोक्यात येईल असे मत प्रमुख उद्योगपतींनी व्यक्त केले आहे.

निवडणुकीत सोशल डेमॉक्रॅटिक पक्षास रिक्सडॅगच्या (स्वीडिश पार्लमेंट) एकूण ३४९ जागांपैकी १६६ व कम्युनिस्टांना २० मिळाल्या. सोशल डेमॉक्रॅटिक पक्षास बारा जागा गेल्या निवडणुकीपेक्षा अधिक मिळाल्या. कम्युनिस्टांच्या जागांत मात्र वाढही झाली नाही आणि घटही झाली नाही. कॉन्झर्वेटिव्ह लिबरल आणि सेंटर पार्टी या तीन पक्षाचे सरकार १९७६ च्या निवडणुकीत सत्तेवर आले होते. त्यापैकी कॉन्झर्वेटिव्ह पक्षाचे बळ वाढले. त्यास ८६ जागा मिळाल्या. त्या गेल्या निवडणुकात १३ अधिक आहेत. बाकीच्या दोन्ही बिगरसमाजवादी पक्षाच्या एकत्रित बळापेक्षाही अधिक जागा कॉन्झर्वेटिव्ह पक्षाने जिंकल्या असून पन्नास वर्षातील त्याचे हे सर्वांत मोठे यश आहे. लिबरल पक्षाच्या जागा ३८ वरून २१ पर्यंत तर सेंटर पार्टीच्या जागा ६४ वरून ५६ पर्यंत घटल्या.

सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाने निवडणूक-मोहिमेत वाढत्या बेकारीच्या प्रश्नावर भर दिला होता व मतदारानाही तोच प्रश्न महत्त्वाचा वाटला. उजव्या पक्षाच्या सरकारने समाजकल्याण कार्यक्रमावरील खर्चात कपात केली होती. आपण या खर्चात कपात तर करणार नाहीच उलट वाढ करू असे आश्वासन ओलॅफ पाम यानी दिले होते. त्यासाठी करवाढ करावी लागेल याचीही त्यानी कल्पना दिली होती. मतदारानी त्यांना सत्तेवर आणून आपली करवाढीला तयारी असल्याचेच दर्शविले आहे.

स्वीडनच्या राजकारणाचे एक वैशिष्टय म्हणजे सर्व महत्त्वाचे निर्णय सहमतीने घेतले जातात. सत्तारूढ पक्ष किंवा आघाडी केवळ बहुमताच्या बळावर आपले निर्णय अंमलात आणत नाही. विरोधी पक्षाचाही त्याला पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. ओलॅफ पाम ठाम समाजवादी मताचे असले तरी जास्तीत जास्त लोकांचा पाठिंबा आपल्या कार्यक्रमास नसेल तर ते तो घाईने अंमलात आणणार नाहीत सहमतीने निर्णय घेऊन कारभार करावयाचा ही मनोवृत्ती स्वीडिश लोकांमध्येच खोल रुजलेली आहे. तेव्हा त्यांनाही त्या मार्गानेच जावे लागेल. त्यांच्या लोकशाही समाजवादाच्या कल्पनेत समाजवादापेक्षा लोकशाही पद्धतीला महत्त्व आहे. समाजवाद आणण्याचा वेग मंदावला तरी हरकत नाही; पण लोकशाही पद्धतीनेच पावले टाकायची अशी त्याची भूमिका आहे. सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाचेही असेच धोरण आहे. त्यामुळे चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ त्या पक्षाच्या हाती सत्ता असूनही स्वीडनमधील बहुसंख्य उद्योगधदे खाजगी मालकीचेच आहेत. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण हे तात्त्विक उद्दिष्ट म्हणून आम्ही मान्य केलेले नाही. या बाबतीत घाई न करता पावले टाकावीत असा आमचा दृष्टिकोन आहे, असे १९७४ साली एका भाषणात पाम यानी सागितले होते. त्यांचा समाजवाद सौम्य व व्यवहार्य असला तरी पतप्रधानपदाच्या आपल्या पहिल्या कारकीर्दीत (१९६९ ते १९७६) पश्चिम युरोपातील इतर समाजवाद्यापेक्षा आपण पुढे असल्याचे त्यांनी दाखविले आहे.

पाम याची अंतर्गत व आतरराष्ट्रीय प्रश्नावरील भूमिका अमेरिकेच्या भूमिकेशी विरोधी आहे. पाम यांनी व्हिएटनाम युद्धविरोधी निदर्शनात भाग घेतला होता. व्हिएटनाममध्ये पाठविलेल्या अमेरिकन सैनिकांपैकी अमेरिकन धोरणाचा निषेध म्हणून सेनेतून फुटलेल्या अमेरिकनांना पाम यानी स्वीडनमध्ये आसरा देऊ केला. तसेच व्हिएटनाम युद्धासाठी सैन्यात भरती होण्याचे नाकारणाऱ्या अमेरिकन युवकानाही त्यानी आपल्या देशात आसरा देण्याची तयारी दर्शविली. तसेच पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेस पश्चिम युरोपच्या इतर नेत्यापेक्षा अधिक जोरदार पाठिंबा दिला.

ओलॅफ पाम अलिप्त राष्ट्राचे मित्र आहेत. विकसनशील देशांना संपन्न राष्ट्रानी अधिक प्रमाणात आर्थिक मदत केली पाहिजे या मताचे ते पुरस्कर्ते आहेत. अशा मदतीबद्दल ते आग्रह धरतील. स्वीडनमधील लोकमत समाजवाद्याकडे झुकले हा मतप्रवाह केवळ त्या देशापुरताच मर्यादित आहे, की पश्चिम युरोपातच समाजवाद्यांकडे लोकांचा अधिक कल आहे हे आताच निश्चित सागता येणार नाही. पश्चिम युरोपात कोहल यांच्या नेतृत्वाखाली ख्रिश्चन डेमॉक्रॅट व फ्री डेमॉक्रॅटिक पार्टी याच्या आघाडीचे सरकार आले हे तर उलटया मतप्रवाहाचे निदर्शक आहे; पण हा मतदाराचा कौल नसून फ्री डेमॉक्रॅटिक पक्ष सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाबरोबरच्या आघाडीतून बाहेर पडल्याने हे सत्तातर झाले आहे.

□

अवती भवती

शरद कृष्णन्

# पेरियाकुलम निवडणूक : एम्. जी. आर. विजयी

तामिळनाडूच्या राजकारणावर तेथील प्रादेशिक पक्षांचा विलक्षण प्रभाव असल्याने दिल्लीमध्ये सत्ताधारी असलेल्या इंदिरा काँग्रेस-सह अन्य कोणताही राष्ट्रीय पक्ष गेल्या बारा–पंधरा वर्षांमध्ये स्वत:च्या ताकदीवर यश संपादन करू शकलेला नाही. इंदिरा काँग्रे-सला ८० साली झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी जे यश मिळाले त्यात करुणानिधी यांच्या डी. एम्. के. चा मोठा वाटा होता. डी. एम्. के. आणि इंदिरा काँग्रेस याची मैत्री कागदोपत्री टिकून असली आणि पाँडेचरीमध्ये या दोन्ही पक्षांचे सरकार सत्तेवर असले तरी तामिळनाडूमध्ये आपले धोरण ठरवताना इंदिराजींनी डी. एम्. के. आणि तामिळनाडूमध्ये सत्तेवर असलेला ए. आय. डी. एम. के. यांच्यामधील वैमनस्याचा पुरेपूर फायदा उठवला आहे. याचे अगदी अलीकडील उदाहरण म्हणून तिरुपत्तूर विधानसभा पोटनिवडणुकीचा उल्लेख करता येईल. आपल्या डी. एम्. के. बरोबरील मैत्रीला बाधा येऊ न देता इंदिरा काँग्रेसने ए. आय. डी. एम्. के. च्या पाठिंब्याने आपले उमेदवार आर्. एम्. अरुणागिरी यांना तेथून निवडून आणले. इंदिरा काँग्रेसची व आपली दोस्ती जमावी यासाठी एम. जी. आर. सातत्याने प्रयत्नशील असून इंदिरा काँग्रेसने योग्य वेळी हालचाल केली असती तर पेरियाकुलम लोकसभेची जागा त्या पक्षाच्या पद-रात टाकण्यास रामचंद्रन राजीखुषीने तयार झाले असते; परंतु तामिळनाडूमधील स्थानिक नेतृत्वाने आपले सामर्थ्य न जोखता स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा सल्ला दिला. डी. एम. के.चे खासदार एम. नटराजन यांच्या निधनाने रिकाम्या झालेल्या या जागेवर त्यांनी हक्क सांगितला असता तर त्यात वावगे काही नव्हते. इंदिरा काँग्रेसचा आपल्याला पाठिंबा मिळेल अशा भावनेने करुणानिधी यांनी आपल्या पक्षातर्फे रामकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली. १९७२ पासून तामिळनाडूमध्ये एकही निवडणूक स्वतंत्रपणे न लढवणाऱ्या इंदिरा काँग्रेसने मदुराई येथील एक श्रीमंत जमीनदार शेख अब्दुल कादर यांना तिकिट देऊन या निवडणुकीच्या रिंगणात उभे केले. त्या वेळी एम्. जी. आर. आपला पाठपुरावा करतील असा या पक्षाचा होरा होता. योग्य वेळी ज्येष्ठ नेत्यांमार्फत बोलणी केली असती तर ते शक्यही झाले असते; परंतु या पक्षाने शंकर दयाळ शर्मा यांना बोलणी करण्यासाठी पाठवले. एम. जी. आर. आणि त्यांचा पक्ष यांची प्रतिमा लक्षात घेता शर्माजींबरोबर एम. जी. आर. बातचीत करणे शक्य नव्हते. आम्ही मैत्रीची लढत देऊ अशी घोषणा करून शर्माजींना परत यावे लागले. ए. आय. डी. एम. के. ने जयक्कन या तरुण वकील उमेदवाराकडे आपली उमेदवारी दिली. आपला उमेद-वार निवडून आला नाही तरी आपल्याला बरी मते पडतील असे इंदिरा काँग्रेसला वाटले होते. दुसऱ्या क्रमांकावर आपण नक्की असू असे या पक्षाचे स्थानिक नेते ग्वाही देत होते; पण मतदारांनी इंदिरा काँग्रेसला चारही मुंड्या चीत करून एम. जी. आर. च्या ए. आय. डी. एम. के. च्या पदरात घवघवीत यश टाकले! तामिळ-नाडूच्या राजकारणावर एम. जी. आर. यांची घट्ट पकड असल्याचे या निवडणुकीच्या निकालाने सिद्ध केले. इंदिरा काँग्रेसबरोबर कोण-ताही सौदा करताना आता एम. जी. आर. यांचे पारडे निश्चितपणे जड झालले असल्याने त्यांना आपल्याला अनुकूल अशा अटींवर सौदे-बाजी करणे शक्य होणार आहे. डी. एम. के. ने जोरदार लढत दिली असली तरी ए. आय. डी. एम. के. च्या मतांचे ओझे एवढे बोजड आहे की, इंदिरा काँग्रेस आणि डी. एम. के. यांच्या एकत्रित मतांचाही त्यावर प्रभाव पडू शकणार नाही. या निर्णायक विजयाने एम. जी. आर. आणि त्यांचा पक्ष यांच्या जनतेवरील प्रभावाची चुणुक निश्चितपणे दाखवून दिली आहे.

### घसघशीत मतदान

सर्वसाधारणपणे पोटनिवडणुकीमध्ये ३० ते ४० टक्क्यांहून जास्त मतदान होत नाही; परंतु या पोटनिवडणुकीचे वैशिष्टच हे की, चांगले ७० टक्के मतदान झाले आणि मतदारांनी हातचे राखून न ठेवता एम. जी. आर. यांच्या पाठी आपले सामर्थ्य उभे केले. राज्या-मध्ये एम. जी. आर. सत्तेवर असले तरी केन्द्रामध्ये त्यांना स्थान नाही. कारण लोकसभेमध्ये त्यांचे खासदार आहेत. आता या विजया-नंतर ही संख्या तीनवर गेली आहे. विद्यमान लोकसभेमध्ये १६ खासदार असलेल्या डी. एम. के. ला पराभूत करून एम. जी. आर. यांच्या पक्षाने ही जागा पटकावली आहे. मतदानाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे –

एकूण मतदार–७,७५,७५६.

मतदान–५,१३,८१५.

एस. डी. के.

जयक्कन–२,५२,३७७ (ए आय डी एम के–विजयी)

एन रामकृष्णन–१,८३,११७ (डी एम के पराभूत.)

अब्दुल कादर शेख–२९,९६९ (इंदिरा काँग्रेस).

इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराचे तसेच डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे

उमेदवार ए. अब्दुल वहाब (मते १६,३६६) आणि जनता पक्षाचे गुलाम मोहिद्दीन (मते ३,९०१) यांच्या अनामत रकमा सरकारजमा झाल्या! तामिळनाडूमध्ये शेतकरी संघटना बांधणारे नारायणस्वामी नायडू यांनी आपल्या संघटनेतर्फे श्री. एस. पंडायन यांना उभे केले होते. त्यांना केवळ १०,२६१ मते पडू शकली. त्यांची संघटना लोकप्रिय असली तरी या ग्रामीण मतदारसंघातही त्यांना आपला प्रभाव दाखवता आला नाही किंबहुना या निवडणुकीमध्ये त्यांच्या उमेदाराला अत्यंत कमी मते मिळाल्याने त्याचे हसे झाले. अन्य पाच–पंचवीस उमेदवार उभे असल्याने मतदानपत्रिकेला लहान मुलांच्या पुस्तकाचे स्वरूप आले होते. अर्थात ढीगभर उमेदवारांतून आपला उमेदवार नेमका निवडण्यात भारतीय मतदार आता चांगला तयार झाला आहे. अशिक्षित मतदारही आपला मतदानाचा हक्क नेमकेपणाने बजावू शकतो हे आता स्पष्ट झाले आहे.

मतदानाचा तपशील पहाता असे दिसते की, ६ विधानसभा मतदारक्षेत्रामध्ये पसरलेल्या या मतदारसंघामध्ये ए आय डी एम के ने ५ विधानसभा मतदारक्षेत्रात आघाडी संपादन केली. केवळ कुंमम या एकाच विधानसभा मतदारसंघामध्ये डी. एम. केला मताधिक्य मिळू शकले. येथे विधानसभा मतदारसंघ हा डी. एम. केच्या प्रभावक्षेत्राखाली असूनही तेथे ए आय डी एम के च्या उमेदवाराने सर्वाधिक ४६,८८१ मते संपादन केली. १९८० साली डी एम केने ही जागा इंदिरा काँग्रेसच्या सहकार्याने जिंकली होती. त्या वेळी डाव्या कम्युनिस्टांच्या सहकार्याने ही जागा लढवणाऱ्या ए आय डी एम केने केवळ १९ हजार मताच्या फरकाने ही जागा गमावली होती. आज डी एम केचा ७० हजार मतांनी पराभव करून त्यांनी ८० सालच्या पराभव धुऊन काढला!

विजयी उमेदवार जयक्कन हे सर्व उमेदवारांमध्ये तरुण असून पराभूत उमेदवार डी एम केचे श्री. रामकृष्णन यांचे जवळचे नातेवाईक आहेत. कुंमम विधानसभा मतदारसंघातील शेतकरी कुटुंबामधील या तरुणाने काही काळ मदुराई येथे वकिली केल्यानंतर राजकारणामध्ये प्रवेश केला आणि आपल्या पक्षातर्फे लढलेल्या या पहिल्या निवडणुकीमध्ये त्यांनी घवघवीत यश संपादन केले. आपल्या यशाचे कारण काय? असा प्रश्न विचारल्यावर त्यांनी एम. जी. आर च्या छायाचित्राकडे बोट दाखवून त्या छायाचित्राला नमस्कार केला. तात्पर्य काय, तर जे दिल्लीत चालते तेच मद्रासमध्ये चालते. तेथे बाईंच्या छायाचित्राचे महात्म्य आहे, येथे एम. जी. आर ची छबी प्रिय आहे.

एम. जी. आर. यांच्या पक्षाला हे जे यश मिळू शकले त्याची मीमांसा करताना राजकीय निरीक्षक राज्यामध्ये अलीकडेच सुरू करण्यात आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या भोजन-उपक्रमाला सर्वांत जास्त महत्त्व देतात. या उपक्रमाखाली राज्यशासनातर्फे दोन ते दहा वर्षांमधील ६५ लाख विद्यार्थ्यांना पौष्टिक भोजन देण्यात येते. या योजनेने मतदार चांगलेच प्रभावी झालेले दिसतात अफाट खर्चाची ही योजना राज्यशासनाला फार काळ पेलता येणार नाही असा अर्थतज्ज्ञाचा अंदाज असला तरी स्वतः एम. जी. आर. या योजनेत जातीने लक्ष घालत असून स्वयंपाक बनवण्यासाठी गरजू महिलांना प्राधान्य द्यावे अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत खेरीज निराश्रित वृद्धांसाठीही ही योजना राबवली जाईल असे त्यांनी निवडणूक-प्रचारामध्ये घोषित केले असून येत्या २ वर्षांत कुटुंबामधील एका व्यक्तीस तरी निश्चित नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे. ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याच्या योजनेचाही जनतेवर प्रभाव पडला आहे. या लोकसभा पोटनिवडणुकीमधील दणदणीत विजयामुळे एम. जी. आर. निर्विवादपणे अधिक सामर्थ्यशाली बनले आहेत.

### तिखट प्रतिक्रिया

आपल्या पक्षाचा दारुण पराभव इंदिराजींना चांगलाच झोंबला असून त्यांनी तामिळनाडू इंदिरा काँग्रेस समिती बरखास्त करून आपली तिखट प्रतिक्रिया नोंदवली आहे. १९८० पासून राज्यपक्षाची सूत्रे श्री. सुब्रह्मण्यम यांच्या हाती होती. या निवडणुकीमध्ये पक्षाने आपला उमेदवार उभा करावा असे त्यांनी सुचवले; पण अनामत रक्कम जप्त होण्याइतका दारुण पराभव त्यांच्या उमेदवाराला स्वीकारावा लागल्यावर समिती बरखास्त करण्याचा निर्णय योग्य आहे असे म्हणण्याखेरीज त्यांच्यासमोर पर्याय नाही. राज्यामधील नेतृत्व वादग्रस्त असू नये म्हणून एल झायपरुमल याना हुडवून त्यांना प्रदेशाध्यक्ष करण्यात आले खरे; परंतु केवळ दोनच वर्षांमध्ये त्यांना स्थानभ्रष्ट व्हावे लागत आहे. पक्षाला विजय मिळणार नाही हे माहीत असूनही आपण पक्ष बळकट करण्याच्या दृष्टीने निवडणूक लढवली. अशा परिस्थितीमध्ये प्रदेशाध्यक्षाना स्थानभ्रष्ट करणे योग्य नाही असे काही कार्यकर्त्यांचे मत असले तरी सर्वसाधारणपणे या निर्णयाचे पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून स्वागत झाले आहे प्रदेशाध्यक्ष म्हणून आता राज्यसभासदस्य एम. चंद्रशेखर यांची नेमणूक करण्यात आली असून नवीन समिती लवकरच घोषित होईल आपण नवीन अध्यक्षाना पूर्ण सहकार्य देऊ असे मावळत्या अध्यक्षानी सांगितले आहे. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री. थांगबाळू यांनी पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी आपण श्रीमती चंद्रशेखर यांना पूर्ण पाठिंबा देऊ असे घोषित केले आहे. तामिळनाडूमध्ये पाय


"एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यांमुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

पुस्तक पंढरी / ऑगस्ट १९८२ अंक
बाँबे बुक क्लब–ऑगस्ट निवड

**सबला**

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा

रोवायचे असतील तर एम. जी. आर. किंवा करुणानिधी यांचे बोट धरूनच चालावे लागेल ही कठोर वस्तुस्थिती या लोकसभा पोट-निवडणुकीने पुरेशी स्पष्ट केली आहे. इंदिराजी आपले आगामी डावपेच आता त्याच दृष्टीने आखतील. तथापी या पराभवामुळे त्यांना कोणत्याही स्वरूपाच्या तडजोडीमध्ये एम. जी. आर. यांच्या पक्षाला झुकते माप द्यावे लागेल. या विजयामुळे एम जी. आर. करुणानिधी आणि इंदिरा कॉंग्रेस यांच्या युतीला छेद देण्याचा जोरदार प्रयत्न करतील आणि त्यात त्यांना यश आल्यास पॉंडेचरी-मधील आघाडी सरकारवर त्याचा परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाही.

## □ नव्या युगामधील जादू – जाहिरातबाजी

असे म्हटले जाते की, ओरडणाराची बोरे खपतात; पण पाटी लावून बसणाराच्या आंब्यांना कोणी विचारत नाही. अर्थात हा झाला जाहिरातयुगाचा श्रीगणेशा. आज जमाना आहे जाहिरातयुगाचा. जाहिरात आज काय चमत्कार घडवून आणू शकते हे पहायचे असेल तर विकोचे गजानद पेंढारकर यांचे उदाहरण घ्या. प्रस्थापित टूथपेस्टचा विलक्षण प्रभाव असताना त्यांनी उतारी केली. रेडिओ, टी. व्ही., वृत्तपत्रे, प्रत्येक माध्यमाचा त्यांनी व्यापार केला. गेल्या १२ वर्षांमध्ये त्यांनी जाहिरातीचा अशा खुबीने वापर केला की, त्यांच्या उत्पादनांची विक्री ८ लाख रुपयांवरून ८ कोटी रुपयांच्या घरात गेली ! जाहिरातबाजीवर त्यांनी मार्केटमध्ये आपल्या स्वतः-साठी स्थान निर्माण केले. अशी आणखी दोन उत्पादने म्हणजे बलसारा यांची प्रॉमिस टूथपेस्ट आणि निरमा केमिकल्स यांची निरमा वॉशिंग पावडर एक गोष्ट अर्थातच नमूद करणे जरूर आहे की, जाहिरातबाजीवर तुम्हाला ग्राहक खेचून आणता येईल; पण तो टिकून रहायचा असेल तर किमान गुणवत्ता हवीच !

हिंदुस्थान थॉमसन असोसिएटस् ही देशामधील अग्रगण्य जाहिरात-संस्था या सस्थेने २३ कोटी रुपयाहून जास्त धंदा १९८१ साली केला आहे. या संस्थेचे राम सेहगल म्हणतात, 'मालाचे उत्पादन, अपेक्षित ग्राहक या गोष्टी विचारात घेऊनच जाहिरातीचे माध्यम निश्चित करावे लागते. वनस्पती उत्पादनामध्ये प्रस्थापितांची गर्दी असताना गाझियाबाद येथील एक नवीन उत्पादक आमच्याकडे आला. त्याच्या जाहिरातीची जबाबदारी आम्ही गेली आठ वर्षे संभाळत आहोत डालडा, सनफ्लॉवर यांच्यासारखे जबरदस्त स्पर्धक असूनही गेल्या ८ वर्षांत आम्ही अमृत वनस्पतीची विक्री १२ कोटी-वरून ८० कोटी रुपयापर्यंत नेऊन दाखवली. आम्ही प्रचारक नेमले. काही ठिकाणी नमुन्यादाखल फुकट तूपवाटप केले आणि वृत्तपत्रीय जाहिरातीमध्ये इंग्रजीपेक्षा प्रादेशिक वृत्तपत्रावर अधिक भर दिला. आज उत्तर हिंदुस्थानामध्ये अमृतच्या नावाने डालडा आणि सन-फ्लॉवरवालेही धास्तावतात ! अशीच धडकी निरमा पावडरवाल्यांनी भरवली आहे. निरमा मार्केटमध्ये आली त्या वेळी सर्फचा प्रचंड दबदबा होता. आज निरमाच्या प्रचंड खपाने सर्फवाल्यांची झोप उडवली आहे. उत्पादन बाजारात उतरताना मोठ्या प्रमाणात जाहिरात करावी लागते; पण जाहिरात एकदम तोडून चालत नाही. मुंबईमध्ये थ्रिलची प्रचंड जाहिरात करून हे पेय बाजारत आणण्यात आले. चार-सहा महिन्यांच्या जाहिरातीनंतरही थ्रिलचा प्रभाव जाणवू शकला नाही. आता त्यांच्या मागून आलेल्या आपेलाने जोरदार धडक मारलेली दिसते. केवळ मुंबई दूरदर्शनवरील जाहिरातींच्या प्रभावाचा उत्कृष्ट फायदा उठवणारे ग्राहक म्हणून खोपोली येथील संडे-रेस्टॉरटचा उल्लेख करता येईल. या रेस्टॉरंटमध्ये रविवारी सामान्यतः ४०० पर्यंत ग्राहक येत असते. दूरदर्शनवरील एक महिन्याच्या जाहिरातीनंतर ही सख्या २ हजारांच्या घरात गेली. आम्रपाली साडीच्या दुकानाने हे माध्यम वापरले आणि त्यांची रोजची विक्री ३० हजारावरून १ लाखाच्यावर गेली. बाबुभाई जगजीवनदास यानीही जाहिरातीचा असाच तुफानी मारा केला. त्याच्याही विक्रीत वाढ झाली; पण त्याचबरोबर तेथील कर्मचाऱ्यांकडे दत्ता सामंत यांचे लक्ष वेधले गेले आणि त्यानी एक संघटना बांधली. अर्थात हा एक सह-परिणाम झाला.

### लिरिलची योजनाबद्ध जाहिरात

अगदी शास्त्रशुद्ध जाहिरात करून आधीच गर्दी असलेल्या साबण-बाजारात लिरिलने स्वत साठी स्थान निर्माण केले. हा साबण बाजारात येईपर्यंत अन्य उत्पादकानी आपल्या साबणाच्या ज्या जाहिराती केल्या होत्या त्याचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले की, लाइफ-बॉयने कामगारवर्गावर आपले लक्ष केन्द्रित केले आहे इतर साबणांनी प्रामुख्याने मान्यताप्राप्त चित्रपट-अभिनेत्रींना हाताशी धरून सौंदर्यवृद्धीसाठी, तसेच त्वचेची निगा राखण्यासाठी आपल्या साबणाचा वापर करा असे आवाहन ग्राहकाला केले होते लिरिलवाल्यांनी साबण आणि ताजेपणा यांचा सबंध जोडला. आघोळ करून फ्रेश वाटावे यासाठी आपला साबण वापरा अशी जाहिरात केली लिंबाच्या सुगंधाचे आकर्षण निर्माण केले आणि लिरिल वापरून स्नान करणाऱ्या देखण्या तरुणीचे चित्रण असलेली फिल्म वितरित करण्यात आली. केवळ तीन महिन्यांच्या कालखडामध्ये विक्रीमध्ये चौपट वाढ झाली. प्रस्थापित बाजारपेठेमध्ये लिरिलने स्वत:साठी जागा करून घेतली.

उत्पादकांना जाहिरातीबाबत मार्गदर्शन करणाऱ्या ३९० जाहिरात-संस्था आज देशात आहेत आघाडीवर असलेल्या एन.टी.ए. लालोखाल क्लेरिसन ॲडव्हर्टायझिंग सर्व्हिस (१९८१ सालचा धंदा १५ ३ कोटी रुपये) लिंटाज इडिया (१९८१– ११ ८ कोटी रुपये) या अन्य प्रमुख संस्था आहेत. या जाहिरातसंस्थाच्या मते आकाशवाणी–दूरदर्शन-चित्रपटगृहामधील जाहिराती आणि प्रादेशिक वृत्तपत्रांमधील जाहिराती यांचा जास्तीत जास्त फायदा जाहिरातदाराला मिळतो. सर्व संबधितांना अर्थातच मोठे उत्पन्न मिळते. आकाशवाणीवर व्यापारी जाहिराती १९६७ साली सुरू झाल्या. १९७० नतर विविध भारतीची २८ केंद्रे प्रादेशिक भाषांतूनही जाहिरातीचा वापर करू लागली. या जाहिरातीचा लाभ शासनालाही मिळाला. १३ कोटी रुपयाचे उत्पन्न १९८१ मध्ये जमा झाले. दूरदर्शनवर १९७६ साली जाहिराती सुरू झाल्या आणि आज त्याचे वार्षिक उत्पन्न १५ कोटी रुपयाहून अधिक आहे. जाहिरातीचे महात्म्य ज्यांना उमजले आहे अशा सस्था विक्री-उत्पन्नाच्या सरासरी ५ ते १५ टक्के रक्कम जाहिरातीवर खर्च करतात. पाण्यात तरंग उठवण्यासाठी एक दगडाचा तुकडा भिरकावला तर तरंगाची लाट उठते. जाहिरातीचे असेच आहे. जाहिरातीचा एक तुकडा विक्रीचे तवंग उत्पादकांच्या दारी उठवतो. जाहिरात ही गुंतवणूक आहे आणि कला आहे. जे अक्कलहुशारीने या तंत्राचा वापर करतात, ते स्पर्धेमध्ये मोठ्या प्रमाणावर यशस्वी होतात. □

'माणूस' दिनांक २५ सप्टेंबर अंकात अरुण शौरी यांच्या पत्रकारितेचे सामर्थ्य, वेगळेपण कशात आहे हे सांगणारा प्रा. घोडके यांचा लेख दिलेला होता. शौरींच्या स्वातंत्र्याला काही मर्यादाही आहेत, हे सांगणारा प्रस्तुत लेख.

# वृत्तपत्रस्वातंत्र्य : संपादकाचे की मालकाचे ?

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

स्वातंत्र्य हे प्रेमासारखे असते, माणसाच्या मनात ते जंगमरूपात दाखविता येत नाही. त्याचा आविष्कार होऊ शकतो, प्रकटीकरण शक्य असते; परंतु स्वातंत्र्य किंवा प्रेम ह्या कितीही मधुमधुर वाटल्या तरी त्या वाटण्याची खिरापत नाही. स्वातंत्र्य ही एक समग्र कल्पना आहे – डिपार्टमेंटल नाही. राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य हे कप्पे स्वतंत्र वाटले, तरी ती एकाच स्वातंत्र्यदुर्गाची दालने असतात. म्हणजे मूळ दुर्ग बुलंद चिरेबंदी असेल तरच दालनांच्या स्वातंत्र्याला अर्थ उरतो. बिहार प्रेस बिल आणि अरुण शौरीनी रहस्योद्घाटन केलेली सिमेंट-डील व ऑइल-डिल ही प्रकरणे विचार (त्यात वृत्तपत्रे येतातच) स्वातंत्र्याच्या गजरात गाजली. तसेच बिहार प्रेस-बिलही !

वास्तविक विचारस्वातंत्र्य वा ते प्रकट करण्याचे वृत्तपत्रस्वातंत्र्य केवळ (Absolute) अवस्थेत या पृथ्वीवर कुठे असेल असे वाटत नाही. अगदी प्रे. निक्सनला पदच्युत करणारे व वॉटरगेट बाहेर काढणारे वार्ताहरही शेवटी संपादक व संचालकांच्या शासनविरोधी किंवा शासनाभिमुख स्ट्रॅटेजी (डावपेच)चे भाग असतात. शेवटी 'मोठा मासा–छोटा मासा' हे नाते नोकर व मालकाचे स्वातंत्र्य याचेही वर्णन करणारे नाते आहे. एका मोठ्या माशाचे स्वातंत्र्य त्याच्याहून घटिंगण माशाकडून ग्रास होतेसे वाटले की, तो मासा हाताखालील शूर माशाला किंवा माशांना छू: करतो. लगाम किंवा रस्सी किती सैल सोडतो – यावर प्राण्यांची प्रखरता ! शेवटी स्वातंत्र्यदेखील दोरी किती 'सैल' आहे, यापुरतेच सीमित असते. स्वातंत्र्याच्या नावाने 'बांग देणारे कितीएकजण रूसोचे चिरतरुण सुभाषित विसरू पाहतात. मॅन इज बॉर्न फ्री; पण तो त्यानंतर या ना त्या फेटर्स (बंधनात) मध्ये आढळतो. त्या फेटर्स फक्त made by govt. नसतात, made by management ही असतात.

रॉबर्ट ब्राउनिंगचे एक थोडेसे दुर्बोध व अबोध खंडकाव्य आहे. The Ring and The Book. त्यात एकाच घटनेचे अनेक साक्षीदार, आपापल्या कुवतीप्रमाणे 'सत्य' वर्णन करत असतात. हत्ती आणि आंधळ्याची गोष्ट तर खास भारतीय आहे. सत्य किंवा स्वातंत्र्यही त्या हत्तीसारखे आहे, नव्हे असते जो तो त्याला भावणारे-पेलणारे वर्णन करतो व त्याला 'स्वातंत्र्य म्हणतो. इंग्रजीत ज्याला 'रिंगसाईड व्ह्यू' म्हणतात, तोही जिथे अनेकांना साधत किंवा झेपत नाही, तिथे स्वातंत्र्य व त्याचे मारेकरी यांची झटापट प्रत्यक्ष रिंगणात जाऊन काय पाहता येणार ? स्वातंत्र्याप्रमाणे सत्य वा प्रेम हे ज्याच्या त्याच्या व्याख्येप्रमाणे आकसत किंवा प्रसरत असते. लोकशाहीतील स्वातंत्र्य ही तर आपण आयात केलेली कल्पना आहे. इंडीजिनस नाही. तेव्हा पाश्चात्य राजकारणातील 'पॉप्युलिझम' (लोकाराधन) त्यात अनुस्यूत आहे. शेवटी राजकीय स्वातंत्र्य ही वस्तू फक्त अल्पमतवाल्या – पढिकांच्या 'चर्चेची' बाब असते, आचरणाची नाही. जात, एकत्र कुटुंब, ग्रामीण कलह, जुनी पंचायतव्यवस्था, कौटुंबिकता आदी परंपराच्या ताणांनी बांधलेल्या गलिव्हररूपी भारतीय समाजाला 'All men all equal' हे जिथे रुचत नाही तेव्हा some are more equal यातील छद्म कसे जाणवणार ? लोकशाहीविषयी म्हणजे तिच्यातील सप्तस्वातंत्र्यांविषयीही लिहिताना वेस्ट मिनिस्टरचा वस्ताद, विन्स्टन चर्चिलने म्हटले आहे, "Democracy is the worst possible system, except for all the others." म्हणजे डेमॉक्रसी अति-नीच व्यवस्था आहे; पण स्वातंत्र्यवाल्याना सुखविणारी गोष्ट एवढीच की, ती 'नीचतम' व्यवस्थाहून उजवी आहे.

### स्वातंत्र्य : 'जोक' नाही की 'पोज' !

तेव्हा लोकशाहीतील वृत्तपत्र–स्वातंत्र्य हेच मुळात एक 'जाल' आहे. नाही तर सत्यान्वेषी शौरीनी लिहिलेली 'कुओ ऑइल डील' नावाची लेखमाला १०–७–८२ ते ३०–७–८२ दरम्यान प्रकाशित होण्याऐवजी ती १०–६–८२ रोजी प्रसिद्ध झाली असती. १८–६–८२ रोजी अरुण शौरीनी लिहिलेले पत्र तीन महिन्यानंतर प्रसिद्ध होते, ते 'स्वतंत्र' मनाने वाचले तर ! दोन 'G' (इंदिरा गांधी व गोएंका) यांच्यात तत्पूर्वी समझौता होता, तर ही कुओ–लेख–माला कदाचित इं. एक्स्प्रेसमध्ये प्रसिद्धही झाली नसती ! सिमेंट-प्रकरणोद्घाटन करतानादेखील कोणी एक हिंदुजा की एक दुजा शेट गोएंकाशेटला भेटला, गोएंकानी मग आपल्या 'पगला घोडा' शौरीना बोलावून घेतले. मग इतर काही मंडळींनी मदत केली व अंतुलेसाहेबाचे 'गमन' झाले. दिल्लीत राहणाऱ्या शौरीना बोलावणे येईपर्यंत पत्ताही नव्हता ! एका अंतुले – म्हणजे इं. कॉं. – विरोधी–गटातील बिल्डरला अनायासेन सिमेंट मिळत गेले असते, तर अंतुले कदाचित गेलेही नसते ! म्हणजे वृत्तपत्रस्वातंत्र्य हे हत्यार व हात लोकशाहीसाठी वापरले गेले नव्हते, तर मालकाच्या मित्रावरील तथाकथित अन्यायासाठी तो सर्व खटाटोप होता. म्हणून ज्या अमेरिकन वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या विझलेल्या पलित्याची थोटके गावठी बुद्धिमंत घेऊन वावरतात व ते हे विसरतात की, निक्सननी फोर्डला काय सांगितले ? "न्यूयॉर्क टाइम्सला दुखवू नकोस !" वॉटरगेट प्रकरणीचा उमाळा हा स्वातंत्र्य–संकोचाविरुद्धचा आक्रोश नव्हता, तर विशिष्ट हितसंबंधांना शासनाकडून लागलेल्या ग्रहणाविरुद्ध होता ! न्यूयॉर्क टाइम्सला रिपब्लिकनांनी दुखविले नसते तर ? अरुण शौरीनी ते सी आय ए एजंट असल्याचा उल्लेख करणाऱ्या एका अंग्रेजी नियतकालिकाविरुद्ध बदनामी केस चालविली आहे. म्हणजे शौरीही संशयाच्या पैल (above suspicion) नाहीत. इतिहासाचार्य राजवाडे यांनी म्हटल्याप्रमाणे ज्याचे हत्यार त्याची संस्कृति, या न्यायाने स्वातंत्र्य हेदेखील एक हत्यार आहे व त्या हत्याराचा बळीही आहे ! निर्वैर, निष्पक्ष व निर्भय आणि निःस्वार्थी पत्रकारिता

म्हणजे 'जोक' नाही की 'पोज' ही नाही. वृत्तपत्रस्वातंत्र्याचा OMBUDSMAN किंवा CRUSADER मानले गेलेले शौरी वस्तुतः वृत्तपत्रातील संजय गांधी आहेत. (हे विधान वाचून अनेक-जण टरकतील—अगदी मर्ढेकरांच्या 'सहनौ टरक्तु 'च्या थाटात !) दोन वर्षांत (साधारण त्याहून दुप्पट काळ संजयची सद्दी होती) शौरींनी भल्याभल्यांच्या पगड्या उडविल्या; पण त्या पगड्या उड-विण्याची प्रेरणा गोएंकांची होती. १९६९ साली सिंडिकेटमध्ये न जाता गोएंका इंडिकेटमध्येच राहिले असते तर ! इंडियन एक्स्प्रेसच्या एका जाहिरातीत But for Indian Express...म्हणून तराजू वगैरे दाखवून 'कमला' दाखविली आहे. हा सर्व स्वातंत्र्य-पुळका १९८० नंतर की मूळप्रेरणा ? इंडियन एक्स्प्रेसवर 'ज्यूट' (झूट नव्हे) प्रेस म्हणून एके काळी आरोप होता. शौरी हे विष्णूचे एक (सहस्र-नामांपैकी) नाव आहे. 'Sun' jay प्रमाणे गोएंकांनी अरुण शौरीचा Sun also rises केला-म्हणजे 'अरुणोदय' घडवून आणला. एके काळी फिरोझ गांधींचे कट्टे मित्र व इंदिराजींचे कौतुक करणारे रामनाथजी १९६९ नंतर इंदिराविरोधात गेले. अर्थात इंदिराजी-एवढेच वाकुडेपण माजी माहिती व प्रसारणमंत्री लालकृष्ण अडवानी यांनी केले असे सप्टेंबर ८२ च्या 'सूर्य' च्या अंकात गोएंकाकडून सूचित करण्यात आले आहे. वृत्तपत्र खटाऱ्याप्रमाणे असते, (इति गोएंका) तरीही शौरीसारखा 'पगला घोडा' (काहीजण त्यांना रेस-हॉर्सही म्हणतात) गोएंकांनी 'शौक' म्हणून तबेल्यात बांधला नाही, तर अंतुले, कुओ ऑइलसारख्या प्रकरणी वापरता यावा म्हणून 'स्टँड बाय' ठेवला आहे.

शेवटी वृत्तपत्रस्वातंत्र्य म्हणजे प्रकाशकाचे, संपादकाचे की लेख-काचे ? की त्या वृत्तपत्राच्या मालकाचे ? वृत्तपत्रे व न्यायालये सध्या विरोधी पक्षांचे कार्य करीत आहेत, म्हणणाऱ्यांनी हे ध्यानात ठेवावे की, कुओ ऑइल डीलमध्ये पंतप्रधानांच्या कुटुंबियांपैकी कुणी तरी (की संजय ?) नवकोटनारायण बनले हा गौप्यस्फोट इंदिरा गांधींनी जर इंडियन एक्स्प्रेसच्या वार्षिक वृत्तपत्र-कागद-कोट्या-वरील सर्व कर रद्द केले असते किंवा इतरत्र नरमाईने घेतले असते तर झालाही नसता. तो 'इंडिया टुडे' मध्ये शौरींच्या साइमार्फत झालाही असता; पण इंडियन एक्स्प्रेसच्या भोवती जे स्वातंत्र्यवलय (की कुंपण ?) आहे, ते इतरत्र नाही. वास्तविक ते वलय घाणीच्या भोव-तीच्या कड्याप्रमाणे गोएंकानिर्मित धूम्रवलय आहे. शेवटी कोणत्याही शौरीचे स्वातंत्र्य किंवा फॉर दॅट मॅटर, संजय गांधींचे स्वातंत्र्य हे त्यांना हत्यार म्हणून वापरण्याच्या स्वातंत्र्याचे उपांग असते-अॅपेंडेज ! केव्हाही काढून फेकण्यासारखे ! बी बी. सी. इंग्लंड विरुद्ध अर्जेंटिना यांच्या फॉकलंडनिमित्त उद्भवलेल्या लुटुपुटीचा लढाईत अर्जेंटिनाला 'वेटेज' देत होते, ते वस्तुनिष्ठ वृत्तवितरणस्वातंत्र्याचा भाग नव्हता, तर ती थॅचरविरोधी खेळातील चतुर खेळी होती ! इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध घसा ताणून बोलणारे गोएंकांच्या एकछत्री अमलाविरुद्ध 'ब्र' सुद्धा काढत नाहीत. गोएंकांनी भ्रुकुटी फिरवली नी मनेकाच्या तथाकथित अॅबॉर्शनचा 'गर्भित'—सूचित मजकूर सर्वाधिक खपाच्या मराठी वृत्तपत्रात सत्यान्वेषी सावंत माहितीच्या थाटात रविवारच्या पदार्थांप्रमाणे सर्व्ह' केला जातो ! वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य कोणताच कायदा संकुचित करू शकत नाही. कारण Stone walls do not a prison make, nor iron bars a cage. उलट जशा स्त्रीमुक्तीच्या वैरिणी घरोघर नांदत आहेत, त्याचप्रमाणे वृत्तपत्र-स्वातंत्र्याच्या अॅक्सिलरेटरवर पाय ठेवणारे 'वामना' वतार.

## शासनाकडून संकोच ? पवित्राच चुकीचा !

बळींना गाडणे हा त्यांच्या ग्रँड स्कीमचा भाग असतो व त्यांची शूर साधने म्हणजे शौरी. त्यामुळे अक्षौहिणी शौरींचा निःपात केवळ लेखणीच्या एका फटक्यात करण्याचे सामर्थ्य इं. गांधींच्या हाती नसते ते एका गोएंकांच्या हाती असते ! नेहरूंच्या कारकीर्दीत 'एक्स्प्रेस', नेहरूंचा पेपर होता, तो १९६९ नंतर उरला नाही, कारण इंदिराजी व गोएंका दोघांचेही 'टाईमिंग' चुकले. कुओ ऑइल प्रकरण नेटाने रेटणाऱ्याला 'डच्चू' द्या हे सुनेच्या ऑर्डरचे गिलोटीन पडण्याच्या आड बिचारे रॅमन मॅगसेसे आले ! ज्या व्हर्गिजनाही ते मॅगसेसे अॅवॉर्ड मिळाले आहे व जे शौरीच्या पलीकडे एक भिंत बस-तात, त्यांना शौरींना पत्र पाठवावे लागते व व्हर्गिजना प्रिव्हिलेज-ब्रीच (हक्कभंग) व गुप्त कागद कायदा यांची बुजगावणी निर्भय शौरीपुढे नाचवावी लागतात. हे सर्व बिहार प्रेस बिलामुळे घडले की, गोएंका प्रेस-बिलामुळे ? तेव्हा वृत्तपत्रे विरोधी पक्ष वगैरे असतात हे सर्व ठीक आहे; पण अखेर त्यांनाही हितसंबंधांची काटेरी कुंपणे ओलांडता येत नाहीत. वृत्तपत्रस्वातंत्र्य म्हणजे 'चिद्घनचपला' नव्हे, जी विजेप्रमाणे फक्त प्रकाशच जाणते. वर्तमानपत्रे जिथे स्वतः नेमलेल्या सत्यान्वेषकांचा मुखभंग करतात, तिथे शासनाला का निंदायचे ? शासन शेवटी ब्रूट (Brute) फोर्सचे प्रतीक असते. तेच प्रतीक आप-णही थोड्याफार प्रमाणात आपापल्या वर्तुळात असावे, ही गोएंका-सारख्या चाणाक्ष वृत्त-चाणक्यांची मागणी असते आणि अशा मागणी-पोटी शौरीच नव्हे तर स्वातंत्र्यही 'डिस्पेन्सिबल' असते. तेव्हा 'लिटल् नॉलेज इज् ए डेंजरस थिंग' प्रमाणे कोणाच्या ओंजळीतून येणारे स्वातंत्र्यही फारसे कामाचे नसते. जिथे शौरीसारखा विक्रमी पत्रकार इंदिरा-गोएंका बुद्धिबळाच्या खेळातील एक प्यादे किंवा उंट असतो, तेव्हा इतर चाकरमान्या पेनपुशर्सचे काय हो ? स्वातंत्र्याचा संकोच फक्त शास्त्राकडूनच होतो, हा 'स्टान्स' च (पवित्रा) मुद-लात चूक आहे. कारण स्वातंत्र्याचा संकोच असा (म्हणजे हा) एकादा 'विरोधींच्या-विरोधी' सूर लावणारा लेख छापण्याचे नाकारल्यानेही होत असतो. शासक व शासन मुर्दाड व भरड अस-तात, हे एकदम मान्य केल्यावरही, वृत्तपत्रासारखे 'सर्वांचे' व्यासपीठ मानले गेलेले देखील विरोधी सूर ऐकून घेत नाहीत. एवढेच नव्हे तर आपल्या वृत्तपत्राच्या ऑर्केस्ट्रॉविरुद्ध थोडा आवाज उठविणाऱ्यास कचऱ्याची टोपली दाखवितात; मात्र उघड थाट मात्र ' 'समरीचा' दाखवितात हे वृत्त-नट ! अंतिमतः वृत्तपत्रस्वातंत्र्य हे त्यात लिहिणाऱ्याचे व ते वाचून स्वतःची तीही स्वतंत्र मते व मने असणा-ऱ्यांचे असते. नाही तर त्या प्राचीन विदुषीला तिच्या ऋषिपतीने सांगितल्याप्रमाणे प्रत्येक वृत्तपत्र-स्वातंत्र्य-पंडिताची पढिक व पढि-तही तज्ज्ञ मते ऐकून बिचाऱ्या जनतेची आधीच लुळी पडलेली श्रांत मान गळून पडण्याच्या घाईला आल्यावाचून राहात नाही ! वृत्तपत्र-स्वातंत्र्याचे शत्रू वृत्तपत्रात जेवढे आहेत, तेवढे खासच मंत्रालय किंवा सचिवालयात नाहीत. ज्यांना मनःपूर्वक वृत्तपत्रच काय पण कोणतेही स्वातंत्र्य जपायचे आहे ते त्यांनी सरफरोशीकी तमन्ना ठेवूनच 'जब तोप मुकाबिल है तो अखबार' चालवावे ! वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी जोवर शहीद होण्याचे श्रेष्ठ धारिष्ट्य कोणी दाखवत नाही, तोवर ते शासन व मालकांकडून असेच गळचेपी होत राहणार आहे. 'तू टाक चिरून ही मान' ही वृत्ती बाळगणारे पत्रकारच नव्हे, तर कोणीही तुरुंगात डांबून घातले तरी बंडनमिश्राप्रमाणे स्वातंत्र्यस्तोत्रे गात राहतात, तेव्हा तो एक क्षीण आवाज प्रलयाचे साधन बनून, प्रस्थापित जुलमांच्या कानठाळ्या बसविणारी डरकाळी ठरते ! ☐

'अणुबाँबची भयानकता' या लेखाच्या निमित्ताने, वाचकांना चर्चेत सहभागी करून घ्यायच्या कल्पनेला वेगवेगळ्या भागातल्या अनेक वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला.
प्रत्येकानं आपली स्वतंत्र मतं विचारपूर्वक मांडली. मागील अंकात अणुबाँब-वाचकचर्चेचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला.
या अंकात, चर्चेच्या उत्तरार्धात आणखी काही प्रतिक्रिया. याबरोबरच वाचकचर्चा समाप्त.




# अणुबाँब

## वाचक–चर्चा

## अणुबाँब : शोकांतिका होणार ?

**राजेंद्र पवार, कल्याण**

विज्ञान हे काही पूर्णत्वप्राप्त झालेल्या वस्तूंचे एक संग्रहालय नाही तर तो एक प्रगतीचा अव्याहत प्रवास आहे– असं नेहमी म्हटले जाते. जर विज्ञानाने मानवी कल्याणाचा वसा घेतला आहे तर मग विज्ञानाचे एक अपत्य असलेल्या अणुऊर्जेने (खरं तर 'अणुबाँब'ने–) आज माणसाच्या तोंडचे पाणी पळविले आहे– हे कसे काय ? अणु-ऊर्जा म्हणजे केवळ अणुबाँब की तिचा शांततेसाठी उपयोग शक्य आहे ? 'अणुबाँब विरुद्ध माणूस' या विचित्र संघर्षाचा प्रारंभ कोणत्या प्रेरणेतून झाला ? विचित्र अशासाठी की, अणुबाँबचा जनक मानवच व आज मानवी संहाराचा धोकाही अणुबाँबच्याच रूपाने उभा ठाकलाय् ! याला जबाबदार कोण ? वैज्ञानिक की आणखी कुणी ? विकसनशील देशांत अणुऊर्जेसंबंधी काय (हवाल) आहेत ?

या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अणुबाँबच्या निर्मितीचा इतिहास थोडक्यात पाहू या.

लिओ सिलार्ड (Leo Szilard) ह्या शास्त्रज्ञाने असे संशोधन केले की, अणुकेंद्रकावर प्रोटॉनचा मारा करून दोन नवीन अणुकेंद्रके निर्माण करता येतात. दोनाचे चार, चाराचे आठ अशी 'साखळी, प्रक्रिया' पुढेही अखंड चालू रहाते. या साऱ्या प्रक्रियेत प्रचंड अणु–ऊर्जा तयार होते.

इतक्या प्रचंड ऊर्जेचा मानवाच्या विध्वंसासाठी वापर केला जाईल अशी सिलार्डला भीती होतीच. ते टाळावे यासाठी त्याने 'साखळी प्रक्रियेची' माहिती असणारी कागदपत्रे 'ब्रिश नौका युद्ध नियत्रण कचेरीत' एका बंद पेटीत सुरक्षित ठेवली. ते युद्धकाळात प्रसिद्ध न करण्याची दक्षता तेथ घेतली गेली. त्याने क्यूरी नामक शास्त्रज्ञाला सुद्धा अशाच प्रकारे 'साखळीप्रक्रिया' ज्ञान प्रकाशन करण्यावर निर्बंध घालण्यासंबंधी प्रयत्न करावे असे कळविले होते.

असे म्हटले जाते की, विज्ञान व राज्यकर्ते यांची युती होऊ नये. अन्यथा विज्ञान हे राज्यकर्त्यांचे दास्यत्व पत्करते. राज्यकर्ते स्वार्थासाठी विज्ञान वापरतात. याचाच अनुभव ऑगस्ट १९३९ ला आला. आइंस्टाइनने सही केलेलं एक पत्र अमेरिकन अध्यक्ष श्री. रूझवेल्ट यांना आलं. याचा मथितार्थ होता,

'युद्ध गंभीर धोकादायक वळण घेते आहे. आपल्याजवळ अणुऊर्जा आहे युद्धासाठी, अमेरिकेच्या रक्षणासाठी, त्याचा वापर करावा की नाही ? याचा निर्णय वैज्ञानिक अध्यक्षांवर सोपवीत आहेत.

मानवी कल्याणाचा नव्हे तर अमेरिका या केवळ राष्ट्राचा (मानवी समूहाचा) विचार करूनच अणुबांबचा– म्हणजेच 'अणुऊर्जेपासून विध्वंसक अणुबांब'– निर्णय घेतला. मानवाने विनाशाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले.

मानवी समृद्धीचा विचार करणाऱ्या सिलार्डने 'अणुबांब अस्तित्वात येतोय' अशी कुणकुण लागताच जमेल तितक्या ठिकाणी जाऊन आपला कडक विरोध नोंदविला श्री रूझवेल्टना पत्रे लिहिली.मानवी विनाशाचे मूळ असलेल्या अणुबांबची निर्मिती करण्यापेक्षा अणुऊर्जेच्या विध्वंसक शक्तीचे प्रदर्शन करणारे प्रयोग जपान व आंतरराष्ट्रीय– निरीक्षक ह्यांच्या समोर करावेत. 'युद्ध थांबवा, अन्यथा ह्या विध्वंसक शक्तीचा तुमच्याविरुद्ध वापर होईल !' असा इशारा दिला गेला तरी पुरे आहे, असे सिलार्डने म्हटले होते.

अखेर साऱ्या मानवाच्या भवितव्याचा विचार करणारा सिलार्ड अयशस्वी ठरला. माझे राष्ट्र, माझी भूमी या कल्पनांतून अमर्याद राष्ट्रवाद, साम्राज्यवाद ह्यांचे भूत थैमान घालू लागले. त्या प्रेरणेतूनच अणुबांब अमेरिकेने तयार केला. मग भीतीपोटी व स्पर्धेपोटी इतरांनीसुद्धा अणुबांब केले. मानवी प्रगतीस ते पोषक ठरलेच नाही. 'अणुऊर्जेतून विद्युतऊर्जा' व त्याद्वारे प्रगतीचे अनेक दरवाजे खुले करणे– सहज शक्य होते.

खरं तर संरक्षणासाठी अणुबांब तयार केलेत ना ? मग अणुबांबच्या विध्वसकतेस घाबरून 'शांततेसाठी अणुबांब' अशी विसंगत घोषणा देण्याशिवाय आमच्या हाती काहीच उरले नाही– हे कसे काय ? आम्ही हतबल आहोत हासुद्धा आभास तर नाही ? अमर्याद राष्ट्रवाद, साम्राज्यवाद ह्यांची झिंग आजही आहे. 'हे विश्वचि माझे घर'.या तत्त्वानुसार साऱ्या राष्ट्रांत विश्वासाचे वातावरण तयार झाले तर अणुबांब कायमचे नष्ट करून, अणुऊर्जा शांततेसाठीच वापरायची असे ठरवले तरच हे सकट टळेल.

अणुबांबच्या निर्मितीतच शांततेचा खून आहे! तेव्हा 'शांततेसाठी अणुबांब' हे वेडगळपणाचे आहे.

अणुबांबचे युद्ध क्षणार्धात मानवाचा नाश करणारे ठरेल. तेव्हा ते सुरू झाल्यावर 'संरक्षण करणे' हा नव्हे तर 'मरण पत्करणे' हाच एकमेव पर्याय आहे. तेव्हा विकसनशील वा अविकसित राष्ट्रांनी अणुबांब बनविण्यात काय अर्थ उरणार ?

खरे तर ह्या राष्ट्रांची अणुबांबचा खर्च सोसण्याएवढी ऐपत आहे का ? हाच प्रश्न आहे.

ह्या राष्ट्रात बऱ्यापैकी पुढे असणारा विकसनशील भारत आज अणुऊर्जा-विश्वात कोठे आहे, ते पुढील बोलक्या आकडेवारीवरून लक्षात येईल.

शांततेसाठी अणुऊर्जेचा वापर करण्याच्या भारतीय धोरणाची काय दुर्दशा होतेय् ते पहा. राजस्थान ॲटॉमिक पॉवर प्रोजेक्ट– १ चा खर्च ३४ कोटीवरून ७३ कोटीवर गेला तर मद्रास पॉवर प्रोजेक्टचा ६२ कोटीवरून १८८ कोटीवर !! एवढा अफाट खर्च होऊनसुद्धा त्यांची कार्यक्षमता फक्त अपेक्षित कार्यक्षमतेच्या (अनुक्रमे) २५% व ४४% एवढीच आहे. काही प्रोजेक्ट अर्धवट तर काही पूर्ण होऊन जड पाणी व इतर कारणे या सबबीपोटी बंद आहेत. वरील दोन उदाहरणे वानगीदाखल दिली. सुरक्षितता व कार्यक्षमता या दोन्हीबाबत आमची अणुऊर्जाकेंद्रे जगाच्या तुलनेने वाईट दर्जाची आहेत.

डॉ. होमी भाभानी १९८०–८१ सालात भारताने ८००० मेगॅवॅटचे उद्दिष्ट गाठावे असा संकल्प दिला होता. तो डॉ. साराभाईंनी २७०० मेगॅवॅट व तदनंतर १२४२ मेगॅवॅटपर्यंत खाली आणला. आज १९८२ साली आमची प्राप्ती आहे ८७० मेगॅवॅट ! (मूळ उद्दिष्टाच्या जेमतेम ११%) खर्च वाढतोय्. सकल्प कमी होतोय्. ही तर भारतासारख्या 'शांततेसाठी अणुऊर्जा' धोरण स्वीकारणाऱ्या देशाची स्थिती आहे!

पोखरणच्या अणुस्फोटाने प्रगतीत काहीच वाढ झाली नाही, तो सारा खर्च आमच्या राष्ट्रवादास प्रेरक तर प्रगतीस मारक ठरला. कारण तो केला नसता तर वरील उद्दिष्टे काही प्रमाणात गाठली गेली असती– असे बोलले जाते.

आता तर अणुऊर्जेच्या नादी न लागता ऊर्जानिर्मितीचे अन्य मार्ग जोपासणे भारताला परवडण्यासारखे आहे. कारण ' शांततेसाठी अणुऊर्जा' सुद्धा आता पाढऱ्या हत्तीसारखेच आवाक्याबाहेरचे आहे,- हे वरील आकडेवारी सिद्ध करते. मग अणुबांबची बात दूरच !

पहिला अणुबांब वापरला गेला तेव्हा सिलार्डसमोर कुणी तरी म्हणालं की, 'ही वैज्ञानिकाची शोकांतिका आहे!' तेव्हा सिलार्ड उद्गारला 'ही तर साऱ्या मानवाची शोकांतिका आहे!'

... आज प्रश्न आहे, राज्यकर्त्यांनी सुरू केलेल्या ह्या शोकांतिकेचा शोकात्मक शेवट टाळणे त्याच्याच हाती अजूनही असेल तर ते तो टाळणार आहेत का ? की ' नरेचि केला हीन किती नर ' म्हणत विनाशाचे बळी होणेच आमच्या हाती आहे !

# शांततेसाठी अणुबाँब ! योग्यच !

–कल्पना मोडक, देवरुख.

आमच्या नवीन-पिढीला ज्यांचा जन्म स्वातंत्र्यानंतरचा आहे त्यांना- दुसऱ्या महायुद्धातील अणुबांबमुळे झालेल्या विध्वंसाची कल्पना केवळ त्यावरील लेख व पुस्तके यांच्या सहाय्यानेच मिळणे शक्य आहे. नुसत्या वाचनाने त्याबद्दलची वस्तुस्थिती किती भयानक व विदारक असेल हे जाणवते व आम्ही नवीन पिढीतील लोक म्हणतो की, हा विध्वस परत होणार नाही याकरिता आतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न नेहमी होणे आवश्यक आहे.

अणुशक्ती व विध्वंसकता यांचे नाते एकांगी जोडले आहे. कारण अणुशक्तीचा शोध लागला व त्याचा वापर केला गेला विध्वंसासाठी; याची साक्ष देतात जपानमधील नागासाकी व हिरोशिमा शहरे; पण याच अणुशक्तीचा वापर विकासकार्याकरता करता येईल हे जगाला दाखवून दिले डॉ. भाभानी ! आज तरी फक्त विध्वंसक शस्त्रास्त्र-

निर्मिती ह्याच एक उद्देश प्रगत राष्ट्रापुढे दिसतो. नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा विचार करायला प्रगत राष्ट्रे तयार नाहीत. 'अणुशक्तीचा जास्तीत जास्त संशोधनाने मानवी प्रगतीसाठी वापर करणे हा विचारच मागे पडला आहे. त्यामुळे भारतासारख्या ज्या थोड्याफार अविकसित देशांकडून हा प्रयत्न चालू आहे, त्यातही अडथळा निर्माण होतो व यातूनच मला वाटते आपल्या राष्ट्रालाही आमच्या अणुशक्ति-प्रकल्पात अणुबाँब तयार होत नाही हे वारंवार जगातील इतर देशांना पटवावे लागते.

शांततेसाठी अणुबाँब ह्या धोरणात विरोधाभास खासच जाणवतो; पण सध्या जागतिक परिस्थितीचा विचार करता हेच धोरण सयुक्तिक ठरते. आपला देश पूर्वीपासूनच अहिंसातत्त्वाचा पुरस्कर्ता आहे. त्याकरिता पंडित नेहरूंनी पंचशील तत्त्वांचा व अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार केला. आजही आपण त्याचाच पाठपुरावा करतो; पण आज अमेरिका व रशिया या दोन महासत्ता व इतर प्रगत देश संरक्षणाच्या नावाखाली जागतिक वर्चस्वाच्या कल्पनेने प्रेरित होऊन नवीन नवीन संहारक अस्त्रे शोधताहेत. आता अणुबाँब मागे पडला असून त्यापेक्षाही भयानक व कित्येक पटींनी संहारक न्युट्रॉन बाँब, तसेच नवीन तऱ्हेचे बाँब, ज्या बाँबमुळे विशिष्ट प्रकारचे जंतू निर्माण होतील व त्याचा परिणाम त्या ठिकाणापासून जवळजवळ कित्येक शेकडो चौरस मैल परिसर दूषित होतो व त्याचा प्रभाव कित्येक वर्षे टिकून असेल म्हणजे नागासाकी व हिरोशिमा येथे जे घडले ते काहीच नाही, त्याहीपेक्षा संहारक असे घडेल, असा त्याच्या चाचण्या घेणाऱ्या शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. या सर्वांचा अर्थ एकच आहे, प्रत्येक देशाला स्वसंरक्षणाची काळजी घेणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कारण आज शांतता व अहिंसा हे शब्द फोल आहेत असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही आज क्षणाक्षणाला तिसऱ्या महायुद्धाच्या छायेखाली जग वावरत आहे व हा तणाव वाढता आहे. हे स्पष्ट आहे की, क्षुल्लक मतभेदावरून भडका उडेल. साधे उदाहरण इस्राएल व पॅलेस्टिनी गनिमांच्या युद्धाचे देता येईल. ह्या युद्धात दोन्ही महासत्तांनी आपल्याला गोवून घेतले व कोणत्याही क्षणी तिसरे महायुद्ध भडकते की काय अशी भीती निर्माण झाली होती व अशा वेळी यु. नो. चेही काही चालत नाही हे स्पष्ट होते. अशा रीतीने महायुद्धाचे सावट जोपर्यंत आहे तोपर्यंत शांततेसाठी अणुबाँब हे धोरण अयोग्य केव्हाही ठरणार नाही. ह्याचे मर्म जाणूनच पंडित नेहरूंनी डॉ भाभासारख्या शास्त्रज्ञाच्या मदतीने अणुभट्टी–प्रकल्प तारापूर येथे उभारला. अशा रीतीने काळाची गरज ओळखणे अत्यावश्यक आहे.

जणु काही विसाव्या शतकात अणुबाँब ही निर्णायक शक्ती ठरत आहे ही वस्तुस्थिती आहे. नेहरूंसारख्या दूरदृष्टीच्या नेत्यांनी ही गोष्ट ओळखली. आपल्या अणुशक्तीचा वापर संहारक गोष्टींसाठी न करता देशाच्या विकासकार्याच्या दृष्टीने केला जाईल हा मानस बोलून दाखवला. अशा तऱ्हेने अविकसित देशांना जर अणुशक्तीचा वापर करता आला तर तो जागतिक आर्थिक विषमता दूर करण्यासाठी उपकारक ठरेल; पण महासत्ताच्या संघर्षात आपलाही टिकाव लागला पाहिजे ह्या भावनेने जर अणुशक्तीचा वापर फक्त विकासकार्यासाठी न करता अणुबाँबही बनवला तर त्याच्यात वावगे काहीही ठरणार नाही. कारण शेवटी कोणत्याही देशाचे स्वातंत्र्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर ते अबाधित नसेल व त्या देशावर परकीयांची बंधने असतील तर मग विकास, विकासप्रक्रिया वगैरेंना काही अर्थ उरणार नाही. जर असा धोका निर्माण होतो आहे असे दिसले तर स्वाभिमानी राष्ट्र कसे खवळून उठते हे इस्राएलच्या उदाहरणावरून सांगता येईल. ज्या वेळी इस्राएलला आपल्या शेजारी राष्ट्राकडून धोका आहे असा संशय आला त्याच वेळी इस्राएलने इराकने उभारलेल्या अणुप्रकल्पाचा विमानहल्ला करून नाश केला. आधी इस्राएलने याचा सुगावाही लागू दिला नाही. आजमितीला अविकसित देशाचा संरक्षणउत्पादनावरील खर्च हा प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत अत्यंत अल्प आहे; पण तोच त्याच्या अर्थसंकल्पावर भार टाकतो व त्यामुळे विकासकार्यासाठी पैसा कमी पडतो; पण हाही खर्च अत्यावश्यक मानला जातो. कारण स्वसंरक्षण हे किती महत्त्वाचे ठरते याचा अनुभव आपल्याला आहे. कारण १९६२ सालचे चिनी आक्रमण हे आपले दुःखद स्वप्न आहे, ते आपण कधीही विसरू शकणार नाही ! कारण त्या वेळी सुसज्ज युद्धसामुग्रीच्या अभावामुळे आपण पराभूत झालो होतो व युनोच्या हस्तक्षेपामुळे युद्ध थांबले. त्यानंतर चीनकडून नव्हे पण पाकिस्तानकडून वारंवार आपल्यावर आक्रमण होत असते. पाकिस्तानला अत्याधुनिक साधनसामुग्रीची मदत कायम अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राकडून मिळते. अशा परिस्थितीत अत्याधुनिक युद्धसामुग्रीच्या बाबतीत सज्ज रहाण्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय नाही.

## भारत स्वावलंबी व्हावा

या संदर्भात स्वातंत्र्यवीर सावरकराचे विचार मोलाचे ठरतात 'पोकळ अहिंसातत्त्व कामाचे नाही. जर शत्रु बलवान असेल तर आपण आपले संरक्षण करण्यास समर्थ असणे महत्त्वाचे ठरते.' ह्याला आपला प्राचीन इतिहास साक्ष आहे. नालंदा, तक्षशीलासारखी विद्यापीठे शक व हूण यांच्यासारख्या रानटी टोळ्यांनी उध्वस्त केली. संस्कृती व सुसंस्कारित समाजजीवन नष्ट झाले. जे उभे राहण्यासाठी मानवाने कित्येक शतके कष्ट केले, प्रयत्न केले ते एका क्षणात नष्ट झाले. याचाच विचार करता जगातील कित्येक राष्ट्रांनी आपल्या धोरणात बदल केलेला आढळतो. जपान दुसऱ्या महायुद्धकाळात बेचिराख झाले; पण फिनिक्स पक्ष्याप्रमाणे जपानने सर्वच आघाड्यांवर आपली प्रगती साधली व आज संरक्षणविषयक सामुग्रीसुद्धा जपान स्वतः तयार करते. चीननेही आपल्या पूर्वीच्या धोरणात बदल केला. अप्रगत असणारी अरब राष्ट्रे आज पेट्रोडॉलरच्या जोरावर सपन्न बनली आहेत व पेट्रोडॉलरचा वापर करून इस्लामी साम्राज्य स्थापण्याचा जोरदार प्रयत्न करीत आहेत. ह्या सर्व गोष्टींचा विचार करता भारतासारख्या अविकसित राष्ट्राला संरक्षणाच्या बाबतीत शक्य तेवढे स्वावलंबी बनणे आवश्यक आहे. याकरिता आवश्यक वाटल्यास अणुबाँबचीही निर्मिती झाली पाहिजे; पण याचा वापर करताना माणुसकी, मानवी जीवनाचे मूल्य व मागील भीषण इतिहास दृष्टीआड करता येणार नाही व केला जाऊ नये याकरिता यु. नो. सारखी जागतिक पातळीवरील संघटना अत्यंत प्रभावी व निरपेक्ष कार्य करणारी बनणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक पिढीबरोबर मानवी विकास वैज्ञानिक आणि सांस्कृतिक विकासाबरोबर चालू राहणे आवश्यक आहे.

# अणुस्पर्धेत उतरावेच लागेल!

डॉ. उल्हास वैद्य, पुणे

'या चराचर सृष्टीला जन्म देणाऱ्या व तिला प्रकाश, शक्ती व सामर्थ्य देणाऱ्या सूर्याला माझा नमस्कार असो.' असे म्हणून आपण आपल्या दैनंदिन जीवनाला प्रारंभ करतो. ही शक्ती दुसरी-तिसरी कोणी नसून अणुशक्तीच नाही का? ड्युटेनियम या हायड्रोजन अणुभोवती भ्रमण करणाऱ्या ह्या चंद्राच्या मीलनामधून जो प्रचंड स्फोट होतो त्यातून १० कोटी ते २० कोटीपर्यंत उष्णता निर्माण होते. ती उष्णता व तो प्रकाश म्हणजेच आपला सूर्य. अशा प्रकारचे हजारो हायड्रोजन बाँबचे स्फोट सूर्यावर होत असतात व आपल्याला उष्णता व प्रकाश मिळत असतो. असे आहेत आपले व अणूचे संबंध. विध्वंसक तर मुळीच नाहीत; उलट जीवन देणारे, आनंद, ऊब देणारे!

पण छे! असे झाले असते तर कशाला हजारो लोकांची हिरोशिमा व नागासाकीमध्ये राख झाली असती? कशाला लक्षावधी लोकांना लुळे-पांगळे होऊन जगायला लागले असते? का म्हणून अगणित लहान मुले, बालके, वृद्ध-तरुण लोकांना बेघर होऊन देशोधडीला जायला लागले असते?

असे आहे अणुशक्ती व मानवाचे नाते. तिच्या दर्शनाने नम्र व भावनाप्रधान होणारे, तिच्या विध्वंसकतेमुळे भग्न व सैरभैर होणारे व तिच्या फायद्यामुळे स्तिमित होणारे. त्यामुळे अणुशक्ती ही विध्वंसक शक्ती आहे हे पूर्णपणे चुकीचे असून ते विध्वंसक ठरवायचे की नाही त्याचे गणित तुमच्या-आमच्यासारख्या माणसांच्याच हातात आहे.

गरज ही शोधाची जननी आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला जेव्हा युरेनियम, पुटेनियमसारख्या खनिजांच्या विभंजनातून मिळणाऱ्या प्रचंड उष्णता व शक्तीचा अंदाज अमेरिकनांना आला त्या वेळी त्यांचे सर्व लक्ष त्यापासून तयार होणाऱ्या बाँबकडेच लागले. त्यांना हवी होती एक निर्णायक शक्ती जी महायुद्धाला वेगळे वळण लावू शकेल, रोखू शकेल. अमेरिका त्यात यशस्वी झालीही; पण तिला द्यावयाला लागलेली किंमत फार मोठी होती. अणुबाँब तयार करण्याची क्रिया आत्मसात करून इतर राष्ट्रांनी अल्पावधीत सर्व जगाला नाशाच्या कडधावर नेऊन उभे केले आहे.

आज परिस्थिती अशी आहे की, अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स व चीन यांच्याकडे अॅटमबाँबपेक्षा शतपटींनी विध्वंसक असे हायड्रोजन बाँब्स आहेत. इतकेच नव्हे तर या राष्ट्रांच्या दोस्त राष्ट्राकडे वा मांडलिक राष्ट्रामध्ये त्यांनी ते पेरून ठेवले आहेत. काही राष्ट्रांनी स्वतःच्या पैशाच्या ताकदीवर ते विकत घेतले आहेत. मथितार्थ एवढाच की, ह्या पृथ्वीवर सध्या एवढ्या अण्वस्त्रांचा साठा आहे की, ज्यायोगे जग चार वेळा बेचिराख करता येईल!

आता अशा ह्या अत्यंत स्फोटक परिस्थितीत कोणी जर हे सर्व जागतिक शांततेसाठी चालू आहे असे म्हणेल, तर त्याला प्रचाराचा एक भाग ह्यापलीकडे काहीच महत्त्व राहणार नाही. एक गोष्ट मात्र संभवते की, प्रत्येक राष्ट्राकडे अणुबाँब असल्यावर दुसरे राष्ट्र त्यावर वाकडी नजर करण्यापूर्वी दहादा विचार करेल व त्या भीतीतून किंचित शक्यता आहे राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष टळण्याची व एकदम युद्धापर्यंत मजल न जाण्याची; पण ही एक शक्यताच आहे. कारण मानवाच्या हातात अणुशक्तीसारखी विध्वंसक शक्ती येऊन फार काळ लोटलेला नाही. काय सांगावे एखाद्या निराशेच्या क्षणी अथवा दबावापोटी एखादा राष्ट्रप्रमुख सर्वनाश करावयास उद्युक्त झाला तर हे जग बेचिराख व्हायला ५ मिनिटांपेक्षा जास्त काळ लागणार नाही! स्वतःच्या स्थानाला बसलेल्या धक्क्यामुळे चिडून जाऊन अथवा फाजील महत्त्वाकांक्षेपोटी एखादा हुकूमशहा अणुयुद्ध ओढवून घेणे अशक्य नाही. अशा ह्या मानवजातीच्या आयुष्याच्या क्षणभंगुर अवस्थेत कोणी शांतता नांदेल असे म्हणेल तर तो मूर्खाचा तर्कच म्हणावा लागेल!

अणुशक्तीचे फायदेही तसे काही कमी नाहीत. इलेक्ट्रॉनिक इंडस्ट्री, मोठमोठे कालवे किंवा बोगदे खणणे, धरणे बांधण्यासाठी सोइस्कर भूभाग तयार करणे, उष्णतेपासून वीज तयार करणे, समुद्राचे खारे पाणी गोडे करून घेणे, अंतराळसंशोधन वगैरे वगैरे; पण ह्या सगळ्या गोष्टी शेवटी गौण ठरतात. कारण अणुशक्तीची दुसरी बाजू म्हणजे राख!

आज जे अण्वस्त्राविरुद्ध जगभर आंदोलन चालू आहे त्याची परिणती म्हणून जर अण्वस्त्राचे उच्चाटन ह्या जगातून कोठे केले गेले तर तो मानवतेने मानवावर मिळविलेला फार मोठा विजय ठरेल! ही विषवल्ली वेळीच उखडून टाकली पाहिजे. आइनस्टाइन म्हणाला होता की, विसाव्या शतकाने आपल्याला अणुबाँब व गांधीजी दिले. (आता गांधीजी गेले. अणुबाँबही जाईल. नव्हे गेलाच पाहिजे!) गांधीजी गेले; पण त्यांची तत्त्वे जिवंत आहेत. त्यांनी घालून दिलेली निष्ठा, त्यांची आचारप्रणाली अद्याप लोकांच्यात शिल्लक आहे. त्यांनी अवलंबिलेले सत्याग्रहाचे व प्रबोधनाचे मार्ग अजूनही पुसले गेलेले नाहीत. हीच सूत्रे व हीच शस्त्रे वापरून आपण अणुबाँबला कायमची मूठमाती देऊ या!

जॉन केनेडी, भविष्यकालीन दूरदृष्टी असलेला व जागतिक शांततेचा अग्रप्रणेता, ज्याचे नाव आजही जगात अत्यंत वरिष्ठ नेत्यांत घेतले जाते त्याने काळाची पावले ओळखून २५ वर्षांपूर्वीच अण्वस्त्राविरुद्ध नापसंतीचे सूर काढण्यास सुरुवात केली होती. मॉस्कोमध्ये झालेल्या करारानुसार अण्वस्त्रांची चाचणी हवेमध्ये, अंतराळात किंवा पाण्याखाली करण्यास बंदी घालण्यासंबंधी प्रयत्न केले होते; परंतु अशा या शांतिदूताच्या अकाली निधनामुळे ह्या सगळ्यांना तात्कालिक प्रयत्नापलीकडे यश येऊ शकले नाही. त्यानंतर १ जुलै १९६८ रोजी झालेल्या ठरावानुसार अण्वस्त्राच्या प्रसाराला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या मदत करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध कडक उपाययोजना करण्यासंबंधी मसुदे तयार करण्यात आले व त्यावर सही करण्यासाठी सर्व राष्ट्रांना आवाहन करण्यात आले; परंतु त्याला अजिबात यश आले नाही. भारतानेदेखील आजतागायत त्यावर सही केलेली नाही! कारण त्यात ह्या ५ राष्ट्रांकडे असलेल्या या अस्त्रांच्या उच्चाटनासंबंधी काहीच उपाययोजना नव्हती. साहजिकच अशा

एकांगी कराराला सर्वमान्यता मिळणार नाही, हे ओघाने आलेच.

भारतासारख्या विकसनशील परंतु तटस्थ व शांतताप्रिय परराष्ट्रीय धोरण राबवणाऱ्या देशाची ह्या लढाईत फारच कुचंबणा झाली आहे. अणुबाँब किंवा हायड्रोजन बाँब बनविणे इतके खर्चाचे आहे की, त्याचा सर्व देशाच्या विकासावर फार मोठा परिणाम होईल व त्याची परिणती म्हणून अंतर्गत विरोध शिगेला पोहोचेल! मध्यवर्ती सरकार डळमळित होण्याइतके त्याचे धक्के जाणवू लागतील. त्यापेक्षा झाकली मूठ आहे तीच चांगली!

पण जर ह्या सध्या चाललेल्या आंदोलनाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही व विक्रमार्कासारखा इग्लंड-अमेरिकेसारख्या राष्ट्रांनी आपला हट्ट चालू ठेवला तर मात्र सर्व विधिनिषेध गुंडाळून आपल्यालादेखील या अणुस्पर्धेत उतरावे लागेल!

---

# अणुबाँब की मानवसंहार?

**श्री. अनंत धर्माजी तांबे, मुंबई**

---

साम्यवादी व साम्यवादविरोधी राष्ट्रे म्हणजेच साम्राज्यशाही राष्ट्रांच्या सत्तास्पर्धेमुळे आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अंतर्विरोधाने आजच्या जगाला पुन्हा एकदा बेगुमानपणे तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत ढकलण्याचा प्रयत्न चालविला असून संपूर्ण जग अणयुद्धाच्या काळया छायेत वावरत आहे!

आपण सर्व अखिल मानववंशाचे घटक असून मानववंशाला स्वतःचा असा इतिहास आहे आणि तो नामशेष होऊ नये असे प्रत्येकाला वाटणे साहजिकच आहे. पृथ्वीवरील मानवतेच्या भवितव्याचे आज दिसत असलेले निराशाजनक स्वरूप मानवी भवितव्यावर विश्वास असलेल्या सर्व विचारवंताना अत्यंत अस्वस्थ व अंतर्मुख करील यात संशय नाही. जगातील मानवाचे अस्तित्वच मुळी धोक्यात असून अणुयुद्धाचे मानवांवर होणारे संभाव्य परिणाम किती विदारक आहेत याचे आकलन सर्वसामान्य जनतेला झाले तरच तिसऱ्या युद्धाबद्दलच्या मानसिकतेला सांघिकरीत्या विरोध व त्याचा निषेध होईल अशी आशा वाटते.

केवळ प्रचंड संहारकशक्ती हेच अणुबाँबचे वैशिष्टय नव्हे. अणुबाँब व साधा बाँब यातला महत्त्वाचा फरक म्हणजे अणुस्फोटातून वातावरणात फेकले जाणारे न्यूट्रॉन्स आणि गॅमाकिरण. या किरणांचे शरिरावर होणारे परिणाम अतिशय घातुक असतात. हे किरण लाकूड, विटा व साध्या भिंती यातून सहज आरपार जाऊ शकतात. त्यामुळे शरिराचे त्यांच्यापासून संरक्षण करणे जवळजवळ अशक्य असून स्फोटातून बाहेर पडणारे न्यूट्रॉन्स जमिनीच्या ज्या भागावर; अन्नपदार्थांवर किंवा इतर कुठल्याही वस्तूवर पडताच त्या वस्तू स्वतः किरणोत्सर्गी बनतात न्यूट्रॉन्स, गॅमाकिरण किंवा इतर किरणोत्सर्गाने मानवजातीवर होणारे परिणाम अत्यंत दूरगामी असतात. त्यातून ल्युकेमिया–रक्ताचा कॅन्सर व इतर आनुवंशिक रोग निर्माण होऊन मानवाच्या गुणसूत्रांवर (chromosomes) यांचा घातक परिणाम होऊन त्यामुळे विचित्र तऱ्हेची वेडीवाकडी मुले जन्माला येण्याचा धोका असतो. हिरोशिमा–नागासाकी या शहरावर टाकलेल्या अणुबाँबपेक्षा कित्येक पट संहारकशक्ती असलेली अण्वस्त्रे आजच्या प्रगत राष्ट्राकडे आहेत. आता जर पृथ्वीच्या कुठल्याही भागात अणुस्फोट झाला तर त्याचे दूरगामी परिणाम होतीलच होतील; परंतु पृथ्वीतलावरील जिवंत प्राणिमात्राचे अस्तित्वच कदाचित नष्ट होईल!

पाश्चात्य लोकशाही आणि रशियन साम्यवाद या दोन शक्ती आजच्या जगाचे नेतृत्व घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. राजकीय लोकशाही, आर्थिक समता आणि सांस्कृतिक मूल्यांचा मानवी वारसा याची कदर करणाऱ्या व चाड बाळगणाऱ्या जगातील प्रगमनशील शक्तीपुढे या दोन प्रतिस्पर्ध्यांपैकी कोण पत्करावे असा प्रश्न पडला आहे. मूल्यांचे प्रमाण आणि वर्तमानक्रमाचे नियम समान नसल्यामुळे हेतूचे ऐक्य व खरे सहकार्य संभवत नाही. त्यामुळे एकमेकांविषयीच्या शंका व संशय दोघांनाही संत्रस्त करीत असून एकमेकांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न बिनदिक्कतपणे करीत आहेत. आगामी सकटामुळे भीती व अनिश्चितता यानी जागतिक वातावरण कलुषित होऊन गेले आहे. जागतिक क्रांतीचा अंतिम विजय शेवटी आणखी एका महायुद्धावरच अवलंबून आहे, असे मानणाऱ्या क्रांतीच्या कडव्या शक्ती अगदीच तकलुपी, नाममात्र वा आत्मघातकी यशासाठी धडपडत आहेत असे म्हणावे लागेल. मानवजातीवर आजवर कधीही आले नाही अशा प्रकारचे भयानक अरिष्ट आज आलेले आहे. म्हणूनच या अरिष्टमय परिस्थितीत नवी आशा, नवी श्रद्धा, नवे ध्येय, अनुरूप अशा पद्धतीने क्रांतिवादी विचार व व्यवहार याची मांडणी करणाऱ्या नव्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे. आज सुरू असलेला कलह हा क्रांती व प्रतिक्रांती यामधील कलह नसून दोन भिन्न प्रकारच्या राजवटीच्या हितसंबंधातील तो कलह आहे. यातूनच मानवी संस्कृतीचा विनाश करील अशा सर्वंकष, सर्वव्यापी तिसऱ्या अणुयुद्धाची भीती निर्माण झाली आहे. या परिस्थितीतून बाहेर पडायला कोणताच मार्ग नाही काय? आणखी एक संस्कृती विलयास गेली एवढीच निशाणी इतिहासात उरणार काय?

आधुनिक जगात विविध स्वरूपाची वैचारिक कर्मठता आणि अंधविकारवशता आढळते. त्यामुळे सगळीकडे अगदी मायेफिरूपणाचे वातावरण निर्माण होत आहे. या शतकातील 'अणुयुद्धाची भीती' हे त्याचेच द्योतक आहे. विवेकबुद्धीचा आवाज उठवून तिची हाक सर्वत्र ऐकू गेली पाहिजे! आणखी एक महायुद्ध अटळ आहे. ते झाल्यानेच जुने जग नष्ट होऊन नव्याची उभारणी करणे शक्य होईल असे समजणे म्हणजे एक प्रकारचा असहाय व दैववादी दृष्टिकोन स्वीकारणे होय! ते अविचारीपणाचे, बेजबाबदारपणाचे द्योतक असून अशा प्रकारच्या कल्पनेस अजाणतेपणे का होईना, मान्यता देणे हा एक अक्षम्य गुन्हाच होय.

ज्ञानामुळे अणुबाँब जन्माला आला; परंतु त्याचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी करावा की विध्वंसनासाठी करावा हे मानवाच्या प्रज्ञेवर अवलंबून आहे. प्रत्येक मानवाला दुसऱ्याबद्दल वाटणारे प्रेम, बंधुभाव म्हणजेच 'करुणा' होय. मनुष्य एकाएकी शून्यातून भूतलावर अवतरला नाही. भौतिक विश्वातून जीवसृष्टी उद्भवली आणि तिच्या विकासक्रमातूनच मनुष्य उत्पन्न झाला. अशा प्रकारे सृष्टीच्या

कुशीतून निर्माण झालेल्या मानवाचा आपल्या मातेशी असलेला मूळचा नाभिसंबंध तुटलेला नाही.आपले मन, बुद्धि, इच्छाशक्ती या सर्वांसहित मनुष्य हा भौतिक विश्वाचाच एक अंश आहे. विश्व हे नियमबद्ध आहे. म्हणूनच त्याचा अंशरूप जो मानव त्याचे अस्तित्व व परिवर्तन, त्याचे विचार, भावना, इच्छाशक्ती या सर्व नियमबद्ध आहेत. नैतिकतेचा पाया 'बुद्धि' असून 'नीति' हे बुद्धीचेच कार्य आहे. त्यामुळे समाजव्यवस्था हीदेखील नैतिक व्यवस्थाच होय. म्हणूनच माणसात या त्याच्या स्वाभाविक बुद्धिप्रधानतेची जाणीव निर्माण करणे हाच साऱ्या सामाजिक प्रयत्नांचा हेतू असला पाहिजे. मानव-निर्मित यंत्र व तंत्रविज्ञान आधुनिक संस्कृतीचा भस्मासुर न ठरता मानवाला उपकारक अशा दृष्टिकोनातून त्यांचा उपयोग व्हायला हवा म्हणजेच त्याच्या योगाने मानवाच्या स्वातंत्र्याचा, व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला पाहिजे. अनैतिक साधनांनी साध्य निश्चितपणे भ्रष्ट होते हे आता अनुभवसिद्ध सत्य आहे!


महायुद्धाचे हे भयानक संकट टाळावयाचे असल्यास मानवी बुद्धि-चातुर्य आणि सर्जनशीलता यावर आपली श्रद्धा अचल ठेवून सामाजिक न्यायावर आधारलेली नवी समाजरचना स्थापण्याच्या कामी प्रत्येकाने अग्रेसर असले पाहिजे. असे अग्रेसरत्व पत्करणाऱ्यांनी भविष्यवादी विचारसरणीच्या नियतीवादाविरुद्ध बंड उभारून समाज-रचनाशास्त्रामध्ये स्थापत्यविशारदाप्रमाणे शास्त्रशुद्ध व आस्थापूर्वक लक्ष घातले पाहिजे की, ज्यात व्यक्तिस्वातंत्र्य आणि नियोजन, व्यक्तीचे स्वायत्तत्व आणि सामुदायिक कल्याण व प्रगती यांचा समन्वय साधेल. प्रज्ञा–करुणा–मैत्री या भगवान बुद्धाच्या त्रिसूत्राचे आजच्या मानवजातीने अनुसरण केले तरच आजचा मानववंश आण्विक–युद्धाच्या विनाशातून बचावेल. जगाला 'बुद्ध किंवा युद्ध' या दोहोपैकी एकाला निवडावे लागेल! अन्यथा राष्ट्राराष्ट्रातील आंतर्यादवीने व कलुषित वातावरणाने जगाचे काय होईल याची भीती सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये घर करून राहील. एखाद्या राजवटीमध्ये नैतिक तत्त्वे व परंपरागत मानवी मूल्ये यांच्याशी पूर्णतया विरोधी स्वरूपाचा व्यवहार स्थिरावला म्हणजे साधनांनी तेथील साध्याचा नाशच केला असे म्हणावयास हरकत नाही. वैचारिक गोंधळ, आध्यात्मिक अराजक, भावनांचे वैफल्य आणि नैतिक अधःपतन यांच्या गर्तेतून पृथ्वीवरील मानवसमाजाने बाहेर आले पाहिजे. मानव हाच स्वतःच्या विश्वाचा शिल्पकार आहे, या मूलभूत ऐतिहासिक सत्यावर भर देणे हेच बुद्धाच्या क्रांतिकारक व विमोचक, सामाजिक व आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे मुख्य कार्य आहे. ज्यांना आपल्या सर्जनशील आत्मशक्तीचा प्रत्यय आलेला आहे, विश्वाची नवरचना करण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने जे प्रेरित झाले आहेत, धाडसी विचारांनी जे संचरित झाले आहेत आणि स्वतंत्र मानवाचा बनलेला स्वतंत्र समाज निर्माण करण्याच्या ध्येयाची ज्योत ज्यांच्या अंतःकरणात प्रज्वलित झाली आहे, अशांची संख्या निर्माण होणे अगत्याचे आहे. योग्य-अयोग्य, कुशल–अकुशल यात जोवर व्यक्ती तारतम्य दाखवू शकणार नाही व निवड करू शकणार नाही तोवर चांगला समाज निर्माण होऊ शकणार नाही. वैयक्तिकरीत्या स्त्री-पुरुषांना आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली पाहिजे. विवेकपूर्ण व तारतम्याने आपल्यापुढील राजकीय, सामाजिक व नैतिक प्रश्नांवर निर्णय घेण्याच्या आपल्या सामर्थ्याचा त्यांना प्रत्यय आला पाहिजे. असे झाले तरच कालांतराने मानसिक विकारांना आणि हीन भावनांना आवाहन देऊन जागतिक संतुलन नष्ट करण्याचे राजकीय चांडाळचौकडीचे सामर्थ्य संपुष्टात येईल!

## हा तर निर्णायक क्षण!

आता महायुद्ध झालेच तर सर्व जगाचा आत्मघातच होईल! मानववंशाचे अस्तित्व पृथ्वीवर ठेवावयाचे असल्यास ज्या गोष्टीमुळे राष्ट्रा-राष्ट्रात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होईल अशा प्रकारचे समज व संकल्पना सोडून देण्यास आपण तयार असले पाहिजे. कधीच अणुयुद्ध होऊ न देण्याची नीती सर्व राष्ट्रांनी अंमलात आणावी. या निर्वाणीच्या निर्णयाप्रत सर्व मानवजात येऊन ठेपली आहे. कोणत्याही राष्ट्राने अणुबाँब व अणुबाँबसदृश शस्त्रे वा अस्त्रे बनवू नयेत म्हणजे एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राबद्दल वाटणारी भीती, असुरक्षिततेची भावना व असूया निर्माण होणार नाही व 'जय–पराजया' बद्दलचा प्रश्नच निकालात निघेल. आण्विक शक्तीचा उपयोग मानवी कल्याणासाठीच करावा. विशेषतः तटस्थ राष्ट्रांनी 'जागतिक युद्ध' उद्भवूच नये यासाठी सांघिकरीत्या सर्वशक्तीनिशी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे अत्यावश्यक आहे. कारण जर युद्ध पेटलेच तर तटस्थ राष्ट्रांतील मानवप्राणीसुद्धा नष्ट होतील! साम्राज्यशाही राष्ट्रे असोत वा भांडवलशाही राष्ट्रे असोत, त्यांच्यातील मतभेदांना प्रत्येक राष्ट्राला आपल्या बाजूने समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही तरी युद्ध म्हणजेच काही मतभेदांवरील अंतिम उपाय होऊ शकत नाही, पोलादी पडद्याच्या दोन्ही बाजूंच्या राष्ट्रांच्या प्रश्नाचा सामंजसपणे व निःपक्षपातीपणे विचारविनिमय करून तटस्थ राष्ट्रांनी प्रस्ताव बनवावे व अखिल मानवजातीचे भवितव्य लक्षात घेऊन सुज्ञ तडजोड करण्याच्या दृष्टीने दोनही बाजूंच्या सामर्थ्यशाली राष्ट्रांच्या सरकारांना पाचारण करावे व समाजामध्ये जागृती करावी.

अगणित शतके सूर्य-चंद्र प्रकाशले, अस्ताला गेले. रात्री चांदण्या अविरत चमकत राहिल्या; परंतु मानवाच्या अस्तित्वाबरोबरच त्याचेही अस्तित्व उदयास आले. तदनंतरच्या ६००० वर्षांच्या मानवी अस्तित्वाच्या काळात मानवाने वैश्विक इतिहासात स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले. निसर्गाची दुर्गम गुपिते शोधून काढून मानवाने आपल्या सुखात उत्तरोत्तर भरच घातली आहे. मानव-जातीला ललामभूत असलेल्या अशा कला, साहित्य-शास्त्र, तत्त्वज्ञान व विज्ञान यांच्या सर्व शाखांमध्ये अत्युच्च भरारी मारून अखिल मानवतेसाठी अमूल्य ठेवा जतन करून ठेवला आहे. म्हणूनच दोनचार मनोविकृतींनी पछाडलेल्या माणसांच्या भावनाविवशतेस वश होऊन पृथ्वीतलावरील सजीव प्राणी नष्ट करण्याचा मूर्खपणा कोणी करील काय? नष्ट होणाऱ्या प्राण्यांमध्ये केवळ मानवच नसतील; परंतु ज्यांचा साम्यवादाशी वा साम्यवादविरोधाशी काडीमात्र संबंध नाही अशी जनावरेही नष्ट होतील! आपण आपली भांडणे व क्षुल्लक मतभेद विसरू शकत नाही म्हणून ज्ञान व प्रज्ञेमुळे अखिल मानवविश्वाच्या सुखात होत असलेली वृद्धी विसरून सर्वनाश ओढवून घ्यावा काय, हाच खरा प्रश्न आहे. मानवतेच्या दृष्टीने अशी प्रार्थना करावीशी वाटते की, मानवा–मानवातील, राष्ट्रा–राष्ट्रांतील सर्व प्रकारचे मतभेद विसरून मानवांच्या प्रथम कल्याण, मध्य कल्याण व अंतिम कल्याणासाठी सर्वांनी झटायचे आहे व सर्व प्रयत्नांचे हेच उद्दिष्ट आहे-उद्दिष्ट असले पाहिजे! मानवी इतिहासात मानवी अस्तित्वाचा निर्णायक क्षण येऊनही पृथ्वी सूर्याभोवती फिरती ठेवू या!

[ समाप्त ]



# महात्मा आणि माणूस

१९३१ च्या एप्रिल महिन्यात व्हाइसरॉय बदलला. लॉर्ड आर्यविनच्या जागी लॉर्ड विलिंग्डन आले.
व्हाइसरॉय सिमल्यात येणार होते. त्यांच्या आगमनाची वेळ साधून शिररही सिमल्यात पोहोचले.
गांधीही थोड्या दिवसांनी सिमल्याला जाणार होते.
१९२१ नंतर गांधी प्रथमच सिमल्यात येत होते.
आठ-दहा वर्षांनंतर हे पहाडी लोक या महात्म्याचं स्वागत कसं करताहेत हे पहायला शिरर डोंगर उतरून कलकाला गेले.
प्रत्येक नाक्यावर त्यांच्यावर फुलांचा वर्षाव होत होता.
लोक घोषणा देत होते, ' बेताज बादशा की जय ! '

गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वी गांधींना हिंदू-मुस्लिम प्रश्न सोडवायचा होता; पण सिमल्याची मुस्लिम नेत्यांची बैठक निष्फळ ठरली.
शिरर व्हिएन्नाला जायची तयारी करत असतानाच त्यांना गांधींबरोबर लंडनला जायची संधी मिळाली.

**' गांधी–अ मेमॉर '–विल्यम शिरर**
**लिखित पुस्तकाचा परिचयात्मक**
**संक्षेप व स्वैर रूपांतर**

**भाग आठवा । निखिल वागळे**

अकरा सप्टेंबरला मी गांधींना मर्सेलिसमध्ये गाठलं. ऐन पहाटे त्यांची बोट त्या प्रशस्त बंदरात शिरली. गांधी बोटीच्या डेकवर एकटेच उभे होते. थंडीचा एवढा कडाका असूनही त्यांच्या खांद्यावर फक्त एक सुती शाल ! प्रकृती मात्र पूर्वीपेक्षा खूपच सुधारलेली वाटली. बोटीचा प्रवास त्यांना मानवला होता.

बंदरावर जमलेले हजारो फ्रेंच पाहून गांधींना आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. त्याहीपेक्षा ते चक्रावले पत्रकारांनी केलेल्या स्वागताने. शेकडो अमेरिकन, युरोपिअन वार्ताहर–छायाचित्रकारांनी त्यांना बोटीवरच घेरलं. प्रचंड आरडाओरड आणि रेटारेटीचा हा अनुभव नवा होता. भारतात फारच थोडे परदेशी पत्रकार गांधींनी पाह्यले होते. पत्रकारांचे प्रश्न त्या गडबडीत गांधींना ऐकू येत नव्हते आणि गांधींचं बोलणंही त्यांच्यापर्यंत पोचत नव्हतं.

अखेर ते आपल्या केबिनमध्ये परतले.

योगायोगाने मीही तिथे पोचलो. गांधींनी माझं हर्षभरानं स्वागत केलं. सतरा वर्षांनी युरोपच्या भूमीवर ते पाऊल ठेवत होते. काहीसे भारावले होते.

' लंडनला जाऊन काय करणार ? ' असं मी त्यांना विचारलं तेव्हा त्यांचा आवाज नेहमीपेक्षा खूपच मृदू झाला. अर्थात त्यातही एक निश्चयीपणा होता. त्यांची भूमिका अधिक कणखर बनल्याचं मला जाणवलं. अगोदरच ब्रिटिश सरकार अंतर्गत प्रश्नाला त्रासलं होतं. बेकारी, सामाजिक तणावांबरोबरच पौंडाची किंमतही दिवसेंदिवस घसरत होती. गांधींच्या धूर्त राजकारणी नजरेतून हे कसं सुटणार ? आता पूर्ण स्वराज्याशिवाय काहीही स्वीकारायची त्यांची तयारी नव्हती.

' पण तुम्हाला फार आशा बाळगता येणार नाही ! ' मी म्हटलं.

' मी नेहमीच आशावादी असतो हे तुम्हाला माहितीय. ' ते खट्याळपणे हसत म्हणाले, ' अजून नेमका भूप्रदेश नजरेच्या टप्प्यात येत नाही हे खरं; पण कोलंबसाला तरी तो शेवटच्या क्षणापर्यंत कुठे दिसला होता ? '

मग आमच्या गप्पा इतर गोष्टींकडे वळल्या.

' गोलमेज परिषदेत भाषण करायचाही माझा विचार नाही; पण लँकेशायरच्या गिरणी–कामगारांपुढे माझी बाजू मांडायचा मी प्रयत्न

करीन. भारतातल्या परदेशी कापडावरच्या बहिष्कारामुळं त्यांच्या नोकऱ्या गेल्यात; पण भारताला स्वातंत्र्य दिलं गेलं तर हा बहिष्कार संपेल आणि त्यांच्या गिरण्या पुन्हा चालू होतील असं मी त्यांना सांगेन !' गांधी म्हणाले. जणू काही त्यांच्यातला 'बनिया'च जागा झाला होता.

आम्ही बोलत असताना गांधीचे सहकारी सामानाची हलवाहलव करत होते. चरखे, सुती कपडे, गांधींची जेवणाची भांडी, बेडिंग वगैरे मोजकंच सामान. काही जण बोटीच्या फ्रिजमध्ये ठेवलेली शेळीच्या दुधाची भांडी आणायला गेले होते.

बाजूला सरोजिनी नायडू आणि मिस स्लेड बसल्या होत्या. नायडूंची केशरी साडी त्यांच्या सौंदर्यात भर टाकत होती. मधूनच आमचा हास्यविनोद चाले.

'तुम्ही खास पहिल्या वर्गातून प्रवास केलात म्हणे !' मी त्यांना चिडवण्याच्या सुरात म्हटलं.

'अर्थातच!' त्या फटकन म्हणाल्या, 'त्या गलिच्छ तिसऱ्या वर्गातून प्रवास करणं आपल्याला नाही बाई जमत !'

गांधींनी त्यांच्याकडे रोखून पाहिलं. थोडं थांबून ते म्हणाले, 'आमच्यासारखं रहायला तुला कधीच जमणार नाही !'

'कशासाठी जमायला हवं ?' नायडूंनीही माघार घेतली नाही.

माझ्या एका प्रश्नाला उत्तर देताना गांधी म्हणाले, 'मला अमेरिकेला जायला आवडेल; पण आताची वेळ योग्य नाही.'

त्यावर नायडू म्हणाल्या, 'मी मात्र अमेरिकेला जाणार आहे. त्याआधी ब्रिटिशांनी मला तुरुंगात टाकलं तर प्रश्नच नाही आणि मी तिथे गेले तर काही नुसती कवितेवर बोलणार नाही बरं !'

मिस स्लेडशी मी काही वेळ बोललो. त्यांचा भावशून्य चेहरा आणि साफ बोडकं डोकं यामुळं त्या एखाद्या भुतासारख्या दिसत होत्या !

'युरोपात परत येण्याचा अनुभव कसा काय वाटतोय?' मी त्यांना विचारलं.

त्यांचा चेहरा अधिक उदास झाला.

'फार काही रोमहर्षक अनुभव नाही.' त्या म्हणाल्या, 'सहा वर्षं झाली मला युरोप सोडून. फार सुखाचा काळ होता हा सहा वर्षांचा. माझं इंग्लंडमधलं पूर्वायुष्य कधीच इतिहासजमा झालंय. खरं तर मला परतायचंही नव्हतं. गांधीजींनी सांगितलं म्हणून मी आले. यानंतर पुन्हा मात्र कधीच येणार नाही !'

मिस स्लेड लंडनमध्ये आपल्या आईला भेटणार होत्या. त्यांच्या त्या अजब भेटीचं दृश्य डोळ्यापुढं आणायचा प्रयत्न करत मी हॉटेलात परतलो. तसाच गांधींची मुलाखत लिहायला बसलो. ताबडतोब तार करायला हवी होती.

गांधी त्या दिवशीच लंडनकडे प्रयाण करणार होते. त्यांच्याबरोबर प्रवास करावा या विचारानं मी नंतर तिकिट काढायला गेलो तर तिथला व्यवस्थापक म्हणाला, 'माफ करा, बोटीवरच्या प्रवाशांखेरीज इतर कुणालाही तिकिट न देण्याचा सक्त आदेश आहे !'

'पण मी पत्रकार आहे. गांधींच्या दौऱ्याचा वृत्तांत मला पाठवायचाय. तुम्ही तिकिट दिलं नाही तर आम्ही काय करायचं ?' मी विचारलं.

'माफ करा; पण मी तुम्हाला तिकिट देऊ शकत नाही !' तो नम्रपणे म्हणाला. त्याचाही इलाज नव्हता. लॉर्ड इंचकेपचाच तसा आदेश होता. बोटव्यवसायाचा तो मालक होता आणि गांधींचा कडवा विरोधक होता. त्यांच्या नियमाला ब्रिटिश पत्रकाराचाही अपवाद नव्हता.

मी त्या व्यवस्थापकाकडे माझा निषेध नोंदवला. काहीशा वैतागानेच टॅक्सी पकडली आणि हॉटेलात परतलो. गांधींच्या लोकप्रियतेला बांध घालण्याच्या ब्रिटिश-प्रयत्नांना मार्सेलिसमध्येच सुरुवात झाल्याचं मात्र मी नोंदलं.

गांधी आणि त्यांचा लवाजमा त्याच हॉटेलात उतरला होता. मी त्यांना भेटायला गेलो.

'माफ करा, मी तुमचा पुन्हा वेळ घेतोय.' मी त्यांना म्हटलं. सकाळी मी त्यांच्याशी बराच वेळ गप्पा मारल्या होत्या; 'पण तुम्हाला प्रसिद्धी मिळू नये म्हणून ब्रिटिश अधिकारी पत्रकारांवर बंधनं घालताहेत.'

काय घडलं हे मी त्यांना सांगितलं. त्यानाही उत्सुकता होतीच.

'त्यांनी तुम्हाला तिकिट दिलं नाही ?' त्यांनी विचारलं.

'छे ! नकार दिला त्यांनी.' मी उत्तरलो, 'एकाही पत्रकाराला तुमच्याबरोबर यायला मिळणार नाही असं ते म्हणाले.'

मग एकही शब्द न बोलता गांधी आपल्या बॅगेकडे वळले. बॅगेत कागदपत्रं खच्चून भरली होती. त्या ढिगातून त्यांनी एक लांबलचक पाकीट शोधलं आणि त्यातून एक तिकिटाचा जुडगा काढला.

'ही घ्या तुमची तिकिटं !' त्यांनी दोन तिकिटं माझ्यापुढं धरत म्हटलं.

मी त्यांना पैसे द्यायला पाकीट काढलं.

'आता याचे किती पैसे ते मला विचारू नका !' ते हसले. महादेवभाई देसाईंकडे त्यांनी हे हिशोबाचं काम सोपवलं.

संध्याकाळी आमच्या गाडीनं मार्सेलिस सोडलं तेव्हा तिथलं दृश्य मोठं मजेशीर होतं. माझ्या अनेक पत्रकारमित्रांना तिकिटं मिळाली नव्हती. मला गाडीत पाहून त्याचे चेहरे असे काही झाले की विचारू नका !

माझ्याबाबतीत ही जवळीक गांधींनी पहिल्यापासूनच दाखवली होती. मार्सेलिसमधला त्यांचा कार्यक्रम भरगच्च होता. हजारो तारांना उत्तरं द्यायची होती, दुसरीकडे शहरातल्या एका अधिकृत समारंभात भाषण करायचं होतं. पाहुणे तर सतत येत होते. गोलमेज परिषदेतल्या इतर प्रतिनिधींशीही बोलायचं होतं; पण या धबडग्यातूनही गांधींनी माझ्यासाठी वेळ काढला.

गाडीनं वेग घेतला तसा मी त्यांच्या डब्याकडे गेलो. फ्रान्समधली हिरवीगार शेतं निरखत ते सूत कातत होते.

मी परतलो आणि बातमीपत्र लिहायला बसलो. एका हमालाला तीन-चार फ्रॅंक्स दिले आणि ते स्टेशनमास्तरकडे सोपवून पुढच्या स्टेशनवरून पॅरिसला तार करायला सांगितली.

शांतता जोपासणारा तो दिवस होता. माझं त्या दिवशीचं बातमीपत्र हे शिकागो ट्रिब्यूननं पानभर जाहिरात करावी असं 'स्कूप' होतं. त्याबद्दल माझ्या संपादकांकडून मला निश्चितच अभिनंदनाची तार येणार होती !

◻

गांधीच्या लंडनमधल्या वास्तव्यालाही अनोखेपणाचा स्पर्श होता. त्या राजेशाही राजधानीनं असा अनुभव कधीच घेतला नव्हता. हुजुरांच्या काही वृत्तपत्रांनी जाणूनबुजून गांधींचं महत्त्व कमी करायचा प्रयत्न केला; पण त्या काळात गांधी हा सर्वसाधारणपणे वृत्तपत्रांच्या मथळ्याचा विषय होता जिथं जावं तिथं पत्रकार आणि छायाचित्रकारांची झुंबड! जमावाचंही तेच. गांधींनी ब्रिटिश साम्राज्याला आव्हान दिलं याचं जणू या मंडळींना सोयरसुतकच नव्हतं.

गांधीच्या दृष्टीनंही सगळं बदलल्यासारखंच होतं. १८८७ मध्ये ते पहिल्यादा इथे आले तेव्हा त्यांना कुणीच ओळखत नव्हतं. कुणी दखल घ्यावी असं त्यांचं व्यक्तिमत्त्वही नव्हतं. १९१४ मधलं इथलं वास्तव्य मात्र थोडं वेगळं होतं. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांसाठी झगडणारा नेता म्हणून त्यांना लोक ओळखत होते. आता मात्र त्यांची प्रतिमा जागतिक होती.

पंचा गुंडाळणारा हा म्हातारा लंडनवासियांना विक्षिप्त वाटत होता. गांधी मात्र त्या गोठवणाऱ्या थंडीतही फक्त शाल पांघरून होते. चेहरा सतत हसतमुख आणि तोंडी प्रेमअहिंसेचा उपदेश!

गांधींच्या पोशाखाची चेष्टा करू नये असं आवाहन काही वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांना केलं होतं. संडे टाइम्सनं त्यांच्या आगमनाच्या दुसऱ्याच दिवशी लिहिलं होत, 'गांधीच्या पोशाखामु त्यांची गंमत करावी असं काहीजणांना वाटेल; पण त्यांनी स्वतःला आवर घालणं इष्ट ठरेल!'

तरी त्यांच्या पंचाकडे बघून काहीजणांनी शेरेबाजी केली. विशेषतः ते बकिंगहॅम पॅलेसमध्ये, राजाला भेटायला गेले तेव्हा गांधीनी अशा वेषात जाणं हा काही ब्रिटिशांना राजाचा अपमान वाटला.

'पंचा नेसून बकिंगहॅम पॅलेसमध्ये जाणं तुम्हाला योग्य वाटतं?' एका पत्रकारानं विचारलं.

'होय! पुन्हा राजानं आम्हाला दोघांना पुरतील एवढे कपडे घातले आहेतच की!' गांधीनी टोमणा मारला.

याआधी सुएझला बोट थांबली तेव्हाही गांधीच्या कपड्यांबाबत असाच प्रसंग घडला होता. एका निवृत्त कर्नलनं गांधीना एक सिल्कचा पेटीकोट पाठवला आणि सोबतच्या चिठ्ठीत म्हटलं, 'तुमचा नागडेपणा झाका!' गांधीनी अर्थात त्याची चेष्टा केली असं मला त्यांच्या एका नोकरानं सांगितलं.

गांधीची गाडी व्हिक्टोरिया स्टेशनवर पोचली तेव्हा हजारो भारतीय आणि ब्रिटिशांना समुद्रच समोर पसरल्याचं त्यांना दिसला. फॉकस्टोनला मात्र इंडिया ऑफिसच्या अधिकाऱ्यांनी गांधीवर मोटारीतून प्रवास करायची सक्ती केली. लँकेशायरच्या गिरणीकामगारांची त्यांच्याविरुद्ध उग्र निदर्शनं व्हायची शक्यता होती, ती टाळण्यासाठी ही खबरदारी घेण्यात आली होती. सुरक्षेचा उपाय म्हणून गांधीच्या दोन्ही बाजूला स्कॉटलंड यार्डचे गुप्तहेर होते. सहाजिकच गांधी किंग्जले हॉलला पोचेपर्यंत त्यांची फारशी कुणी दखल घेतली नाही.

तिथे शंभरेक लोक त्यांच्या स्वागताला उभे होते. विविध राजकीय पक्षांचे नेते, राजा, सरकार आणि चर्चचे प्रतिनिधी त्यांची वाट पहात होते. दीडेक हजाराच्या घरात त्यांची संख्या असावी.

प्रवासानं गांधीना थकवा आला होता. बसूनच ते बोलले; पण त्यांच्या आवाजाची धार जबरदस्त होती.

'लक्षावधी मुक्या, अर्धपोटी लोकांसाठी स्वातंत्र्य मिळवायला मी आलोय!' त्यांनी सुरुवात केली. 'मी भारताचा खराखुरा प्रतिनिधी आहे. मी सौदा करायला आलेला नाही. काँग्रेसच्या तत्त्वानुसार वागायची मुभा मला आहे!'

पूर्ण स्वराज्य वगैरे बरंच काही ते बोलले.

'तुमच्या आर्थिक अडचणी मला माहीत आहेत; पण भारत आणि लंडन जोपर्यंत समतोल होत नाहीत तोपर्यंत अंदाजपत्रकाचा तोलही खऱ्या अर्थानं सांभाळता येणार नाही!' ते म्हणाले.

त्याचे शब्द नेमके, थेट होते. तो टोकदारपणा जमलेल्यांना बोचला. गांधीनी अधिक मुत्सद्दीपणे वागायला हवं होतं असं त्यांच्या काही हितचिंतकांनाही वाटलं.

नंतरच्या प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात कुणी तरी त्यांना विचारलं, 'गोलमेज परिषद सोमवारी सुरू होतेय. तुमचा तर तो मौनाचा दिवस! मग तुम्ही बोलणार की नाही त्या दिवशी?'

'नाही!' गांधीच्या चेहऱ्यावर एक बालिश हास्य उमटलं. 'मी मौन पाळीन. त्यामुळं मला इतरांचं म्हणणं अधिक चांगल्या प्रकारे ऐकता येईल!'

त्यांनी आपला शब्द पाळला. परिषदेच्या उद्घाटनाच्या दिवशी सेंट जेम्स पॅलेसमध्ये मोठा समारंभ झाला. पंतप्रधान आणि लॉर्ड चॅन्सेलर सँकी यांनी स्वागतपर भाषणं केली. काही भारतीय प्रतिनिधीही बोलले. गांधी शांतपणे सारं ऐकत होते.

दुसऱ्या दिवशीचं त्यांचं भाषण मात्र वादळी होतं. नेहमीप्रमाणे एकाही टिपणाचा आधार न घेता ते बोलले. त्यांच्या आवाजात नम्रता होती. प्रत्येक शब्द ते काळजीपूर्वक उच्चारत होते. त्या घाटाचं वक्तृत्व मी कधीच ऐकलं नव्हतं. एका वेगळ्या उत्तुंगतेकडे गांधीचा प्रवास चाललाय असं त्या वेळी मला वाटलं.

'आजचे गांधी महात्मा नव्हते, तर एक समर्थ राजकारणी होते. प्रत्येक संधीचा उपयोग ते करून घेताना दिसत होते.' मी त्या वेळच्या माझ्या टिपणात नोंदलंय.

लॉर्ड रीडिंग, लॉर्ड सँकी हे तर कायदेबाजीत मुरलेले लोक; पण गांधीच्या भाषणानं तेही भारावले होते, खिळल्यासारखे बसून होते. मंत्रिमंडळातले, संसदेतले अनेक नेते त्या वेळी सेंट जेम्स पॅलेसमध्ये

'लक्षावधी मुक्या, अर्धपोटी लोकांसाठी स्वातंत्र्य मिळवायला मी आलोय!' त्यांनी सुरुवात केली. 'मी भारताचा खराखुरा प्रतिनिधी आहे. मी सौदा करायला आलेला नाही. काँग्रेसच्या तत्त्वानुसार वागण्याची मुभा मला आहे!'

हजर होते. जिवाचा कान करून ते या लहान खुज्या क्रांतिकारकाचे शब्द साठवून घेत होते.

भाषणातला कडकपणा मात्र त्यांना अनपेक्षित होता. त्यातलं ब्रिटिश सरकार आणि साम्राज्याला दिलेलं आव्हान, भारतातल्या ब्रिटिश राजवटीचं वर्णन आणि स्वातंत्र्याची मागणी त्यांना धक्कादायक वाटली. बेन फ्रँकलिननं दीड शतकापूर्वी असं धैर्य दाखवलं होतं. त्यानंतर गांधींचाच क्रम होता !

'तलवारीच्या जोरावर भारतातलं तुमचं राज्य टिकवलं गेलं आहे !' गांधींनी त्यांना सुनावलं. 'योग्य तो पर्याय तुम्हालाच निवडायचा आहे. गुलाम पण बंड करू पहाणारा भारत हवा की ब्रिटनच्या सुखदुःखात भागीदार असा भारत हवा ?'

गांधी थांबले. ब्रिटिश प्रतिनिधींकडे पाहून हसले. त्यांचे चेहरे आक्रसले होते.

काय मनात होतं गांधींच्या ? ब्रिटिशांना कोंडीत पकडणं ? हलाखीची आर्थिक परिस्थिती, नौदलातलं बंड, खाण-कामगारांचा संप, बेकारी यांच्या चक्रात अडकलेल्या ब्रिटिशांच्या दुर्बलतेचा फायदा घेणं ?

गांधींचं हास्य त्या वेळी ब्रिटिश प्रतिनिधींना जास्तच भेदक वाटलं असेल ! एका समान पातळीवरून भारताबरोबर काम करायची कल्पना त्यांना असह्य होत असावी ! गांधी मात्र नेमका याच मुद्द्यावर जोर देत होते. दोन्ही देशांनी एकत्र काम केलं तर भवितव्य कसं उज्ज्वल आहे याचं चित्र रंगवायला त्यांनी मग सुरुवात केली.

त्यानंतर कर्ज, सैन्य, आर्थिक नीती वगैरे बाबतच्या धोरणावरही ते बोलले. तपशिलाबाबत मात्र त्यांनी ठामपणे सांगितलं, 'आधी ब्रिटिश सरकारची काय द्यायची तयारी आहे हे आम्हाला कळलं पाहिजे. ते जर स्वीकारार्ह असेल तर तपशिलाची चर्चा करणं फारसं अवघड नाही !'

ब्रिटिश मुत्सद्देगिरीत मात्र सुतराम फरक दिसत नव्हता. पंडित मदन मोहन मालवीयांनी गांधींना पाठिंबा देणारं भाषण केल्यावर गृहसचिव सर सॅम्युअल होअर उठले आणि म्हणाले, 'नव्या प्रतिनिधींची स्पष्ट मतं ऐकून मला आनंद झाला. काही वादग्रस्त प्रश्न त्यांनी उपस्थित केले; पण त्यात शिरायची ही वेळ नव्हे. तपशील ठरवायला आता आपण बसलं पाहिजे.'

मग दुपारी तपशील ठरवायला मंडळी बसली. गांधी सभागृहात हजर होते; पण त्यांनी एक शब्दही उच्चारला नाही !

त्यापेक्षा लोकांना भेटणंच त्यांनी श्रेयस्कर मानलं. थेट संवादावर त्यांचा गाढा विश्वास होता.

स्वातंत्र्याबाबतचा अंतिम निर्णय हाउस ऑफ कॉमन्समध्ये होणार आहे हे लक्षात ठेवून गांधी तेथल्या सभासदांना भेटले. भारतीय इतिहास आणि सद्य:परिस्थितीविषयीच्या त्यांच्या अज्ञानानं ते

# २ ते २२ ऑक्टोबर : विज्ञानदिंडी

आजवर अनेक प्रकारच्या यात्रा आणि दिंड्या आपण पाहिल्या. आता एक अगदी नवीन प्रकारची दिंडी आपल्या गावात येऊ घातली आहे. महाराष्ट्रातील अनेक संस्थांनी एकत्र येऊन 'महाराष्ट्र विज्ञान यात्रा समिती' स्थापन केली आहे. विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रसार करून अंधश्रद्धा दूर करणं हे समितीचं ध्येय आहे.

या समितीचा पहिला कार्यक्रम म्हणून एक विज्ञानयात्रा आयोजित केलेली आहे. शनिवार दिनांक २ ऑक्टोबर ८२ रोजी सोलापूर येथून सुरू होणारी ही यात्रा २२ ऑक्टोबर रोजी पुणे येथे समाप्त होईल. तिचा मार्ग सोलापूर, अणदूर, लातूर, बीड, नगर, औरंगाबाद, धुळे, सटाणा, नाशिक, पालघर। मनोर, ठाणे, महाड, देवरुख, सावंतवाडी, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, कराड, सातारा, वाई व पुणे असा आहे.

या यात्रेमध्ये एकापाठोपाठ पाच-सहा गट येतील. सर्वात आघाडीवर बी. प्रेमानंद यांचा गट असेल. श्री. बी. प्रेमानंद हे रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे सहकार्यवाह असून केरळ युक्तिवादी संघमचे अध्यक्ष आहेत. जळत्या निखाऱ्यांवरून चालणं, आग अंगावर व तोंडामध्ये घेणं, हवेतून अंगारा निर्माण करणं, तोंडातून शिवलिंग काढणं, अंगाला सुया टोचून घेणं, पाठीला हूक लावून रथ ओढणं (वगैरे अनेक कार्यक्रम प्रेमानंद व त्यांचे सहकारी करतील. यामध्ये बुवाबाजीवरील व्याख्यानं, ज्ञानेंद्रियं कशी फसवितात, हातचलाखीनं चमत्कार कसे केले जातात; पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र यांच्या साह्यानं केली जाणारी बुवाबाजी अशी प्रात्यक्षिकं असतील.

यामागोमाग येणाऱ्या तीन-चार गटांमधून व्याख्यानं, स्लाइड्शोज व चित्रपटमॉडेल्स असतील. दुष्काळ आणि विज्ञान, पाणी व जमीन यांचं शास्त्रीय व्यवस्थापन, ऊर्जासमस्या व तंत्रज्ञान, आरोग्य आणि विज्ञान अशा विषयावर आधारित कार्यक्रम असतील. नेहरू सायन्स सेंटर यांचं फिरतं विज्ञानप्रदर्शन तसेच ग्रंथप्रदर्शन व वैज्ञानिकांची व्याख्यानं पण आयोजित करण्यात आली आहेत.

या यात्रेमध्ये महाराष्ट्र रॅशनॅलिस्ट असोसिएशन, राष्ट्रसेवादल, समता युवा संघटना, लोकविज्ञान संघटना, दलित पदवीधर संघटना, ज्योतिबा फुले सांस्कृतिक मंच, समाजवादी युवक मंच, मराठी विज्ञानपरिषद, सायन्स फॉर दी पीपल, होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्था, श्रमिक विद्यापीठ (मुंबई) बुद्धिप्रामाण्यवादी मंच, भारतीय महिला फेडरेशन या आणि इतर अनेक संस्था सहभागी आहेत.

**म. वि. यात्रा समिती**

चकित झाले.

'ब्रिटिशांचं भारतातलं राज्य फायदेशीर नाही, भारतीयांच्या दृष्टीनं ते अराजक आहे हे मला त्यांना सांगावं लागलं' ते म्हणाले; 'भारतीयांची स्वराज्य चालवण्याची लायकी नाही हे चर्चिलचं मत मजूरपक्षाच्या काही खासदारांनी स्वीकारल्याचं पाहून मला तर आश्चर्याचा धक्काच बसला!'

खासदारांनी गांधींचं म्हणणं नीट ऐकून घेतलं. त्यांना उलटसुलट प्रश्नही विचारले; *पण स्वातंत्र्याची मागणी त्यांच्या गळी उतरवण्यात* मात्र गांधी यशस्वी झाले नाहीत.

मी खासदाराशी नंतर बोललो त्यावरून गांधीबद्दल त्यांचं मत काहीसं दुहेरी आढळलं. एकीकडे ते गांधीमुळे भारावले होते आणि दुसरीकडे त्यांना तो विक्षिप्त माणूसही वाटत होता. हाउस ऑफ कॉमन्सच्या कमिटीरूममधल्या पहिल्या भेटीच्या वेळीच गांधींनी आपल्या विक्षिप्तपणाचा पुरावा दिला होता. संध्याकाळी सात वाजता प्रार्थनेची वेळ झाल्यावर ते उठले. मेडलीन स्लेड आणि सरोजिनी नायडूबरोबर बाहेर गेले. चपला काढून खाली जमिनीवर बसले आणि गीतेचे सूर त्या सभागृहाच्या व्हरांडयात घुमू लागले. आश्चर्यचकित स्तब्धपणे खासदार हे सारं पहात होते. प्रार्थना संपल्यावर गांधी पुन्हा आपल्या जागी आले आणि बैठक पुढे सुरू झाली.

पंतप्रधान मॅकडोनाल्ड, हुजुराचे नेते स्टेनले बाल्डवीन, उदारमतवादी नेते सर हर्बर्ट सॅम्युअल यांचीही गांधींनी भेट घेतली. या भेटीतून फारसं काही निष्पन्न होईल अशा भ्रमात मात्र ते नव्हते. वीस सप्टेंबरला गोलमेज परिषद सुरू होऊन सहा दिवस उलटल्यावर; या निष्फलतेची खात्री त्यांना पूर्णपणे पटली.

परिषदेतले इतर भारतीय प्रतिनिधी तर ब्रिटिशांनी दत्तक घेतल्यासारखेच बोलत होते पौंडाच्या अवमूल्यनाचा संबंध ब्रिटिशांनी रुपयाशी जोडला आणि त्याचंही अवमूल्यन केलं. भारतीयांच्या परवानगीशिवाय हे घडलं, परिषद चालू असताना घडलं. गांधींनी एकाकीपणे परिषदेत याला विरोध केला तर सर माणेकजी दादाभॉय या कोटयाधीश पारशी प्रतिनिधीनं त्यांचा धिक्कार केला. या लुब्रेपणामुळं गांधींना जास्त दुःख झालं. एका परीनं हे धक्कादायक होतं. शरमेनं त्यांची मान खाली गेली!

गांधींनी गोलमेज परिषदेतून अंग काढून घ्यायचं ठरवलं ते यामुळंच. लॅंकेशायरच्या गिरणीकामगारांपुढे आपली बाजू मांडण्यासाठी ते निघाले.

कामगार आपलं स्वागत कसं करतील अशा संभ्रमात गांधी होते. कदाचित ते उग्र स्वरूप धारण करतील, असा इशारा त्यांना इंडिया ऑफिसनं दिला होता; पण झालं उलटंच. गांधींचं प्रेमभरानं स्वागत करण्यात आलं.

तीन दिवस गांधी हा बेकारीनं उध्वस्त झालेला प्रदेश पहात होते. ओढगस्तीनं चाललेले संसार हेच सार्वत्रिक दृश्य!

'भयानक दारिद्र्याचा अनुभव मी इथे घेतला' गांधी त्यांना भेटायला आलेल्या गिरणीकामगारांच्या एका शिष्टमंडळाशी बोलताना म्हणाले, 'या दारिद्र्याचं एक कारण मी आहे ही भावना मला अधिक दुःख देते. बेकारी कुठेही असली तरी वाईटच. बेकारीचं उच्चाटन हे मी माझं काम समजतो; पण माझ्या अर्धकोटी देशबांधवांसाठी आणि तिथल्या लक्षावधी बेकारांसाठी बहिष्कारचं पाऊल उचलणं भाग होतं. ब्रिटन-भारत सहकार्याशिवाय हा प्रश्न सुटू शकणार नाही!'

सहकार्याच्या या आवाहनाला चागलाच प्रतिसाद मिळाला, डार्वेनच्या एका बंद गिरणीपाशी एक घोषणा रंगवलेली गांधींनी प्रथम पाहिली.

'मित्रत्वाच्या भावनेनं आम्ही गांधींचं स्वागत करतो. लॅंकेशायर आणि भारताचं भवितव्य सहकार्यावरच अवलंबून आहे.'

'मी जे सांगत होतो तेच तुम्ही म्हटलंय.' गांधी आपल्याबरोबरच्या लोकांना म्हणाले, 'मी तुमच्याशी पूर्णपणे सहमत आहे. गोलमेज परिषदेत मी हेच मांडलं.'

गिरणीधंद्याबद्दलचं गांधींचं ज्ञान आणि कामगारांच्या प्रश्नाची उमज पाहून लॅंकेशायरचे कामगार, मालक आश्चर्यचकित झाले. १९१४ साली भारतात परतल्यापासून गांधी कापडधंद्याचं प्रमुख केंद्र असलेल्या अहमदाबादमध्ये रहात होते आणि त्यांनी इथल्या गिरणीकामगारांच्या पहिल्या मोठ्या संपाचं नेतृत्व केलं होतं, हे लॅंकेशायरच्या मंडळींना माहीत नसणं स्वाभाविकच होतं.

एकामागोमाग एक शिष्टमंडळं गांधींना भेटायला येत होती. विषय अर्थातच बहिष्काराचा. ब्रिटिश सरकारनं भारताला स्वातंत्र्य दिलं तरच हा बहिष्कार उठेल आणि लॅंकेशायरचे अर्धा कोटी कामगार कामावर परतू शकतील असं गांधी प्रत्येकाला सांगत होते.

'स्वातंत्र्य द्यायची ब्रिटिशांची तयारी नसेल तर मात्र परदेशी मालावरचा हा बहिष्कार असाच चालू राहील!' ते आपला मुद्दा स्पष्ट करत. भारत आणि ब्रिटनमध्ये मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले तर मी आमच्याकडे न होणारं सगळं कापड लॅंकेशायरकडून घ्यायला तयार आहे'

दुसऱ्या दिवशी मँचेस्टरला गिरणीमालकांबरोबर चर्चा करताना त्यांची भूमिका याहून नेमकी होती. स्वराज्याची मागणी मान्य झाली तर भारतात लॅंकेशायरव्यतिरिक्त इतर ठिकाणहून होणाऱ्या कापडाच्या आयातीवर बंदी घालायची सूचना मी करीन असं त्यांनी सांगितलं.

'हा माझा संदेश तुम्ही संसदेतल्या तुमच्या प्रतिनिधींपर्यंत पोचवा!' ते या उद्योगपतींना म्हणाले. अशा वेळी त्यांच्यातला अनुभवी व्यापारी कसोटीला लागलेला असे 'व्यावसायिक नात्याचा हा भाग आहे. दोन समान भागिदारांच्या मित्रत्वाचा हा प्रश्न आहे. जपान, अमेरिका किंवा पश्चिम युरोपातल्या कापडउत्पादकांना मी कमी लेखतोय असं नाही; *पण भारत आणि ब्रिटनच्या भागिदारांच्या दृष्टीनं* हिताची आणि फायद्याची ही योजना आहे.'

गिरणीमालकांना आनंद होणं स्वाभाविक होतं. त्यांना धंदा करायचा होता, राजकारण नव्हे. त्यांच्यातला एक जण गांधींना उत्तर द्यायला उठला तेव्हा त्याच्या भाषणातून हेच स्पष्ट झालं.

'या प्रश्नाच्या राजकीय बाजूशी आम्हाला कर्तव्य नाही.' तो म्हणाला, 'लॅंकेशायरच्या गिरण्या एकदा सुरू झाल्या की, आम्हाला आणि आमच्या कामगारांना भरून पावल्यासारखं होईल!'

भारतात जपान, चीन, अमेरिका किंवा पश्चिम युरोपातून येणारं कापड बंद झालं आणि ती मागणी इंग्लंडला मिळाली तर आणखी अर्धा कोटी लोकांना काम मिळू शकेल असा हिशोब त्यानं मांडला.

गांधी अर्थातच सहमत होते.

कामगारांच्या एका सभेत एका पुढाऱ्यानं भारतातल्या मजुरांचा प्रश्न काढला.

'संघर्ष करून आम्ही चांगलं रहाणीमान मिळवलंय', तो म्हणाला, 'पण भारत आणि जपानमधल्या स्वस्त मजुरांच्या स्पर्धेमुळे ते खालावत चाललं आहे. तुमच्या बहिष्कारामुळं तर साफ दुर्दशाच झाली आहे. *आमचा सगळा संघर्षच मातीमोल झालाय !*'

गांधी काहीसे चपापले; पण हेही आव्हान त्यांनी स्वीकारलं.

'भारतात मजुरी स्वस्त आहे हे खरं; पण इंग्लंडच्या मानानं तिथलं रहाणीमानही स्वस्त आहे.' ते म्हणाले, 'युद्धानंतर आम्ही अहमदाबादमध्ये गिरणीकामगारांचा संप केला तेव्हा पगारवाढ, कामाचे तास, कामाचे नियम यासंबंधी आमच्या मागण्या मान्य झाल्या.'

संप मिटवण्यासाठी आपल्याला उपोषण करावं लागलं याचा उल्लेख मात्र तेव्हा गांधींनी केला नाही. मुळात कामगार-नेता म्हणून गांधींना स्वीकारायला लँकेशारचे कामगार हिचकिचत होते. ती कल्पनाच त्यांना पटत नव्हती. मग उपोषण म्हणजे फारच झालं असतं ! पुढ गांधींनी त्याबद्दल जेव्हा त्यांना सांगितलं तेव्हा त्यांनी अक्षरशः आ वासला !

लँकेशायरमधल्या तीन दिवसांच्या वास्तव्यात केलेलं आणखी एक निरीक्षण मात्र गांधींनी कामगारांना सांगितलं नाही. सांगितलं असतं तर ते चक्रावूनच गेले असते. मँचेस्टरमधल्या शेवटच्या दिवशी गांधींनी *आपलं हे मत माझ्याकडे बोलून दाखवलं.*

'लँकेशायरमधल्या कापडउद्योगाच्या मागासलेपणानं मला धक्काच बसला.' ते म्हणाले, 'मी काही तंत्रज्ञ नाही; पण इंग्रज जुनीपुराणी यंत्रं वापरताहेत हे तीन दिवसात माझ्या लक्षात आलं. त्यामुळं इतर देशाशी स्पर्धा करणं त्याना शक्य होत नाही. यापेक्षा मुंबई-अहमदाबादची यंत्रसामुग्री शंभर टक्के कार्यक्षम आहे !'

आता आश्चर्य करण्याची पाळी माझी होती. गांधी ... आणि यंत्रसामुग्रीबद्दल बोलताना म्हणज ... हा माणूस आपल्याला नेहमीच धक्के देत रहाणार आहे ... मला त्या वेळी वाटलं.

(क्रमशः)

---

जिमी शिहानला, का कुणास ठाऊक, गांधींच्या मृत्यूची पूर्वकल्पना होती. सत्तेचाळीसच्या नोव्हेंबरातील ही गोष्ट. एक दिवस सकाळी त्याने शिररला फोन केला आणि आपल्या घरी बोलावून घेतलं. "गांधीचा मृत्यु जवळ आला आहे." तो म्हणाला, "मला भारतात जायला हवं. काही बरं-वाईट होण्यापूर्वी गांधींना भेटायला हवं. आयुष्याविषयी बरंच काही मला त्यांच्याकडून शिकायचंय." "मला त्यांच्याकडून खूपच शिकता आलं. माझी त्याची गाठ पडली हे माझं सगळ्यात मोठं सुदैव!" शिररनं उत्तर दिलं. शिररचं सुदैव तर खरंच; पण शिरर भारतात आला हे त्याहून आपलं सुदैव ! नुसता भारतात आला नाही तर इथल्या परिस्थितीशी एकरूप झाला ! आणि या एकरूप होण्यातच शिररच्या लिखाणाचं वेगळेपण आहे. ब्लॉटिंग पेपरच्या सराईतपणे शिरर गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा एकेक पैलू शोषून घेतो. मग हा सराईतपणा, ओघ, उस्फूर्तता त्याच्या शैलीत उतरते आणि समोर येतं एक निखळ माणूसपण. गांधींचा मोठेपणा निर्विवाद. त्यांच्या सर्व चरित्रातून तो मांडला गेलाय; पण तरीसुद्धा त्यांचा मुख्य आधार आहे घटनांची जंत्री. शिररच्या पुस्तकात ही जंत्री अजिबात नाही. स्वानुभवाच्या त्या नोंदी आहेत. एखाद्या डायरीतून लेखकाचं व्यक्तिमत्त्व पारदर्शकपणे उभं रहावं तसं शिररच्या पुस्तकातून गांधीचं माणूसपण पुढं येतं. कसलाही आव न आणता. आणि या माणूसपणाची ओळख होणं जास्त महत्त्वाचं.एखाद्याला महात्मा ठरवलं की तो माणसातून दूर जायला वेळ नाही लागत. गांधीच्या इतर चरित्रातून हा दुरावा सतत जाणवतो. शिरर गांधींना माणसात ठेवतो, माणूस म्हणून रेखाटतो. मग वाटतं, देव आणि माणूस हा गांधी आणि आपल्यातला फरक नाही. तर माणूस आणि खुरटी झुडपं हा फरक आहे.

## महात्मा आणि माणूस : भाग ९ वा अखेरचा

# सुदैव : शिररचं आणि आपलं !

## निखिल वागळे : पुढील अंकी

## पुस्तके

# वाट वेगळी....

'तिसरा रस्ता' हा सुधाकर शंकर देशपांडे यांच्या पन्नास कवितांचा पहिला काव्य-संग्रह.

निसर्गचित्रांच्या सुडौल आलेखनातून मनोभाव प्रकट करण्याची कवीला विशेष आवड आहे हे प्रारंभीच्या अनेक कवितातून आढळते. प्रणयशृंगाराच्या तरल भावना; तसेच विरहवेदना व्यक्त करण्यास निसर्ग-चित्रांचे माध्यम विशेष उपयुक्त ठरते. रोमँटिक प्रवृत्तीच्या अनेक नामवंत कवींनी हे निसर्गचित्रांचे माध्यम अधिक लोकप्रिय केले आहे. पु. शि. रेगे, बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांडे, वसंत बापट, ना. धों. महानोर वगैरे कवींच्या काव्याचा स्थूल परिचय असणाऱ्या रसिकांनाही हे सहजतेने जाणवेल. सुधाकर शंकर देशपांडे यांची कविताही त्यास अपवाद नाही.

सूचकतेने, हळुवारपणे मनोभाव प्रकट करण्यास निसर्गचित्रांचे माध्यम उपकारक ठरतेच. शिवाय त्यामधून व्यक्त होणारा भावानुबंध केवळ व्यक्तिगत न राहता त्यास स्वतःचे एक मोहक व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. रसिकांना परिचित असलेल्या अनेक व बहुरंगी निसर्गघटकांना दिमतीला धरण्यात येते. उदाहरणार्थ प्रस्तुत कवितासंग्रहातही दिवस-रात्र, चंद्र–चांदणे, पक्षी–पाखरू, आभाळ–मेघ, ऊन्ह-पाऊस, फुले–झाडे, सर्प–सर्पिणी यासारख्या अ–मानवी सृष्टीतील अनेक घटकांचा प्रतिमा–प्रतीके वा उपमा–दृष्टांतासाठी विपुल उपयोग केलेला आहे. त्यांच्या जोडीला कधी गोकुळ, मुरली, गोविंद, मोरपीस हे पारंपारिक सांस्कृतिक संदर्भ, तर कधी एखादी लोककथा यांचाही काव्यशैलीचे माध्यम म्हणून उपयोग केला जातो. अशा परिचित काव्याशयाची आणि परिचित शैली-साधनांची अपरिचित अन् कलात्मक अभिव्यक्ति साधता आली तर कविता आस्वाद्य ठरते. 'तिसरा रस्ता' मध्ये ते जाणवते म्हणून सुधाकर शंकर देशपांडे यांचा हा संग्रह स्वागतार्ह ठरतो.

मानवी मनात हळुवार स्मृती कशा तरळत असतात याचे चित्रण करणारी 'दुपार' ही कविता;.

'पाउल गोरे दुपार न्हाती  
जळामध्ये खळबळे...  
वाट निसरडी उतरून तेथे  
पीते जळ अंबर!

एखाद्या पक्ष्याप्रमाणे मनातील आठवणी पंख झटकून बसतात. क्षणार्धात अवघे मन आठवणींच्या तळयात मिसळून जाते. अंबर-दुपार–कलते ऊन आणि तळे–जळ–खळबळे अशा परस्परपूरक शब्दसाखळीतून तसेच 'पाऊल गोरे' 'कलती स्वप्ने' 'आठवणीचा झुबका' 'भान पाखरू' या शब्दयोजनेतून तळयामध्ये पाय सोडून जलक्रीडा करणाऱ्या रमणीची प्रतिमा सूचित होते व कविता विशेष लक्षात राहते.

प्रणयशृंगाराची भावना अनेक कवितांतून कधी सूचकतेने तर कधी ठळकपणे व्यक्त झालेली आहे. हे आठवणींचे 'फुलपंखी पाखरू उन्हात...पावसात...रेशीमबनात' विहार करते तर कधी धारांच्या रेशीमबनी 'भिजले मन, भिजले तन' असा तृप्तीचा हुंकार देते; मनात शृंगाराची 'चाहूल' लागताच एकाकी मनाला कोवळे धुमारे फुटल्याचा अनुभव येतो तर तिने कुतूहलाने पाहिल्यावर शेवंतीचा रस ओघळावा तसे ऊन्ह अंतर्मनात ओघळते (ऊन्ह).

'अबोली', 'आरती डोळा करी'; 'अजून असा' 'गारुड' यासारख्या कवितांतून प्रियेचे रूपसंपन्न व्यक्तिमत्त्व आणि 'अबोल हट्टी निळसर ताठा' अशी मनोवृत्ती सूचित केली आहे; पण 'अबोली' सारखी कविता भावसूचन करण्यापेक्षा कवीची शब्दक्रीडावृत्तीच अधिक प्रकट करते.

रंगगंध–संवेदनांची प्रतीती देणारी शब्द-योजना करण्याचे भान बहुतेक कवितेत ठेवले आहे. 'सृजन' सारख्या कवितेत वात्सल्य, कोमलता, चैतन्य, गतिमानता यांचा संमिश्र प्रत्यय देता देता कवितेचा रूपबंध आटोपशीर ठेवला आहे–

'असा चंद्रपान्हा मुखी ओघळावा  
मनी मेघ तान्हा तरंगोनि जावा  
फुले चांदण्याची कपाळी झुलावी  
डहाळीस हिरवी पाने फुटावी'

या कवितेतील 'पान्हा', 'तान्हा', 'चंद्र' 'चांदणे', 'मेघ', 'पालवी' या कोमल शब्दांसाठी योजिलेली ओघळणे, तरंगणे, झुलणे ही क्रियापदे लक्षणीय आहेत. काव्य-सृजनातील गूढतेचे सूचन त्यामधून होत नाही; पण त्या सुखसंवेदनांचा निर्देश करण्याचा प्रयत्न या कवितेत आहे.

लावणीसदृश ढंगदार रचनेची कवीची आवड 'तप' आणि 'मी अलक्त लावतो' या कवितांमधून जाणवते. 'तप' या कवितेतील संभोग–शृंगाराचे चित्रण धीटपणे पण संयमाने झाले आहे.

'कसा असा हा ओठा डसला  
अवचित गोविंद  
पिकी जांभुळे लगड लगडली राघू बेबंद  
किंवा  
'खळाळल्या ओढयाने नेले  
फेडुन साडीस पुढे

त्यात गोकुळी गर्द केतकी फुसांडती साप-

या प्रतिमातून व्यक्त होणारी इंद्रियसुखातील आवेगऊर्मी आणि रतिक्रीडेतील धुंदी, बेहोषी परिणामकारक व रसिकांना आकर्षक वाटणे स्वाभाविक आहे. 'मी आलक्त लावतो' या कवितेचा मुखवटा लावणीथाटाचा पदन्यास करणारा आहे; पण शब्दयोजना मात्र वाजवीपेक्षा अधिक प्रौढ, संस्कृतप्रचुर आहे. या दोन्ही कवितांतून अध्यात्मिक परिभाषा ('त्वमेव भर्ता', 'मी त्रिकाळ एक टाळ भूतकाळ वाजवी') योजून शृंगारभावापलीकडे काही तरी सुचवायचा कवीचा प्रयत्न असला तरी तो लक्षात घेण्याची आवश्यकता आहेच, असे नाही.

'प्रतिभा', 'गारुड', 'डोळसांची वाट चुकते', 'शाप', 'सामोरी', 'एक लोककथा' वगैरे इतर कवितांतूनही प्रणय-विरहाच्या वेदना शब्दबद्ध झाल्या आहेत. 'प्रतिभा' ही कविता म्हणजे निखळ साङ्ग-रूपकात्मक रचना नव्हे; पण प्रतिभाशक्ती आणि प्रेयसी यांच्या सहवासातील धुंदफुंद मनोवस्थेचे चित्रण कवीने आभाळाच्या विशाल पार्श्वभूमीवर केले आहे. 'शाप' या कवितेतील विरहवेदना व रचना गोविंदाग्रजांच्या 'गोफ' कवितेचे स्मरण करून देणारी आहे. 'एक लोककथा' मध्ये गंगा दुथडी भरून वाहत असताही केवळ बाहेरूनच

गरक्या घेत राहणाऱ्या प्रेमतृषार्त पक्ष्याची कहाणी सांगून विरहवेदना व्यक्त केली आहे.

'तिसरा रस्ता' या कवितासंग्रहाची दुसरी धारा आहे ती वृत्तिगांभीर्य प्रकट करणारी भोवतालच्या विश्वाबद्दल, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल व वर्तनाबद्दल तसेच या दोहोंच्या परस्पर संबंधाबाबत अनेक उलटसुलट प्रश्न सुजाण मनात उद्भवतात. केवळ तर्कसूत्र विचारविश्लेषणातून त्यांचा वेध घेता येत नाही मनाची अस्वस्थता अधिकच वाढते. अशा वेळी नानाविध रूपबंधातून या प्रश्नांना सामोरे जाण्याचा प्रयत्न कवी करतो. बऱ्याच ठिकाणी तत्त्वज्ञानाची परिभाषा योजून प्रश्नाचे गांभीर्य विशेषत्वाने सुचवण्यात येते. अनंत जन्म, पर्जन्यसूक्त, दुःस्वप्नकबंध, विश्वरूपदर्शन, पार्थ, वडपारंब्या, रिता डेरा, प्रलय, अणुस्फोट असे शब्द 'हा क्षण' या एकाच कवितेत भेटतात. त्यावरून वृत्तिगांभीर्याची कल्पना येईल. स्वकेंद्रितवृत्तीतील वैय्यर्थ 'वाण', 'रसायन'सारख्या कवितेत आढळते, तर आपण अज्ञानअंधःकारातील 'बंदी' आहोत याची खंत व्यक्त होते, व्यर्थत्वाची मिठी मानेवर बसल्याची वेदनाही अस्वस्थ करते. मनःकल्पित जीवन व प्रत्यक्षातील जीवन यामधील महदंतर शोधण्याचा प्रयत्न 'तीन वर्तुळे' मध्ये होतो. तसेच 'मिनार', 'द्वंद्व' मध्ये त्यांचा पुनरुच्चार होतो.

'मी संज्ञेच्या कबरी तोलून
भ्रमिष्ट असला सौदा केला.
फुटले दर्पण दुसरे खळकन्
मी मातीतून मिनार रचला'

अशी जगण्याची धडपड करत असताच आपण 'पृथ्वीस भारभूत' झाल्याचे जाणवते,

'हृदयास उंचखाली
नेतात क्षुद्र पाय
तू तार मार पाप्या
पृथ्वीस भारभूत !'

अवघे आयुष्यच 'जन्मजड' झाल्यासारखे वाटू लागते —

'उगमाशीच प्राक्तनाने
अस्तित्वास गिळून टाकले
डोळ्यांमधील अश्रूंचे
गुडघाभर पाणी झाले
जन्मजड आयुष्य माझे
बघता बघता बुडून गेले.'

ही व्यर्थत्वाची जाणीव निरनिराळ्या तऱ्हेने व्यक्त होते. राज्यभ्रष्ट सम्राटासारखे आयुष्य जगावे लागते. ('सत्त्वहरण') भूतकालीन डोहात भविष्यही हरवले असल्याचे जाणवते ('शोध'), आयुष्याचे राडपाणी आयुष्य सताड करून टाकते ('पाणी'), स्वतःचे स्वतःला आकलन होत नाही आणि डोळ्यांपुढे काळोखाची जाहजे दिसू लागतात ('माझ्यात मी दूर दूर'), कधीकधी अनामिक भयग्रस्तपणा सर्वांगाला ग्रासून टाकतो ('भय', 'बाधा') अशा या नैराश्यग्रस्त मनाला आत्मनिर्भर्त्सनेची जोड मिळाल्याने दुःखानुभव दाहक बनतो, बेछूट वयातील बेपर्वावृत्ती नंतर मनस्ताप निर्माण करते ('वय', 'क्षमा'), स्वतःतील वासना व पशुत्वाचे प्रतिबिंब श्वानाच्या वा विषारी सापाच्या रूपाने दिसू लागते ('प्रतिबिंब'). मधूनच एखाद्या कवितेतून दुःख सोसण्याचा समंजसपणा व्यक्त होतो, दुःख जर अटळ आहे तर मग तक्रार कशाला ? ('आभाळ पांघरावे' असे स्वतःलाच विचारले जाते.

'वासना', 'हे गाव' या कवितांची धाटणी कथात्म आहे. मन उध्वस्त करणारी वासना आणि प्रसन्न सुखसंवेदना निर्माण करणारी वासना असे तिचे दुहेरी रूप पाकोळी, साप, भयाकुलपक्षी आणि मुंडित साधू, मोर या प्रतीकातून 'वासना' कवितेत चित्रित केले आहे. 'हे गाव' या प्रतीकात्मक कवितेत स्वतःच्या देहरूपाचे आकस्मिक नवे भान येऊन आपले क्षुद्रत्व जाणवू लागते

या संग्रहातील प्रारंभीची 'विरघळणाऱ्या वेळी' आणि अखेरची 'मीच तो मय शिल्पी' या कविताचा एकत्र विचार केल्यास कवीची काव्यविश्वाविषयीची धारणा लक्षात येऊ शकते. शब्दांची मयसभा, निळा अथांग अर्थडोह, अशा काव्यविश्वात तो मनःपूर्वकतेने रममाण होऊ इच्छितो. आकाशाचे जावळ हुंगणे, खपुष्पाच्या वर्षावात भिजणे, डोळ्यांनी पौर्णिमा भोगणे, क्षितिज पिणे, औषधवेलीचे चैतन्यडोळे होणे, उराशी वेली ओढणे अशा अलौकिक काव्यानंद प्रकट करणाऱ्या अर्थपूर्ण प्रतिमांमुळे या कविता आकर्षक बनल्या आहेत. एक दोन कल्पनांची पुनरुक्ती किंवा 'पंचसंवेदनामरगजस्तंभ' सारखी थोडी बोजड वाटणारी प्रतिमा वगळता या दोन कविता कवीची काव्यनिर्मिती अन्तर्गत प्राप्त होणाऱ्या सुखसंवेदनाची प्रतीती आणून देण्यास समर्थ आहेत, असे म्हणता येईल.

## 'स्व' शोध

'तिसरा रस्ता' ही कविताही कवीची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी सूचित करणारी आहे एक व्यवहारी माणूस म्हणून तो वारंवार कोलमडलेला असेल; पण स्वतःला सावरण्यासाठी तो पुन्हा पुन्हा धडपडतो आहे. व्यवहारी जगाची प्रलोभने टाळून ऐहिक वा पारमार्थिक, सफल वा विफल, कणखर वा मृदु अशी परंपरेने तयार झालेली एखाद-दुसरी मळवाट न स्वीकारता स्वतःचा 'तिसरा रस्ता' शोधण्याची कवीची आकांक्षा आहे.

'कोलमडलेला एक माणूस
पुन्हा पुन्हा कोलमडत राहिला
दोन पायांमधून त्याच्या
तिसरा रस्ता वाहत गेला'

स्वप्रयत्नाने परिश्रमपूर्वक व निर्धाराने स्वतःची वेगळी वाट शोधण्याची आकांक्षा केव्हाही गौरवास्पदच ठरते. प्रस्तुत कवितेत त्याचा सुस्पष्ट निर्देश झाला आहे; पण एकंदर कवितासंग्रहास 'तिसरा रस्ता' असे संबोधताना या शीर्षकाची अर्थपूर्णता प्रत्ययास येत नाही. कारण या संग्रहाच्या पूर्वार्धातील बहुतेक कविता प्रणयशृंगारभावनेचे परिचित वळण गिरवणारी आहे आणि उत्तरार्धातील वृत्तगांभीर्याची कविताही पूर्वपरंपरेपासून फारशी वेगळी नाही. कवितासंग्रहाच्या मलपृष्ठावरील मजकुरात म्हटल्याप्रमाणे 'स्व'च्या माध्यमातून जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न कवीने केलेला आहे हे खरे आहे तसेच निसर्गरूपे, प्रेमानुभव, गूढानुभव, अस्तित्वाचे प्रश्न इत्यादी अंगांनी वैविध्य आणण्याचाही प्रयत्न झालेला असला तरी तिने सर्वस्वी एक नवाच मार्ग चोखाळला आहे, असे म्हणता येत नाही; परंतु 'वेगळेपण' हीच कोणत्याही कवितासंग्रहाची एकमेव मूल्यमापनात्मक कसोटी आहे असे तरी का मानावे ? भोवतालच्या साहित्यपरंपरेत बसणारी, त्यातील काही आदर्शांना अनुसरणारी, तिच्याशी नाते सांगणारी कविता चांगली असू शकते. 'तिसरा रस्ता' हा परंपरेतीलच पण आस्वाद्य असा कवितासंग्रह आहे आणि हे यश काही कमी नाही !

—सुरेश जोशी

तिसरा रस्ता
सुधाकर शंकर देशपांडे
जागर प्रकाशन,
पृ. ५६, मूल्य : ७ रु.

## सदानंद रेगे

पृष्ठ २ वरून

संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या आविष्काराला न्याय देणारे हे माध्यम होते. 'अक्षरवेल' 'गंधर्व' 'देवापुढचा दिवा' 'ब्रांकुशीचा पक्षी' हे त्याचे कवितासग्रह वाचताना, वाचकाला अस्वस्थ करत जाते ते या कवीचे गूढ अंतर्मन. जे मृत्यु–प्रावतनाच्या गडद रंगांनी माखलेले असे. गवतातले टॉलस्टॉयचे बडगे त्याला 'हिरवं भावगीत' वाटतं तर 'आकाशमनोऱ्याचा क्षुबका कवेत घेऊन' उभा असणारा पुतळा त्याला मृत्यूची चाहूल लागलेल्या हंसपक्ष्यासारखा दिसतो. आपल्या कवितांसंबंधी तो कधी बोलायचा नाही. करविली तैसी केली कटकट । वाकडे की नीट देव जाणे ॥ अशी त्याची तुकारामी प्रवृत्ती होती. जगातील सर्व सौंदर्याला लागलेले मृत्यूचे ग्रहण मात्र हा कवी कधी विसरू शकत नसे. त्याचा कल्पनाविलासही सर्वस्वी वेगळा. 'सगळे निघून गेले– पण खुर्चीवर अजून तसाच बसून पोलियो झालेला काळोख' रेग्यांना दिसणारा काळोख हा असा निराळा असे. कधी तो 'ओल्या उजेडाचा रेनकोट' घातलेला असा त्याला दिसे. अशी किती तरी वेगळचा लोकविलक्षण प्रतिमांची उदाहरणे आठवतात.

रेगे माटुंग्याला त्या वेळी राहायचा. एक बारा–बाय–बाराची खोली. त्यातच मोरी, स्वैपाकघराचा ओटा, पलंग, रेगेच्या दोन बहिणी, भाऊ, आई ४–५ मोकळे सोडलेले पोपट आणि सुमारे १०–१२ पाळीव मांजरे! आईवर त्याचे विलक्षण ते होते; पण प्रेम व्यक्त व्हायचे विरोधी भक्तीतून. माझ्यासारख्या तिन्हाइताला चोरटचासारखे व्हायचे. घरात तो जवळजवळ मरूखच असायचा. केव्हा तरी सांगायचा–

'लग्न कसलं करतोस ! हे सगळं आधी निस्तरायचं !'

'–आणि सतत १४–१५ वर्षे कारकुनी पत्करून रेगेने घर चालते ठेवले. बहिणीचे विवाह केले, भावाची शिक्षणे केली. एकीकडे कारकुनी जगातून बाहेर पडण्याची त्याची धडपडही सुरू झाली होती. तो इंटर झाला. बी. ए. झाला. अखेर इंग्रजी विषय घेऊन एम ए. झाला आणि प्राध्यापक बनून त्याने रेल्वेतल्या नोकरीला रामराम ठोकला! रुईया कॉलेजात वीस–बावीस वर्षे तो इंग्रजीचा प्राध्यापक म्हणून अखेरपर्यंत मग रमला.

रेगेला आकर्षण असे ते जगाला फटकारून पुढे जाणाऱ्या माणसाचे–गरीब–पडखाऊ माणसे त्याला आवडत नसत. एकदा मुंबईला हिंदू–मुसलमान दंगा पेटलेला असताना, सानेगुरुजीचे सेवादलाच्या सैनिकांपुढे एक बौद्धिक, वसई किंवा भाईंदर इथे झाले. कुणी तरी सदानंद रेगेला तिथे नेले. सानेगुरुजींचा नेहमीचा 'प्रेम द्यावे–प्रेम घ्यावे' सूर होता, रेगे बिथरला. फक्त हिंदूना उपदेश त्याला मंजूर नव्हता. तो काही तरी असे बोलला– 'हे त्या दंगा करणाऱ्या मुसलमानांना सांगा इथे कशाला ! ' आणि झाले. सात्त्विक कोवळ्या मनाच्या गुरुजींना साहजिकच मानसिक क्लेश झाले त्यांच्या डोळ्यांतून टिपे गळू लागली. सर्वांनी रेगेला धारेवर धरले– 'तू कशाला बोललास ?' हा सगळा प्रसंग रेगेनेच मला दुसऱ्या दिवशी सांगितला. तो तणतणत होता– 'साले सगळे मलाच ज्ञान शिकवायला लागले–' तो काळच असा होता की, कुणाचीच मने तशी थाऱ्यावर नसायची. दुसरा प्रसंग आठवतो तो रेगे स्वातंत्र्यवीर सावरकराना भेटून आल्यानंतरचा. तो सावरकरांना भेटायला सावरकरसदनात गेला, तो कुणा तरी मित्राच्या ओळखीने. खोलीत सावरकर आले तेव्हा रेगे आणि त्याला घेऊन गेलेला मित्र आधीच तिथे बसलेले होते. अंगात मलमलीचा साधा शर्ट, धोतर, कृश अंगकाठी, सोनेरी चष्म्याआडून वेध घेणारे तेजस्वी डोळे. एक कवी म्हणून सावरकरांनी रेगेचे स्वागत केले. या सर्वांमुळे तो भारून गेला होता. आम्ही त्या काळात जवळजवळ रोजच भेटत होतो. कारण आमच्या कचेरीत अंतर होते १५–२० पावलाचे. सावरकरांना भेटून आल्यावर दुसऱ्या दिवशीच रेगे भेटला. म्हणाला–

'सावरकर असे खोलीत आले मला एकदम ख्रिस्त आल्यासारखं वाटले.'

सावरकरांना पाहून ख्रिस्ताची आठवण होणे ही रेगेची निराळी दृष्टी होती.

अशा या माझ्या स्नेहाची ताटातूट झाली ती मी मुंबईबाहेर नोकरीनिमित्ताने गेलो तेव्हा. माझ्या नाशिकच्या वास्तव्यात रेगे माझ्याकडे येऊन राहून गेला. मी बडोद्याला गेलो तेव्हा तो काकतकराच्या 'रहस्यरंजन' मासिकाच्या उभारणीत व्यग्र होता. नाशिकच्या वास्तव्यात त्याने माझी एक कादंबरी वाचली होती. 'रहस्यरंजन'च्या पहिल्या दिवाळी अंकात त्याने ती मागवून आवर्जून प्रसिद्ध केली. हे त्याचे ऋण मला विसरता येणार नाही. अन्यथा ती तशीच किती दिवस पडून राहिली असती कोणास ठाऊक !

५६–५७ हे एक वर्ष मी पुनश्च मुंबईला आलो. या काळात रेगेमुळे मला एका अविस्मरणीय सायंकाळचा लाभ झाला त्या दिवशी शनिवार होता. पाऊस पडत होता. रेगे माझ्या कचेरीत दुपारी आला होता. आम्ही दोघे कचेरीचा जिना उतरून बाहेर पडणार तोच वरच्या मजल्यावरच्या 'आकाशवाणी'मधून घरी निघालेले पु. ल. देशपांडे लिफ्टमधून बाहेर आले. माझा व पु. ल. चा परिचय त्या वेळी अगदी थोडा होता. पु. ल. त्या वेळी आकाशवाणीवर नोकरीला होते. रेगे व मी दिसताच त्यांनी रेगेला हटकले. पाऊस झिमझिमतच होता. पु. लं. नी रेगेला व मला आग्रहाने घरी नेले. त्या वेळी ते ग्रँटरोडला ना. म. जोशी रहात तिथे कुठे तरी राहात असत. आम्ही टॅक्सीने घरी पोचताच पु. लं. नी नुकत्याच पुऱ्या केलेल्या नाटकाचे वाचन सुरू केले श्रोते–मी व रेगे. पुढचे तीन तास आम्ही एका अविस्मरणीय नाटकाचे वाचन साभिनय ऐकत होतो. त्या नाटकाला नाव दिलेले नव्हते. ते नाटक म्हणजे 'तुझे आहे तुजपाशी' तो एकपात्री प्रयोग मी कधीही विसरणार नाही. रात्री पु. लं. कडून बाहेर पडलो तेव्हा नऊ वाजलेले असावेत. वाचनानंतर रेगे फारसे काही बोललाच नव्हता. मी एक–दोनदा बोलता करण्याचा प्रयत्न केला तेव्हा म्हणाला– .

'मला नाटकातलं काय कळतंय ?'

तीन तासांच्या श्रवणानंतर ही प्रतिक्रिया! असा हा माणूस अतर्क्य होता. त्याच्यामुळे मला मात्र एक अविस्मरणीय श्रवण घडले होते. तसं म्हटलं तर रेगेने अजिबात नाटकच पाहिलेले नव्हते, असे जेव्हा तो म्हणाला, तेव्हा मीच त्याला आग्रहाने 'कुलवधू' दाखवले होते. त्याने आयुष्यात पाहिलेले ते पहिलं नाटक होते. याच माणसाने 'जयकेतु' लिहावे, 'गोची' लिहावे आणि ही नाटके रंगभूमीवर बऱ्यापैकी गाजावी हा इतिहास त्या वेळी तर्कालाही शिवू शकत नव्हता !

मी पुन: मुंबई सोडली आणि मग मात्र आमच्यातील अंतर वाढू लागले. रेगे अनेक अंगांनी मोठा होत होता. नॉर्वे सरकारची शिष्यवृत्ती घेऊन तो परदेशी निघाला त्याच दिवशी 'पानशेत' फुटले; परंतु त्या धावपळीत त्याने म. म. केळकरांना कार्ड टाकले 'मला तुमची काळजी वाटते.' पानशेतचा फटका नेमका कुठेकुठे बसणार आहे याची त्याला कल्पना असणे शक्य नव्हते; पण पुण्यात राहाणारा आपला एक स्नेही आहे त्याची काळजी करीत तो परदेशी गेला तो दौऱ्याहून परतल्यावर मी त्याला मुंबईला मुद्दाम भेटलो. 'डेव्हिड ससून' लायब्ररीत तो हटकून सापडे. तिथेच सापडला. तो खूप सांगत होता. प्रवासवर्णन लिहिणार का-विचारल्यावर प्रतिक्रिया नेहमीसारखी झाली 'प्रवासवर्णनात काय लिहायचंय, गेलो आणि आलो!'

६० सालापासून मी पुण्यात आलो आणि आमचा संपर्क पुन: वाढला. चार-पाच वेळा तरी तो पुण्यात आला. त्याची शेवटची भेट मे १९८० मधली. १९ किंवा २० मेला तो अचानक माझ्या कचेरीत आला. त्याआधी त्याने घरी फोन करून माझ्या कचेरीचा पत्ता हुडकला होता. 'कॉफी हाउस'मध्ये आम्ही त्या दिवशी जेवलो. तो म्हणाला–

'मी नामदेव ढसाळच्या प्रचारसभेत बोलण्यासाठी आलो आहे.'

हा रेगेचा नवाच अवतार होता! त्याच्या उजव्या डोळ्यात चांगलाच दोष होता. वयपरत्वे चेहऱ्यावर एक-दोन सुरकुत्या वाढलेल्या होत्या. थोडा थकलेला होता. मधुमेहामुळे त्याच्या खाण्यापिण्यावर बंधने आली होती. सभेतले वक्तृत्व त्याच्याजवळ अजिबात नव्हते. निवडणुकीच्या गदारोळात हा कसा काय भाषणे ठोकणार हे मला कळत नव्हते. त्याने पत्ता दिला. नामदेव ढसाळ आणि तो ज्या हॉटेलात उतरले होते तिथे मी सायंकाळी गेलो.

ढसाळाचे कार्यकर्ते जमले होते. फार नव्हते, २–४ असावेत. सायंकाळच्या व रात्रीच्या सभांची वाटाघाट चालू होती. मी, रेगे व रेगेबरोबर आलेले त्याचे कविमित्र शरद मंत्री बिनराजकारणी गप्पा मारीत होतो. मी हे धरून चाललो होतो की, थोड्या वेळाने आपण इथून जायचे व रेगे ढसाळांबरोबर जाणार; परंतु रेगे म्हणाला–'चल आपण फिरायला जाऊ' शरद मंत्री म्हणजे रेगेचा 'ब्रांकुशीचा पक्षी' या कवितासंग्रहाचे प्रकाशक. ते देखील ढसाळाच्या सभेत बोलणार होते किंवा काय मला आठवत नाही; परंतु ते आमच्याबरोबर बाहेर पडले नाहीत.

मी व रेगे बरेच फिरणे झाल्यावर जिमखान्यावरच्या एका हॉटेलात पेयपात्रे घेऊन मजेत बसलो. जुन्या आठवणी निघत होत्या. नेहमीच्या पद्धतीने रेगे एकेकाची कुंडली मांडून फेकून देत होता. त्याला कुणालाच भेटायचे नव्हते त्याला फक्त दि. ब. मोकाशींना भेटायचे होते. नंतर आम्ही दुसऱ्या एका हॉटेलात जेवायला गेलो. साडेआठ वाजून गेले सभेचे काय? एक सभा ७॥ ला होती, दुसरी ९ वाजता रेगे म्हणाला– 'नाम्याचं आणि माझं तू येण्यापूर्वी वाजलं. मी सांगून टाकलं– तुझ्या सभा गेल्या–'

दुसऱ्या दिवशी सकाळी तिघे माझ्याकडे जेवायला यायचे ठरले होते. आयत्या वेळी ढसाळांनी कळवले – निवडणुकीच्या कामामुळे ते येत नाहीत त्या दिवशी आमचे जेवण २–२॥ तास रंगले. रेगे प्रसिद्ध साहित्यिकांच्या नकला करीत होता. हे त्याचे एक अंग होते. दुपारी आम्ही मोकाशींकडे गेलो. तिथेही २–३ तास चांगले गेले. मोकाशींच्या कन्येला अभ्यासातल्या इंग्रजी उताऱ्याबद्दल काही शंका होत्या. रेगेने उत्साहाने तिला तेवढ्यात शिकवले. मोकाशी या वेळी बरेच आजारी होते. अंथरुणावर रेलूनच ते बोलत होते. तिथेही रेगने नकलांचा एक आणखी प्रयोग केला. या वेळी तो खोलीत साभिनय फिरत होता. त्या दोन तासांत मोकाशी आजारी आहेत हे आम्ही सर्व विसरलो होतो. त्या दिवशी रात्री मी, रेगे व शरद मंत्री अपरात्रीपर्यंत रात्रीच्या जेवणाच्या निमित्ताने एकत्र होतोच.

या अखेरच्या भेटीत मी घेतलेली रंगीत छायाचित्रे आता हे लिहिताना माझ्यासमोर आहेत. रेगे गेला हे अजून खरे वाटत नाही. त्याचा चेहरा गेल्या तीस वर्षांत फारसा बदललेला नाही.

आमची मैत्री साहित्यिक स्वरूपाची नव्हतीच. त्याच्या सर्व कविताचे परिशीलन मी केलेले नाही. त्याचे कथासंग्रह व दोन कवितासंग्रह त्याने मला दिलेले होते. 'ब्रांकुशीचा पक्षी' हा संग्रह त्याने शेवटच्या भेटीत दिला – तो जास्त काळजीपूर्वक वाचला त्याच्या मृत्यूच्या बातमीनंतर! माझी पुस्तके त्याने वाचली असली तर मला ठाऊक नाही· 'तू आता मोठा साहित्यिक झालास'– असे तो मला चेष्टेने शेवटच्या भेटीत दोनचारदा म्हणाला त्याचा अर्थ एवढाच घेतला की, माझी काही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत हे त्याच्या कानावर होते आम्हाला परस्पराचा सहवास आवडत असे एवढाच आमच्या मैत्रीचा आधार होता. त्याचे मोठेपण, त्याचे राग, त्याच्या त्रुटी, विक्षिप्त स्वभाव या सर्वांना ओलांडून आमचा स्नेह अखेरपर्यंत टिकला याचा मला आज आनंद आहे. स्नेह टिकलेले दुसरे त्याचे स्नेही – अरविंद गोखले असावेत.

रेगे अविवाहित होता, अश्वत्थाम्यासारखी एक भळभळती वेदना त्याच्या अंत:करणात कुठे तरी होती. आईला जाऊन पाच सात वर्षे झाली होती. तो निवृत्त होऊन पुनश्च आपल्या खोलीचा ताबा घेणार होता. एकटाच राहाणार होता. आणखी पंधरावीस वर्षे जगता तर हवाच होता; परंतु जगण्याची त्याला आसक्ती नव्हती. वचने मानिली नाही सुहृदाची। समूळ प्रपंची वीट आला – असे त्याचे आयुष्य वाटे.

काळोख केवळ काळोख. नितळ काळोखपाषाण
ना कुठे वळसा, ना कवडसा
ना सहानुभूति, ना करुणा
ना कुणाचा पाठीवरून फिरणारा हात
ना उघडणारं दार, ना उघडणारी कुलुपं
नुसती केवळ, नितळ, गच्च गहिरी रात्र

या त्याच्या ओळी समजणाऱ्याला खूप काही सांगू शकतील.

म्हणूनच मला वाटते वार्धक्यावस्था न अनुभवता – विनासायास तो झोपेतच गेला, हा परमेश्वराने त्याला एक दिलासाच दिला. झोपेतले मरण म्हणजे न संपणारा काळोख. उत्तरोत्तर गडद होणारा. असेच काही तरी असावे. त्याच्या आठवणी गाठी असणाऱ्या माझ्यासारख्यांची अवस्था त्याच्याच शब्दात सांगता येईल –

आमची वही
रोज थोडी थोडी
कोरी होत चाललीय –

–वि. ग. कानिटकर

विज्ञानेश्वरी

# मी ताक पितो, मी ताक पिणार !

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

सोपानदेव चौधरी हे माझे एक आवडते कवी आहेत. नवकाव्याचा भोक्ता असलो तरी त्यांची 'मी ताक पितो मी ताक पिणार' ही कविता तर मी आकंठ तृप्त होईपर्यंत वाचली आणि ऐकली आहे; पण सोपानदेव हे एक क्रांतिदर्शी कवी आहेत याची मात्र मला अगदी परवापर्यंत कल्पना नव्हती. सोपानदेवाच्या कवितेचा मागोवा घेत आज अमेरिकेत दही-ताकाचा महापूर आला आहे. अमेरिकेतच नव्हे तर अनेक पाश्चात्य देश या महापुरात न्हाऊन निघताहेत. — बाकी हरेकृष्णचा मंत्र जपावयास सुरुवात केल्यावर कृष्णापाठोपाठ दही-दुधाच्या नद्या वाहावयास लागाव्यात हे तसे ओघानेच आले !

गेल्या वर्षी अमेरिकेत दीड लाख टन दही विकण्यात आले. यात दोन गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत १९५० साली ( म्हणजे सोपानदेवांची कविता प्रसिद्ध होण्यापूर्वी ) अमेरिकेला दही हा प्रकार अजिबात माहीत नव्हता. दुसरे म्हणजे अनेक कारणांमुळे दह्याची लोकप्रियता झपाट्याने वाढत असली तरीही दही घरी बनवले जात नाही. ते बाजारातून आणले जाते. स्त्री-स्वातंत्र्याच्या वा तयार अन्नपदार्थांच्या कल्पना कोणत्या उंचीपर्यंत जाऊ शकतात हे आपणाला यावरून समजते.

— पण या अवांतर गोष्टी जरा बाजूला ठेवल्या तर अमेरिकेत दही इतक्या झपाट्याने का लागते आहे, हे पाहण्यासारखं आहे. अमेरिकेत दही लागावयास सुरुवात झाली ती १९६५ नंतर. प्रयोग शाळेत न बनवलेले, कोणताही रासायनिक पदार्थ न वापरता तयार केलेले अशा बिरुदासह दही बाजारात आले. प्रस्थापिताविरुद्धचे म्हणून त्या वेळच्या तरुण पिढीने दह्याला उचलून धरले.पण दह्याच्या खपाला खरा हातभार लावला तो अमेरिकेतील गौळणींनीच ! स्त्रियांच्या मासिकांनी, त्यात लिहिणाऱ्या बायांनी दह्याचे 'अनेकविध पराक्रम सांगावयास सुरुवात केली.त्यातच न्यूयॉर्क डेअरी कौन्सिलच्या एरलिन हॅरिस (Arline Harris) यांनी दह्यामुळे वजन कमी होते ही आपली शास्त्रीय कल्पना' या मासिकाच्या गळयात उतरवली आणि त्यानंतर दह्याचे वजन झपाट्याने वाढले ! दही अमेरिकन लोकांच्या वा अमेरिकन लोक दह्याच्या गळयात पडले !

प्रेमात पडल्यानंतर पुढे जे होते ते सारे दह्याच्याबाबत अपरिहार्यपणे घडले. डोकेदुखीच नव्हे तर सांधेदुखी दह्यामुळे बरी होते म्हणून सांगणारे लेख प्रसिद्ध झाले. काविळीवरचे औषध माहीत नसलेल्या पाश्चात्य वैद्यकशास्त्राला दही हे काविळीवरचे औषध आहे याचा साक्षात्कार झाला. किडनीचे आणि मूत्रपिंडाचे विकार दह्यामुळे बरे झाले. दह्यामुळे माणसाचे म्हातारपण लांबणीवर पडते, त्याचे केस गळावयाचे थांबतात, केस पांढरे होत नाहीत म्हणून सांगणारे लेख प्रसिद्ध झाले. दही चेहऱ्यावर चोळल्यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडत नाहीत म्हणणाऱ्या स्त्रिया निघाल्या दही नियमितपणे घेतल्यामुळे कॅन्सरसारखे असाध्य रोग होत नाहीत आणि दही घेणारे लोक शतायुषी होतात असे म्हणणारे प्रयोगवीर निघाले !

खरे पाहता दह्यामुळे माणूस शतायुषी होतो का हे पहावयाचा शास्त्रीय प्रयत्न १९०२ सालीच झाला होता. पॅरिसच्या पाश्चर संशोधनसंस्थेचा संचालक असलेला, नोबेल पारितोषिकाचा मानकरी, प्रख्यात रशियन संशोधक डॉ.एलि मेटचिनकॉफ (Elie Metchnikoff) याने हा प्रयत्न केला होता. बाल्कन लोक, प्रामुख्याने बल्जेरियातील काही विभागातील लोक शतायुषी असतात, हे डॉ. एलीने पाहिलेले होते. या लोकांच्या अन्नात प्रामुख्याने दही वापरले जाते आणि काही लोक तर दिवसाला दोन-तीन शेर दही फस्त करतात हे त्याना माहीत होते; पण दही आणि आयुष्यमान याच्याबाबत नक्की काही अनुमान काढण्यापूर्वीच डॉ. एलि मेटचिनकॉफचे निधन झाल्याने हे संशोधन तसे निम्म्यावरच राहिले होते. मात्र त्यानंतर एकशेत्रेपन्न वर्षांचा होईपर्यंत जिवंत राहिलेला टर्की माणूस झेरो अगा (Zero Aga) याने मरणापूर्वी काही दिवस आपले रहस्य दही हे आहे म्हणून सांगितल्याची नोंद आहे. आयुष्यातील शेवटची अनेक वर्षे आपण दह्यावरच जगलो असे त्याने म्हटले होते. रशियातील ज्या विभागातील लोक शंभरी गाठतात तेथे दही हे अन्नाचा प्रमुख भाग असते याची पण झेरोने आठवण करून दिली होती. —पण झेरोच्या सांगण्यात एक शास्त्रीय विसंगती होती. याच विभागातील लोक मोठ्या प्रमाणात व्होडका आणि तंबाखू पण वापरत होते. आता तंबाखू आणि व्होडका यांच्यामुळे आयुष्य वाढते, का याच्या वाईट परिणामावरही दही मात करते हा प्रश्न पण तसा अनुत्तरित रहात होता.

मात्र दह्यामध्ये काही औषधी गुणधर्म आहेत असे म्हणणारा संशोधकांचा आणि डॉक्टरांचा एक गट आज तयार होतो आहे.न्यूयॉर्क येथील डेअरी कौन्सिलच्या मार्सेला ग्युनी (Marcella Guiney) यांनी म्हटल्याप्रमाणे आज अनेक डॉक्टर्स वातामुळे होणारा त्रास वा पोटाचे आणि आतड्याचे विकार बरे होण्यासाठी दही खाण्याचा सल्ला देतात. असा सल्ला देण्याचे कारण म्हणजे दह्यामुळे आतड्यांच्यावर असलेल्या उपयुक्त जीवाणूंची (friendly bacteria) वाढ झपाट्याने होते. रोगाचा बंदोबस्त करायचे काम हे सूक्ष्म जीवाणू करतात. 'जनरल ऑफ बायॉलॉजिकल केमिस्ट्री'मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखाप्रमाणे तर वाटीभर दह्यामध्ये चौदा पेनिसिलीन युनिटस येवढी क्षमता असते; पण अजूनही दह्यामुळे नक्की काय फायदे होतात हे' सिद्ध झालेले नाही हे पण मार्सेला ग्युनी मान्य करतात. रूटगर विद्यापीठातील डॉ. डिक क्लेन (Dick Kleyn)याच्या मते ज्या रोग्यांना तोंडावाटे प्रतिजैविक (Antibiotic) औषधे घ्यावी लागतात. त्यानी त्यानंतर दही घेतल्यास या प्रतिजैविक औषधामुळे आतड्याना होणारा त्रास कमी होतो. किमानपक्षी एक गोष्ट तरी नक्की; ज्या लोकाना दुधाचा अनेक कारणामुळे त्रास होतो त्यानी दुधाऐवजी दही घेतल्यास ते त्यांना फार फायदेशीर ठरते. अनेक डॉक्टरांनी पोटाच्या शस्त्र-

क्रियेनंतर आपल्या रोग्यांना पोटाला लवकर आराम मिळावा म्हणून दह्याची शिफारस करावयास सुरुवात केली आहे.

व्हँडरबिल्ड (Vanderbilt) विद्यापीठातील, जीवरसायन व वैद्यकीय विषयाचे प्राध्यापक डॉ. जॉर्ज मान (George Mann) याचे सशोधन तर आणखी पुढे गेले आहे. भरपूर दही खाल्ले तर रक्तातील कोलेस्टेरॉलचे (Cholesterol) प्रमाण कमी होते असा त्याचा दावा आहे. आफ्रिकेतील मसाई जमातीचे लोक आणि काही अमेरिकन नागरिकांच्यावर डॉ. मान यानी आपले सशोधन केले होते. कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी झाल्याने हृदयविकाराचे प्रमाण घटते. बहुधा दह्यामध्ये असलेले सूक्ष्म जीवाणू कोलेस्टेरॉलचे शरिरातील उत्पादन थांबवत असावेत असे त्यांचे म्हणणे आहे; पण अजूनही त्याचे संशोधन सुरू आहे आणि येवढ्यातच कोणतेही ठाम अनुमान काढावयास ते तयार नाहीत. आहारतज्ञ कै. डॉ. अॅडले डेव्हिस (Adelle Davis) यांनी अप्रगत राष्ट्रांना भेट देण्यापूर्वी प्रवाशानी किमान तीन आठवडे दही खाल्ले पाहिजे म्हणून सल्ला दिला होता.दह्यामुळे आतड्यांची रोगप्रतिकारकशक्ती वाढते आणि अप्रगत राष्ट्रातील दूषित पाण्यामुळे, प्रवाशाना कमी त्रास होतो असा त्याचा दावा होता. रॉक फेलर (Rock Feller) विद्यापीठातील डॉ. रेने ड्युबोस (Rene Dubos) यांनी प्राण्याच्यावर आपण केलेल्या सशोधनाप्रमाणे दह्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते आणि त्यामुळे प्राण्यांचे आयुष्यमान पण वाढते म्हणून चक्क 'जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशन'-सारख्या दर्जेदार मासिकात नमूद करून ठेवलय.

अर्थातच जगातील सर्व रोगावर रामबाण उपाय ठरण्यात दही घाई करते आहे असे अनेकांना वाटते. हारवर्ड (Harvard) विद्यापीठातील डॉ. जोन मेयर (Jean Mayer) यानी दह्यामध्ये लोह, तांबे आणि जीवनसत्त्व क (iron, copper, vitamin C) ही नसतात आणि म्हणून दही हे पूर्ण अन्न मानून फक्त दह्यावरच उपजीविका करणे योग्य नाही याचा लोकांना इशारा देऊन ठेवलाय. दह्यामुळे होणारे फायदे अजून शास्त्रीयदृष्ट्या पूर्णपणे सिद्ध झालेले नाहीत, हे पण अनेकानी पुन्हा पुन्हा स्पष्ट केलंय.

पण दह्यातील संशोधन सुरू ठेवावेच लागेल. कारण त्याची लोकप्रियता झपाट्याने वाढते आहे. त्याची चव लोकाना आवडली आहे. त्याच्यामुळे होणारे फायदे, मानसिक म्हणा हवे तर, अनेकांनी अनुभवले आहेत. दह्यामुळे कोणताही अपाय होत नाही आणि पोटातील वातावर दही गुणकारक ठरते यावर तसे एकमत आहे. यशासारखे दुसरे यश नाही हे दह्याबाबत आज जगभर खरे ठरले आहे. कृष्णा-पद्याना आवडलेले दही आज लक्षाधीशापासून भिक्षाधीशापर्यंत सर्वांना परवडले आणि आवडले आहे. एलिझाबेथ टेलर आणि शर्ली मॅकलिन दह्याच्या प्रेमात पडल्या आहेत आणि आपण नियमितपणे दह्याचा खुराक घेतोय म्हणून त्यांनी मुलाखती देताना सांगितलय. राष्ट्रसघात चिनी आणि रशियन प्रतिनिधींत फक्त एकाच गोष्टीत एकमत होते. त्या दोघानाही जेवताना भरपूर दही लागत होते. म्हणून शास्त्रीय लेखक डॉ. अॅलन हास (Alan Haas) यानी थोड्या विनोदाने, थोड्या कौतुकाने नमूद करून ठेवलंय.

मला लहानपणापासून आवडणारे दही साऱ्या जगभर असे छान जमलंय. दही सर्वांना आवडलय याचा मला अभिमान आहे. उद्या एखादा कल्पक उद्योगपती कोकाकोलाचा पराभव करत ताक, लस्सी आणि पीयूष लोकप्रिय करेल; पण यात मात्र एक धोका संभवतो. मला आवडणारे पापड बाजारात आले आणि माझा एक फार आवडता कवी चक्क पापडकर बनून पापडाचा विक्रेता झाला! उद्या दुसरा एखादा कवी दह्याचा विक्रेता बनेल; पण उद्याचे कुणी सागावे? एखादा कल्पक उद्योगपती, सोपानदेवांच्या कवितेचे जागतिक हक्क खरेदी करेल! त्या कवितेची साऱ्या भाषेत भाषातरे होतील आणि रॉक अँन्ड रोल करत व्यापारी दूरदर्शनवर सादर होईल!

मी ताक पितो, मी ताक पिणार......
ताक माझे नाक आहे......
म्हणून मी नाकानेच ताक पितो......
मी ताक पितो, मी ताक पिणार......

---


# दूरदर्शन – स्वस्त आणि प्रशस्त

जवळजवळ तेरा वर्षांपूर्वी मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजीचे प्रोफेसर डॉक्टर मराठे यांनी आपली 'मिररस्क्रीन'ची कल्पना पुढे मांडली. गोरेगावचे टोपीवाला सिनेमागृह मुळी प्रथम मिररस्क्रीनसाठीच निर्माण झाले होते. मिररस्क्रीन फार स्वस्त आणि उपयुक्त होता. पडद्याच्या जवळ बसलेल्या लोकांच्या डोळ्यांना त्रास होतो. त्यामुळे पडद्यासमोरील काही जागा मोकळी सोडावी लागते. मिररस्क्रीनमध्ये पडद्याच्या मागे काही अंतरावर एक पडद्याच्या आकाराचा आरसा उभारण्यात आला होता. पडद्याच्या मागे उलट्या उठलेल्या प्रतिमा त्या आरशात सरळ वाटत होत्या. पडद्याच्या जवळ व पडद्याच्या माग बसलेले लोक त्या आरशात सिनेमा पहात होते. आरशाच्या अगदी जवळ बसले तरी डोळ्याना काही त्रास होत नव्हता. कारण पडद्यापासून आरसा जेवढा लांब तेवढ्या लाबून सिनेमा पाहिल्याचा आनद अगदी जवळ बसलेल्या लोकांनाही होत होता. डॉ. मराठे याच्या या संशोधनामुळे प्रत्येक सिनेमागृहाची लोकाना सामावून घेण्याची क्षमता दुपटीने वाढत होती. भारतातील सिनेमागृहांची कमतरता कमी करण्याचा हा एक अभिनव प्रयत्न होता.

त्या वेळी सर्वप्रथम विज्ञानेश्वरीने डॉ. मराठेंची सविस्तर मुलाखत प्रसिद्ध करून मिररस्क्रीनची कल्पना मराठी वाचकाना समजावून सागितली होती. टोपीवाला सिनेमागृहात काही महिने मिररस्क्रीन काम पण करत होता. मिररस्क्रीनची कल्पना यशस्वी का झाली नाही? संशोधकाना नवकी कोणत्या अडचणी येतात यावर डॉ. मराठेंनी आपले अनुभव कधी तरी प्रसिद्ध केले पाहिजेत; पण आज या सर्वांची आठवण होण्याचे कारण म्हणजे डॉ. मराठेंची मूळ कल्पना डॉ. रॉजर फील्ड यांनी पुढे माडली आहे. आपल्या घरातील दूरदर्शनचा पडदा लहान असतो. परदेशात मोठा पडदा असलेले दूरदर्शन मिळतात; पण त्याची किंमत खूप असते. सोनीचा अडीच फूट पडदा असलेला दूरदर्शन तीन हजार डॉलर्सना मिळतो. जनरल इलेक्ट्रिक कंपनीचा वीस फूट लांबीचा पडदा असलेला दूरदर्शन त्रेचाळीस हजार डॉलर्सना मिळतो, तर चाळीस फूट लांबीचा पडदा असलेला दूरदर्शन जवळजवळ सध्या दोन लाख डॉलर्सना पडतो!

डॉ. रॉजर यांच्या कल्पनेप्रमाणे काही घरगुती प्रयोग करून मोठ्या आकाराचा पडदा असलेला दूरदर्शन फक्त १०० डॉलर्स जादा खर्च करून बनवता येईल.

सोबतच्या आकृतीवरून डॉ. रॉजर्स यांची कल्पना अधिक स्पष्ट



घरातला टी. व्ही. उलटा करून ठेवा, त्याच्यासमोर एक बादली...

होते. तुमच्या घरातील दूरदर्शन तुम्ही उलटा करून ठेवता. त्याच्यासमोर एक प्लॅस्टिकची बादली बसविण्यात येते. प्लॅस्टिकच्या बादलीच्या तळाला भोक पाडून तेथे बहिर्वक्र (convey) भिंग लावतात. त्याच्यासमोर उभ्या केलेल्या पडद्यावर तुम्हाला मोठ्या पडद्यावर दूरदर्शन पाहिल्याचे समाधान मिळते. अर्थातच या साऱ्यासाठी अनेक पथ्ये पाळावी लागतात. डॉ. रॉजर्स यांच्या मते फार स्वच्छ व स्पष्ट (bright) चित्रे देणारा दूरदर्शन वापरावा लागतो. त्यांच्या मते 'सोनी ट्रिनट्रॉन' वा 'तोशिबा ब्लॅकस्ट्रिप' हे दूरदर्शन यासाठी अधिक उपयुक्त आहेत. वापरत असलेला दूरदर्शन किमानपक्षी घन-अवस्था (Solid State) असावा लागतो. नाही तर उलटचा स्थितीत ठेवल्यावर दूरदर्शनमधील पोकळ निर्वात नळचा फार गरम होण्याचा धोका संभवतो. वापरले जाणारे भिंग किमान पाच इंच त्रिज्या असलेले बहिर्वक्र भिंग असावे लागते. त्यांनी सुचवलेला पडदा हा ॲल्युमिनियमचा असतो. 'कोडॅक एकटेलाइट' (Kodak Ektalite)चा अडीच फुटांचा पडदा त्यांनी वापरला होता. पडद्यावर आपल्या हाताची बोटे वगैरे पडणार नाहीत याचीही काळजी घ्यावी लागते.

डॉ. मराठेंनी मागे विज्ञानेश्वरीला सांगितल्याप्रमाणे त्यांच्या संशोधनात पण आरसा हाच खरा महत्त्वाचा भाग होता. तो परदेशातून आणावा लागत होता, ही अर्थातच तेरा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यांना हवा असलेला आरसा पण फार मोठा होता. आज भारतात बनणारे काही छोटे आरसे वापरून पाहता येतील. नाही तर उद्या ते भारतात बनवता पण येतील. रंगीत दूरदर्शनपेक्षा प्रशस्त दूरदर्शन ही खरी महत्त्वाची गरज आहे. कारण खेडचापाडचांतील शाळांत आणि ग्रामपंचायतीत लोकशिक्षणाचे साधन म्हणून दूरदर्शन वापरणार ही आपली प्रतिज्ञा आहे. □

---

चित्रपट

# पद्मिनी कोल्हापुरे

## आता चौकटीत फिट्ट बसली !

हिंदी चित्रपटसृष्टीत दर दिवसाला एक नवा चेहरा प्रवेश करतो, असं म्हटलं तर ते फारसं वावगं ठरू नये. कारण नव्यानं येणारे नायक आणि त्यापाठोपाठ त्यांच्या वाजत-गाजत येणाऱ्या नव्या, कोवळ्या नायिका यांचं पेवच फुटलं आहे आणि त्यामुळं या नव्या चेहऱ्यांमध्ये जुने हरवलेले चेहरे शोधण्याचं चित्रपटसृष्टीलाही खूळच लागलं आहे. या नव्या नायिकांच्या मानानं आता जुन्या झालेल्या (किंवा मुरलेल्या) पद्मिनी कोल्हापुरेचा 'इन्साफ का तराजू' पडद्यावर झळकला आणि या चित्रपटातील छोट्याशाच भूमिकेत अभिनयाची कमाल करून अख्ख्या चित्रपटसृष्टीत एकच धमाल उडवून देणाऱ्या पद्मिनी कोल्हापुरेचं नाव ज्याच्या त्याच्या तोंडी झालं. कोणाला पद्मिनीचा चेहरा रेखापेक्षा अधिक फोटोजेनिक वाटला तर कोणाला शबाना आझमीपेक्षाही अधिक बोलका वाटला. कुणाला पद्मिनीला पाहून जया भादुरीची अगदी प्रकर्षानं आठवण झाली आणि जयाची रिकामी जागा आता पद्मिनीच भरून काढणार असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. याउलट काहींनी तिच्यातला 'बोल्ड' पणा पाहून तिला चक्क झीनत अमानकी अम्मा बनवून टाकलं, तर एका निर्माता-निर्देशकानं डोळचात पाणी आणून 'नर्गिसचा पुनर्जन्म झाला' असं गदगदत्या स्वरात जाहीर केलं होतं. एकूण सांगायचा उद्देश काय तर पद्मिनीकडून जो तो आपापल्या परीनं अपेक्षा ठेवून होता. आता यात लोकांच्या अपेक्षेनुसार पद्मिनीनं दुसऱ्या कुणा अभिनेत्रीची जागा भरून काढली असं नसलं तरी तिनं 'पद्मिनी कोल्हापुरे' ही स्वतःची आयडेन्टीटी मात्र चांगली जपली असं निश्चितपणे म्हणता येईल.

तशी पद्मिनी 'इन्साफ का तराजू' पासून प्रकाशझोतात आली असली तरी

चित्रपटसृष्टीशी तिची ओळख तशी जुनीच ! म्हणजे देव आनदच्या 'इश्क इश्क इश्क 'च्या वेळची ! कारण या चित्रपटातील एका भूमिकेसाठी देवला एक छोटी मुलगी हवी होती. तेव्हा आशा भोसलेनं आपल्याबरोबर कोरसमध्ये 'गायला म्हणून आणलेली पद्मिनीच देवसमोर पेश केली आणि ही भूमिका पद्मिनीला मिळाली; पण 'इश्क इश्क इश्क' मात्र सुपरफ्लॉप ठरला. अर्थात यातली पद्मिनीची भूमिका इतकी नगण्य होती की, हा चित्रपट चालला काय किंवा पडला काय याचा पद्मिनीला काही फायदा होण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्यानंतरच राजकपूरनं तिला रोशन तनेजा यांच्या संस्थेत पार पडलेल्या एका नृत्यकार्यक्रमात पाहिलं आणि त्याला 'सत्यम् शिवम् सुंदरम्' साठी रूपा भेटली 'सत्यम्' मधली भूमिकाही फार मोठी नव्हतीच; पण यातील पद्मिनीच्या भूमिकेची निश्चितच नोंद घेतली गेली.

'सत्यम्'मुळे पद्मिनीला ब्रेक मिळाला असला तरी चित्रपटसृष्टीत तिला खऱ्या अर्थानं मान्यता मिळाली, प्रसिद्धी मिळाली ती 'इन्साफ का तराजू' मुळं ! बलात्कारित स्त्रीच्या बाबतीत खुद्द न्यायदेवताच कशी पाठ फिरवते, या सामाजिक जाणिवेवर प्रकाश टाकणारा हा चित्रपट ! आधीच्या चित्रपटाच्या मानानं पद्मिनीची यातली भूमिका तशी लांबरुंद ! यातही पहिली अल्लड, बलात्काराच्या वेळची असहाय्य आणि बलात्कारानंतरची गंभीर अकाली प्रौढत्व आलेली – हे सारे बदलते भावविशेष पद्मिनीनं एखाद्या मुरब्बी कलावंताच्या सहजतेने दाखवले. 'इन्साफ का तराजू' तला अप्रतिम वठलेला प्रसंग म्हणजे पद्मिनी आणि राज बब्बरमधला प्रसंग हा प्रसंग पहिल्यांदा काही मिनिटांतच आटोपता घेण्यात आला होता; पण ट्रायलच्या वेळेस हा प्रसंग पाहून बी. आर. चोप्रांचं समाधान होईना. शेवटी हाच प्रसंग पुन्हा चित्रित करण्यात आला आणि खरोखरच हा प्रसंग राज बब्बर झीनत अमानमधील बलात्कारदृश्यापेक्षाही अधिक महत्त्वपूर्ण ठरला. या प्रसंगाच्या वेळेस पद्मिनीच्या अगतिक हुंदक्यांनी समोरचा प्रेक्षक जेव्हा हळहळतो, हीच तिच्या यशाची पावती !

'इन्साफ' हा खरा झीनत अमानचा चित्रपट आणि केवळ सेक्स सिम्बल म्हणून गाजलेल्या झीनतनं यात आपल्या अभिनयाचं अनपेक्षित दर्शन घडवून सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता आणि झीनतनं चित्रपटसृष्टीवर पसरलेल्या या जादूतूनही पद्मिनीनं आपला ठसा स्वतंत्रपणे उमटवला. त्यामुळंच 'इन्साफ' हीट गेला आणि अभिनयाच्या बाबतीत आपलं नाणं चोख असल्याचं पद्मिनीनं दाखवून दिलं. तिच्यातलं हे पोटेन्शियल जाणूनच अरुणा विकासनी तिला 'गहराई'तल्या भूमिकेची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. भूतबाधा झालेल्या मुलीभोवती फिरणारा हा चित्रपट अभिनयाविष्कारासाठी भरपूर स्कोप. पद्मिनीही कुठे कमी पडली नाही. यातील दोन पूर्णपणे वेगळ्या व्यक्तिरेखा म्हणजे झटका येण्याच्या आधीची आणि नंतरची. या दोन्ही व्यक्तिरेखामधलं वेगळेपण, भिन्नता हे यथार्थपणे, उत्कटपणे दाखवण्याची सारी मदार केवळ अभिनयावरच होती. साधी, निष्पाप, अल्लड उमा झटका आल्यानंतर दुसऱ्याच व्यक्तिरेखेत शिरून गलिच्छ भाषा वापरणारी, विचित्र हावभाव करणारी – असं एका भूमिकेतून दुसऱ्या भूमिकेत शिरणं पद्मिनीनं सहजतेनं दाखवलं आणि त्यामुळंच भावभावनाचे सगळे चढउतार पद्मिनीच्या अभिनयानं जिवत झाले. तिच्या अस्सल अभिनयाची 'गहराई' सगळ्यांनाच जाणवली. 'गहराई' मधल्या पद्मिनीच्या अभिनयानं 'एक्झॉर्सिस्ट' मधल्या लिंडा ब्लेअरची किंवा 'रात और दिन'मधल्या नर्गिसची आठवण करून दिली. नुसती आठवणच करून दिली असं नाही तर तिच्या अभिनयानं या मुरब्बी अभिनेत्रीच्या अभिनयाची उंची गाठली. 'गहराई' जितका पद्मिनीमुळं गाजला, तितकाच आणखी दोन कारणांमुळं गाजला आणि ती म्हणजे आजच्या वैज्ञानिक युगात अंधश्रद्धेला चालना देणारा म्हणून त्याच्याविरुद्ध उठलेला टीकेचा गदारोळ आणि या चित्रपटातील पद्मिनीचा न्यूड सीन !

तेव्हा केवळ याच सीनची इतकी पब्लिसीटी केली जाईल असं मला कधीच वाटलं नव्हतं किंवा माझ्या अननुभवी असण्याचा फायदा घेतला गेला......' वगैरे वगैरे असं स्पष्टीकरण देऊन पद्मिनीनं झाल्या प्रकाराची खूप सारवासारव करण्याचा प्रयत्न केला असला तरी 'इन्साफ' मधला किंवा 'गहराई' मधला प्रसंग काय हे व्यावसायिक तडजोडीची स्पष्ट जाणीव मनाच्या कोपऱ्यात सतत जागती ठेवून दिल्याचं स्पष्ट जाणवतं आणि त्यातूनच प्रिन्स चार्ल्स वगैरे प्रकरणातून चर्चेच्या फेऱ्यात राहायची खबरदारीही तिनं घेतलीच होती. अशा परिस्थितीत पद्मिनीला अशाच भूमिका करण्यात रस आहे. 'झीनत' इमेजचाच आदर्श तिच्या डोळ्यांसमोर आहे वगैरे वावड्यांचं पीक आलं आणि आपलं उखळ पांढरं करण्याच्या मागं लागलेले अनेक निर्माते-दिग्दर्शक याच प्रकारच्या भूमिका घेऊन तिच्याकडे धावले; पण पद्मिनीनं या प्रकारच्या भूमिकांना फारसं उत्तेजन दिलं नाही आणि त्याच वेळेस देवदासीच्या आयुष्यावर आधारित असलेल्या 'आहिस्ता आहिस्ता'ची घोषणा केली. पद्मिनीच्या बाबतीत हा आणखी एक प्लस पॉइंट मानावा लागेल. कारण पहिल्यांदा साईड रोलमध्ये चमकूनही पद्मिनी लगेचच नायिका झाली. शरीरप्रदर्शनाचा मार्ग चोखाळूनही ती लॅम्प्सच्या लाइनीत जाऊन बसली नाही. उलट तिला नायिका होण्याचे चान्सेस मिळाले तेही नायिकाप्रधान चित्रपटातलेच. म्हणजेच हा पद्मिनीच्या अभिनयाचा विजय !

देवनं 'इश्क इश्क इश्क'च्या निमित्तानं तिला चित्रपटसृष्टीचं दार खुलं केलं तर इस्माइल श्रॉफच्या 'आहिस्ता आहिस्ता'नं तिला नायिकेच्या रूपात पुढं आणलं. अभिनय, सौंदर्य इत्यादी आवश्यक ते सारे गुण असूनही कित्येक अभिनेत्रींना मोडीत काढणाऱ्या चित्रपटसृष्टीचा हिसका पद्मिनीला मात्र बसला नाही. उलट तिच्या अभिनयक्षमतेची कदर करणाऱ्या एकेक भूमिका तिच्या झोळीत आपोआप पडत गेल्या आणि ज्या यशासाठी आज यशस्वी ठरलेल्या कलावंतांनी जिवाचं रान केलं होतं, ते यश फार लहान वयात आणि फार थोडक्या काळात पद्मिनीला मिळालं !



जशी पूनम, रती तशीच पद्मिनी !

'आहिस्ता आहिस्ता' ह्या तिच्या अभिनयाचे बदलते रंग दाखवणारा चित्रपट. 'इन्साफ का तराज़ू'त आपल्या बहिणीवर होणाऱ्या अत्याचाराचा अर्थ न कळून भीतीनं घामाघूम होणारी, अस्वस्थ होणारी पद्मिनी आणि 'आहिस्ता आहिस्ता'मध्ये कुणाल कपूरबरोबर सफाईनं प्रेमप्रसंग रंगवणारी पद्मिनी ह्या पद्मिनीतला बदल सगळ्यांनाच जाणवला. देवदासींची व्यथा, तडप, घुटन असे भावाविष्कार दाखवताना पद्मिनीच्या चेहऱ्यावरची नस न् नस जिवंत झाली आणि सध्याच्या धांगडधिंग्याच्या चित्रपटात 'आहिस्ता आहिस्ता' सारखा साधा, सरळ चित्रपट एक सुखद अनुभव देऊन गेला.

## पूनम आणि पद्मिनी

त्यामुळेच पद्मिनी ही इतर नटयांसारखी केवळ 'शो पीस' म्हणून वावरणारी कचकड्याची बाहुली नाही यावरही शिक्कामोर्तब झालं आणि पद्मिनीचा भाव चित्रपटसृष्टीत एकदम वधारला ! सगळे हीरो तिच्याबरोबर काम करण्यासाठी धडपडू लागले. एवढंच नाही तर पद्मिनीआधी चित्रपटसृष्टीत येऊनही अयशस्वी राहिलेले नटही तिच्याबरोबर काम करून चित्रपटसृष्टीतलं आपलं डळमळणारं आसन स्थिर करण्याच्या मार्गाला लागले; पण 'इन्साफका तराज़ू' 'गहराई', 'आहिस्ता आहिस्ता' अशा एकापाठोपाठ हीट ठरलेल्या चित्रपटांमुळं पद्मिनीबद्दल सगळ्यांच्याच अपेक्षा उंचावलेल्या असताना नासिर हुसेनचा 'जमानेको दिखाना है' आणि पद्मिनीविषयीच्या अपेक्षांना कुठे तरी तडा गेला. 'गहराई', 'आहिस्ता आहिस्ता' सारखे चित्रपट केवळ एकटीच्या बळावर तारून नेणारी पद्मिनी यात ऋषी कपूरसारखा नट बरोबर असूनही ह्या चित्रपट तारून नेऊ शकली नाही. या संपूर्ण चित्रपटात पद्मिनी हरवूनच गेल्यासारखी वाटली. कारण तिनं अभिनयातलं काही वेगळेपण दाखवावं आणि त्यावर पद्मिनी असा खास शिक्का मारावा असं या चित्रपटातच काही नव्हतं.

अर्थात अपवाद म्हणून या चित्रपटाकडे दुर्लक्ष केलं तरी त्यापाठोपाठच आलेल्या 'तेरी माँग सितारोंसे भर हूँ' किंवा 'खुश नसीब' यांसारख्या चित्रपटातही पद्मिनीने निराशाच केली. या चित्रपटांमध्ये पद्मिनीचा अभिनय सामान्य झाला. याचं मुख्य कारण या चित्रपटांच्या कथेच्या मागणीचा आवाकाच थोडा होता. नूतन, अमजद खान, राजकिरण वगैरेंच्या भूमिका असलेल्या 'तेरी माँग सितारोंसे भर हूँ' या चित्रपटात तर पद्मिनी अगदीच उपरी वाटली, तर 'खुश नसीब' बघणं म्हणजे प्रेक्षकांचं बदनसीब ठरावं इतकी 'खुश नसीब'ची वाट लागली !

गेल्या वर्षी 'इश्क इश्क इश्क', 'सत्यम् शिवम् सुंदरम्', 'थोडीसी बेवफाई' वगैरे चित्रपटात असलेल्या तोडक्या-मोडक्या भूमिकांच्या आधारावर सरळ सरळ रेखा–झीनतला शह देणाऱ्या आणि हे आव्हान सहजी पेलणाऱ्या पद्मिनीच्या चित्रपट-कारकीर्दीला या वर्षी अशी उतरती कळा लागावी म्हणजे हाही खोटा सिक्काच ठरणार का काय अशी भीती वाटत असतानाच 'प्रेमरोग' झळकला आहे. हा चित्रपट म्हणजेच राजकपूरची फार मोठी इच्छा पूर्ण झाली आहे आणि 'हा चित्रपट अयशस्वी ठरला तर हा माझा शेवटचाच चित्रपट असेल !' या राजकपूरच्या घोषणेनं या चित्रपटाविषयीच्या उत्कंठेत अजूनच भर पडली होती. पूर्णपणे नायिकेभोवती म्हणजे पद्मिनीभोवतीच फिरणारा हा नायिकाप्रधान चित्रपट 'बॉबी', 'सत्यम् शिवम् सुंदरम्' यापेक्षा राजकपूरने दिलेला वेगळ्या विषयावरचा आणि प्रकारचा चित्रपट म्हणून या चित्रपटाच्या वाट्याला कौतुक आलं. पद्मिनीच्याही संयत अभिनयाचं यात पुन्हा एकदा दर्शन घडलं. या चित्रपटाच्या जमेच्या बाजू असतानाही हा चित्रपट अपेक्षित यश मात्र मिळवू शकला नाही. त्यामुळे ह्या चित्रपटाबद्दल पद्मिनीच्या खूप अपेक्षा होत्या. त्याही धुळीला मिळाल्यातच जमा आहेत.

आधी आधी अभिनयाचं वेगळेपण दाखवणारी पद्मिनी हळूहळू हिंदी चित्रपटाच्या नायिकेच्या नेहमीच्या चौकटीत अडकून पडते आहे आणि ही गोष्ट पद्मिनीच्या भवितव्याच्या दृष्टीनं निश्चितच धोकादायक आहे. कारण असंच झालं तर जशी पूनम, जशी रती, तशीच पद्मिनी !

—शुभदा रानडे

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11)

# ४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




चौथी
डिलक्स
आवृत्ती

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राऊन आकार ॥

॥ भरपूर छायाचित्रे ॥

॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

## माइन काम्फ

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन
पुणे

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.